# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – १३

## सभावृत्तांत

दिनांक – २०.२.२०१८ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे फेब्रूवारी-२०१८ ची मा.महापालिका सभा मंगळवार दि.२०.२.२०१८ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे महापौर
२) मा.शैलजा अविनाश मोरे उपमहापौर
३) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे
४) मा.साधना अंकुश मळेकर
५) मा.दत्तात्रय बाबूराव साने
६) मा.सारीका शिवाजी सस्ते
७) मा.राहुल गुलाब जाधव
८) मा.वसंत प्रभाकर बोराटे
९) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)
१०) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
११) मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१२) मा.उंडे लक्ष्मण धोंडू
१३) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन
१४) मा.गायकवाड निर्मला मनोज
१५) मा.सागर बाळासाहेब गवळी
१६) मा.गोफणे अनुराधा देविदास
१७) मा.बारसे प्रियांका प्रविण
१८) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

१९) मा.लांडगे सारिका संतोष

२०) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२१) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२२) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२३) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२४) मा.फुगे भिमाबाई पोपट

२५) मा.सावळे सिमा रविंद्र

२६) मा.लोंढे नम्रता योगेश

२७) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२८) मा.गीता सुशिल मंचरकर

२९) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३०) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३१) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३२) मा.अनुराधा गणपत गोरखे

३३) मा.केशव हनुमंत घोळवे

३४) मा.मंगला अशोक कदम

३५) मा.अश्विनी भिमा बोबडे

३६) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३७) मा.संजय बबन नेवाळे

३८) मा.एकनाथ रावसाहेब पवार

३९) मा.भालेकर प्रविण महादेव

४०) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४१) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४२) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४३) मा.घोलप कमल अनिल

४४) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४५) मा.पवळे सुमनताई मधुकर

४६) मा.चिखले सचिन तुकाराम

४७) मा.यादव मीनल विशाल

४८) मा.वैशाली जालिंदर काळभोर

४९) मा.प्रमोद कुटे

५०) मा.राजू मिसाळ

५१) मा.बाबर शर्मिला राजू

५२) मा.अमित राजेंद्र गावडे

५३) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५४) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५५) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५६) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

५७) मा.ढाके नामदेव जनार्दन

५८) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

५९) मा.करुणा शेखर चिंचवडे

६०) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

६१) मा.भोईर सुरेश शिवाजी

६२) मा.अपर्णा निलेश डोके

६३) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६४) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६५) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

६६) मा.जयश्री वसंत गावडे

६७) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

६८) मा.सुलक्षणा राजू धर

६९) मा.शाम गणपतराव लांडे

७०) मा.सुजाता सुनिल पालांडे

७१) मा.योगेश मंगलसेन बहल

७२) मा.कदम निकीता अर्जुन

७३) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७४) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७५) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

७६) मा.नढे विनोद जयवंत

७७) मा.काळे उषा दिलीप

७८) मा.कोकणे संतोष अंकुश

७९) मा.पवार मनिषा प्रमोद

८०) मा.बारणे अर्चना तानाजी

८१) मा.अभिषेक गोविंद बारणे

८२) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८३) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

८४) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८५) मा.बारणे माया संतोष

८६) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

८७) मा.दर्शले रेखा राजेश

८८) मा.कलाटे राहुल तानाजी

८९) मा.कलाटे मयूर पांडुरंग

९०) मा.ममता विनायक गायकवाड

९१) मा.कामठे तुषार गजानन

९२) मा.चोंधे आरती सुरेश

९३) मा.कस्पटे संदिप अरुण

९४) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

९५) मा.सविता बाळकृष्ण खुळे

९६) मा.सुनिता हेमंत तापकीर

९७) मा.चंद्रकांत बारकु नखाते

९८) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९९) मा.कुटे निर्मला संजय

१००) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१०१) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०२) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०३) मा.मुंढे उषा अंकुश

१०४) मा.कदम शशिकांत गणपत

१०५) मा.लोखंडे चंदा राजू

१०६) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

१०७) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१०८) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

१०९) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

११०) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

१११) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

११२) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

११३) मा.संतोष बबन कांबळे

११४) मा.सोनवणे शारदा हिरेन

११५) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

११६) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

११७) मा. वाबळे संजय मल्हारराव

११८) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

११९) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१२०) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१२१) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर-आयुक्त, मा.प्रविण आष्टीकर -प्र.अतिरिक्त आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.गावडे- सह आयुक्त, मा.दुधेकर, मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.खोराटे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.बोदडे, मा.राऊत - सहा.आयुक्त, मा.पवार-प्र.कायदासल्लागार, मा.साळुंके-मुख्य उदयान अधिक्षक, मा.तांबे, मा.लडकत, मा.गलबले-कार्यकारी अभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

१) स.नं.९ मधील म.न.पा. व दिलीप वेंगसरकर फौंडेशन या कार्यरत संयुक्त क्रिकेट प्रकल्पांतर्गत स्थापत्य, विद्युत, अंतर्गत सजावट व त्याअनुषंगिक इतर वाढीव कामे करणेस व त्यासाठी येणा-या खर्चास व त्यानुसार सोबत जोडलेल्या प्रपत्रामधील अटी व शर्तीनुसार पुरवणी करारनामा करणेस मान्यता देणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता –

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, किल्ले पन्हाळा येथुन शिवज्योत घेवुन जाणा-या ६ विद्यार्थ्यांचे अपघाती निधन, श्रीनगरमध्ये रुग्णालयावर केलेल्या दहशतवादी हल्ल्यात शहिद झालेले २ पोलिस, जम्मुमधील सुंजवा येथील लष्करी तळावर दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत शहिद झालेले ५ जवान तसेच सुधाताई करमरकर-बालरंगभूमीच्या ज्येष्ठ रंगकर्मी, दिपाली कोल्हटकर-ज्येष्ट नाट्यदिग्दर्शक दिलीप कोल्हटकर यांच्या पत्नी, जयंत मुरलीधर ससाणे-श्रीरामपुरचे माजी आमदार, वसंतराव उर्फ दादा केसकर-स्वातंत्र्यसैनिक व भाजपा ज्येष्ठ नेते यांचे निधन झाल्याने तसेच शहरातील ज्ञात-अज्ञात दिवंगत व्यक्तिना श्रध्दांजली वाहण्यात यावी.

आजची सभा बुधवार दिनांक २८/२/२०१८ रोजी दुपारी २.०० वा.पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.महापौर-** श्रीपाद छिदंम यांचा निषेध करुन व सर्वाना श्रध्दांजली वाहून आजची सभा बुधवार दि.२८/२/२०१८ दु.२.०० वा.पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

---------

**(**नितीन (आप्पा) प्रताप काळजे**)**

**महापौर**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी -४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – १३**

**सभावृत्तांत**

(दि.२०/२/२०१८ ची तहकूब सभा)

दिनांक – २८.२.२०१८ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०/२/२०१८ (माहे फेब्रुवारी २०१८) ची तहकूब मा.महापालिका सभा बुधवार दि.२८.२.२०१८ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे महापौर
२) मा.शैलजा अविनाश मोरे उपमहापौर
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे
५) मा.साधना अंकुश मळेकर
६) मा.दत्तात्रय बाबूराव साने
७) मा.अश्विनी संतोष जाधव
८) मा.सारीका शिवाजी सस्ते
९) मा.राहुल गुलाब जाधव
१०) मा.वसंत प्रभाकर बोराटे
११) मा.बुर्डे सुवर्णा विकास
१२) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)
१३) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
१४) मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१५) मा.ऊंडे लक्ष्मण धोंडू
१६) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१७) मा.गायकवाड निर्मला मनोज

१८) मा.सागर बाळासाहेब गवळी

१९) मा.गोफणे अनुराधा देविदास

२०) मा.बारसे प्रियांका प्रविण

२१) मा.अजित दामोदर गव्हाणे

२२) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२३) मा.लांडगे सारिका संतोष

२४) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२५) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२६) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२७) मा.फुगे भिमाबाई पोपट

२८) मा.सावळे सिमा रविंद्र

२९) मा.लोंढे नम्रता योगेश

३०) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३१) मा.लांडे विक्रांत विलास

३२) मा.गीता सुशिल मंचरकर

३३) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३४) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३५) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३६) मा.अनुराधा गणपत गोरखे

३७) मा.केशव हनुमंत घोळवे

३८) मा.मंगला अशोक कदम

३९) मा.अश्विनी भिमा बोबडे

४०) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

४१) मा.संजय बबन नेवाळे

४२) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४३) मा.भालेकर प्रविण महादेव

४४) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४५) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४६) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४७) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४८) मा.पवळे सुमनताई मधुकर

४९) मा.चिखले सचिन तुकाराम

५०) मा.जावेद रमजान शेख

५१) मा.यादव मीनल विशाल

५२) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५३) मा.राजू मिसाळ

५४) मा.बाबर शर्मिला राजू

५५) मा.अमित राजेंद्र गावडे

५६) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५७) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५८) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५९) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

६०) मा.ढाके नामदेव जनार्दन

६१) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६२) मा.करुणा शेखर चिंचवडे

६३) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

६४) मा.भोईर सुरेश शिवाजी

६५) मा.अपर्णा निलेश डोके

६६) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६७) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६८) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

६९) मा.जयश्री वसंत गावडे

७०) मा.कोमल दिपक मेवानी

७१) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

७२) मा.सुलक्षणा राजू धर

७३) मा.शाम गणपतराव लांडे

७४) मा.सुजाता सुनिल पालांडे

७५) मा.योगेश मंगलसेन बहल

७६) मा.कदम निकीता अर्जुन

७७) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७८) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७९) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

८०) मा.नढे विनोद जयवंत

८१) मा.पाडाळे निता विलास

८२) मा.काळे उषा दिलीप

८३) मा.कोकणे संतोष अंकुश

८४) मा.पवार मनिषा प्रमोद

८५) मा.बारणे अर्चना तानाजी

८६) मा.अभिषेक गोविंद बारणे

८७) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८८) मा. अॅड. भोसले सचिन सुरेश

८९) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९०) मा.बारणे माया संतोष

९१) मा.निलेश हिरामण बारणे

९२) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

९३) मा.दर्शले रेखा राजेश

९४) मा.कलाटे राहुल तानाजी

९५) मा.कलाटे मयूर पांडुरंग

९६) मा.ममता विनायक गायकवाड

९७) मा.कामठे तुषार गजानन

९८) मा.चोंधे आरती सुरेश

९९) मा.कस्पटे संदिप अरुण

१००) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

१०१) मा.सविता बाळकृष्ण खुळे

१०२) मा.सुनिता हेमंत तापकीर

१०३) मा.चंद्रकांत बारकु नखाते

१०४) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०५) मा.कुटे निर्मला संजय

१०६) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१०७) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०८) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०९) मा.मुंढे उषा अंकुश

११०) मा.कदम शशिकांत गणपत

१११) मा.लोखंडे चंदा राजू

११२) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

११३) मा.आशा धायगुडे-शेंडगे

११४) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

११५) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

११६) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

११७) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

११८) मा.नवनाथ दत्तू जगताप

११९) मा.संतोष बबन कांबळे

१२०) मा.सोनवणे शारदा हिरेन

१२१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

१२२) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१२३) मा. वाबळे संजय मल्हारराव

१२४) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

१२५) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१२६) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१२७) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर- आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर- मुख्यलेखापरिक्षक, मा.दुधेकर, मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.खोत, मा.बोदडे, मा.राऊत, मा.झगडे - सहा.आयुक्त, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके- मुख्य उदयान अधिक्षक, मा.निकम, मा. इंगळे, मा.तांबे, मा.लडकत, मा.ओंभासे, मा.गट्टूवार, मा.गायकवाड, मा.पवार - कार्यकारी अभियंता तसेच मा.पी. गाडेकर, मा.आर.गाडेकर-प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**--------**

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. शंकराचार्य श्री श्री जयेंद्र सरस्वती स्वामी - कांचीपुरम शंकर मठाचे मठाधिपती, वत्स - भारतीय सैन्यदलातील विंग कमांडर, कल्याणसिंह चौहान - राजस्थान विधानसभा भाजपाचे आमदार, लोकेंद्र सिंह - उत्तरप्रदेश विधानसभा भाजपाचे आमदार यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली वाहण्यात यावी.

**मा.बाबू उर्फ प्रेमकुमार नायर -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनूमोदन देतो.

**मा.महापौर-** सर्वांनी श्रध्दांजली वाहणेसाठी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

-------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**नियुक्त्या**

**विषय क्रमांक १)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे स्थायी समितीवर ८ (आठ) मा.सदस्यांच्या नियुक्त्या कलम ३१अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन नामनिर्देशनाव्दारे करणे.

**मा.नगरसचिव –** विषय क्रमांक १ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मा.स्थायी समितीवर ८ (आठ) मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन नामनिर्देशनाव्दारे करणे करीता सदर कलमा अन्वये महानगरपालिका अधिनियमान्वये गठीत करण्यात येणा-या समित्यांमध्ये महानगरपालिकेतील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना व गटांना खात्रीपुर्वक पुरेसे प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून समित्यांवर बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्याची तरतूद करण्यात आली. तसेच रिक्त होणा-या जागांवर निवृत्त झालेला मा.सदस्य ज्या मान्यताप्राप्त पक्षाचा, नोंदणीकृत पक्षाचा गटाचा आघाडीचा किंवा फ्रंटचा आहे त्याच मान्यताप्राप्त पक्षाच्या/नोंदणीकृत

पक्षाच्या/गटाच्या/ आघाडीच्या किंवा फ्रंटच्या मा.सदस्यास नामनिर्देशित करावयाचे असून विद्यमान मा.स्थायी समितीचे दिनांक १ मार्च २०१८ रोजी दुपारी निवृत्त होणारे सदस्यांची नांवे पुढीलप्रमाणे-

१) मा.सावळे सिमा रविंद्र २) मा.कुंदन अंबादास गायकवाड ३) मा.मुंढे उषा अंकुश ४) मा.कोमल दिपक मेवानी ५) मा.गोफणे अनुराधा देविदास ६) मा.वैशाली जालिंदर काळभोर ७) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे ८) मा.आशा धायगुडे-शेंडगे याप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी – ६ , पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - २ या पक्षियबलाप्रमाणे नियुक्त्या करणे करीता.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी गटनेते तथा सभागृहनेता मा.एकनाथ रावसाहेब पवार यांनी त्यांच्या पक्षाचे ६ सदस्यांची नांवे बंद लखोटयामध्ये स्वाक्षरीनीशी मा.महापौरांकडे द्यावीत. (बंद लखोटा देणेत आला.)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी गटनेते तथा विरोधी पक्षनेता मा.योगेश मंगलसेन बहल यांनी त्यांच्या पक्षाच्या २ सदस्यांचे नाव बंद लखोटयामध्ये स्वाक्षरीनीशी महापौरांकडे द्यावीत. (बंद लखोटा देणेत आला.)

त्यानंतर –

मा.महापौर यांनी बंद लखोटे सर्वासमक्ष उघडले आणि त्यामध्ये असणारी नांवे श्री.आण्णा बोदडे, प्र.क्षेत्रीय अधिकारी, क क्षेत्रीय कार्यालय यांनी सभागृहात वाचून दाखविली ती पुढीलप्रमाणे-

१) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे- पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी २) मा.आंगोळकर सागर सुनिल- पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी ३) मा.ममता विनायक गायकवाड- पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी ४) मा.राहुल गुलाब जाधव- पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी ५) मा.लोंढे नम्रता योगेश- पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी ६) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव- पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी ७) मा.गीता सुशिल मंचरकर- पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ८) मा.खानोलकर प्रज्ञा महेश- पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी.

ठराव क्रमांक - १४४ | विषय क्रमांक - १

दिनांक – २८/२/२०१८ | विभाग – मा.नगरसचिव

**<u>मा.स्थायी समिती सदस्य</u>**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे स्थायी समितीवर ८ (आठ) मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक

२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळांच्या प्रमाणात १) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे २) मा.आंगोळकर सागर सुनिल ३) मा.ममता विनायक गायकवाड ४) मा.राहुल गुलाब जाधव ५) मा.लोंढे नम्रता योगेश ६) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव ७) मा.गीता सुशिल मंचरकर ८) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

--------

(मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सत्तारुढ पक्षनेते, मा.विरोधी पक्षनेते, सर्व पक्षांचे मा.गटनेते यांचे हस्ते नियुक्त समिती सदस्यांचा पुष्पगुच्छ देवुन सन्मान करणेत आला)

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मी एक विषय मांडणार आहे. या विषयाला राजकीय काही नाही, यापुर्वी देखील अशी घटना घडल्यानंतर मी, आपण पण सभागृहात होतात. दुस-या पक्षाच्या नगरसेवकाच्या संदर्भात घटना घडल्यानंतर मी तो प्रश्न मांडला होता. त्याचा गांभीर्याने आयुक्तांनी त्यावेळेस निर्णय घेतलेला होता. कोणत्याही पक्षाचे नगरसेवक असेलतर, एखादयावेळेस एखादी घटना घडल्यानंतर सभागृहाने त्या विषयाला खंबीरपणे पाठींबा देणे हे आपल कर्तव्य आहे. दोन दिवसापासून तूषार कामठेच्या संदर्भात वर्तमानपत्रामध्ये बातमी येते. कोणतेही बंधन असतात, आचारसंहिता असते असे काहीतरी नियम असतात. तुषार कामठेनी चुकले, बरोबर हा निर्णय जरी कोणी घ्यायचा असतो. एखादा ठेकेदार ज्यावेळेस असं मोठ धाडस करतो त्यावेळला आपली कुठेतरी पकड चुकली की काय अशी शंका निर्माण होते. एखादी चुक जर तुषार कामठेची असेलतर त्यासाठी पक्षाचे वरिष्ठ नेते असतात त्या पक्षाच्या नेत्यांकडे त्यांची तक्रार करणे किंबहुना आयुक्तांकडे जाणं, किंबहुना महापौरांकडे जाणं आवश्यक आहे. पण डायरेक्ट वर्तमानपत्राच्या बातमीपासून एक नगरसेवकांची चर्चा वर्तमानपत्रात होणं त्या सर्व नगरसेवकाकडे त्यादृष्टितून पाहीले जाते. या आतापर्यंत घडलेल्या घटनेवर आपण त्याठिकाणी ताबडतोब कारवाई करा अशा पध्दतीच मागे सुध्दा प्रशांत शेट्टीच्या संदर्भात आपण होते सभागृहामध्ये. त्यावेळेस देखील मी हेच बोललो होतो. त्यावेळेस देखील मी त्या पक्षात नव्हतो. पक्षीय वातावरण करण्यापेक्षा तूषार कामठे सभागृहातील सदस्य आहे त्याचा मान-सन्मान हा प्रत्येकाने राखने अत्यंत गरजेचे आहे. हीच

घटना जर अधिका-याच्या संदर्भात घडली असतीतर काय झाल असतं. परंतु एवढा कसला माज आला त्या ठेकेदाराला, त्यान डायरेक्ट सांगायच एखाद नगरसेवक खंडणी, निवडणूक कशा पध्दतीने घेतली जाते आणि खंडणी काय आहे. कोणत्या पध्दतीची हैसीयत त्या ठेकेदाराची आहे. म्हणून आयुक्त साहेब मला असं वाटत की याच्यामध्ये गांभीर्यान आपण लक्ष देणे गरजेच आहे. कोणतरी उठतो ऐरागैरा आणि नगरसेवकांबद्दल असं जाहीर वक्तव्य करतो, तेपण वर्तमानपत्रामध्ये. त्याला नियम आहेत. तो ठेकेदार महापालिकेचा असेलतर आयुक्त, महापौर, पक्षाचे वरिष्ठ नेते असतात. परंतु अशा पध्दतीचा कुणाला माज येत असेलतर त्याची शहानिशा करुन चौकशी करुन त्याला ब्लॅकलीस्टला टाकणे गरजेचे आहे. कारण यानंतर परत अशी घटना कोणी करता कामा नये. मला अस वाटत की पक्षनेत्यांनी त्याच्यावर गांभीर्याने दखल घेणे गरजेच आहे. तुषार कामठे कोणत्या पक्षाचा आहे याच काही नाही पण सभागृहातील एक सदस्य आहेत. त्यांच्याकड ज्या दृष्टीकोनातून पाहील जात त्याच दृष्टीकोनातून आमच्याकड सुध्दा पाहील जातं. म्हणून मा.महापौर साहेब याची आपण गांभीर्याने दखल घ्यावी आणि आयुक्त साहेबांना त्या पध्दतीचे आदेश दयावेत की त्याची चौकशी करुन त्याला कायमस्वरुपी या महापालिकेचे दरवाजे बंद करावे असे मी नंम्र अवाहन करतो.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. माझे मीत्र भाऊसाहेब भोईर यांनी खुप चांगली सूचना मांडली आहे. तुषारच मनापासून अभिनंदन करतो. एखादा नगरसेवक आपल्या प्रभागामध्ये अनधिकृत फ्लेक्स काढण्यासाठी स्वत: रस्त्यावर येतो. कधी कधी अशा पध्दतीच काम प्रशासनाने करण्याची गरज असते. आयुक्त साहेब मी तुम्हांला विनंती करतो हे शहर फ्लेक्सच्या माध्यमातून जर बघीतलतर बकाल झालेले आपण बघतो आणि तुषारच्या संदर्भात ज्या ठेकेदारांनी, म्हणजे मुजोरी किती असते हे तुम्ही लक्षात ठेवा. म्हणजे सीसीटीव्ही मध्ये त्याच सर्व चित्रीकरण आपल्या सगळयाच्या समोर बघायला मिळू शकतं. आणि तिथं जावुन दमदाटी करणं आणि तेवढयावरच न थांबता नगरसेवकांला जीवे मारण्याची धमकीतर त्यांने दिलीच. परंतु पैसे मागण्याची धमकी. मला असं वाटत की तुषारची आर्थीक परिस्थिती किमान एक ते दोन कोटी वर्षाला/महिन्याला कमवण्याची आहे. एखादा नगरसेवक अशा पध्दतीच ज्यावेळेस काम करतो, मा.भाऊसाहेबांनी सांगीतल नगरसेवक हा कुठल्या पक्षाचा आहे हा मुद्दा खरंच महत्वाचा नाही. म्हणजे माजलेले ठेकेदार या महापालिकेत आहेत. खरतर त्याचे स्टेटमेंट बघीतलेतर तुमचे सगळेची सगळे नगरसेवक माझ्या खीशात घेवून फिरतो ही मस्ती एखादया ठेकेदाराला आहे. माझी या निमीत्तान विनंती आहे की जो कोहली नावाचा ठेकेदार आहे त्याचे आपल्या शहरामध्ये किती अनधिकृत फ्लेक्स आहेत आणि किती फ्लेक्सचे तो पैसे भरतो आणि कशा पध्दतीन महापालिकेला चुना लावण्याच काम गेल्या अनेक दिवसापासून केलं. तो कोणाच्या जवळचा आहे हा महत्वाचा मुद्दा नाही. पण ज्या पध्दतीने एखादया नगरसेवकावर दादागीरी करणं, जीवे मारण्याची धमकी देणे, तो पैसे खातो अशा

पध्दतीचे आरोप करणं. मला असं वाटतय की त्या कोहली संदर्भात प्रशासनाने कडक भूमीका घेण्याची मा.महापौर साहेब तुम्हांला मी विनंती करतो. या ठेकेदाराला या महापालिकेत पुढच्या काळात एकही फ्लेक्स लावण्याचे काम मिळाले नाही पाहीजे अशा पध्दतीचे आपण प्रशासनाला निर्देष करावेत. कुठल्याही पक्षाचा नगरसेवक, ठेकेदार अशा पध्दतीने काम करत असेलतर पुढच्या काळामध्ये ठेकेदाराची मस्ती सुध्दा या सभागृहाच्या माध्यमातून आपण जीरवण्याची ख-या अर्थाने गरज आहे. मा.महापौर साहेब, तुम्ही आदेश दयावेत की या ठेकेदाराची सखोल चौकशी करुन महापलिकेच्या पैशाची किती लुट केली त्याची पहील्या दिवसापासूनची वसूली करुन त्याच्या मालमत्तेवर जप्ती आणण्याचे काम करावे हीच विनंती करतो.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. भाऊसाहेब भोईर यांनी जो विषय तुषार कामठेच्या संदर्भात मांडलेला आहे त्याबद्दल पिंपरी चिंचवड शहराच्या सर्व नगरसेवकांच्या वतीने, सभागृहाच्या वतीने त्याचा मी जाहीर निषेध करतो. गॅमन इंडीया कंपनीच्या माध्यमातून ज्यावेळेला प्रसाद शेट्टीला असंच ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न केला होता त्यावेळेला आपण त्याला पिंपरी चिंचवड शहरातन कायम हद्दपार केला होता. तुषार कामठे आपला सहकारी नगरसेवक यांनी फ्लेक्स काढले, फ्लेक्सच्या माध्यमातून जर शहर बकाल होत असेल, असे असताना जर ठेकेदार नगरसेवकांना अशाप्रकारची वागणूक देत असेलतर ही परिस्थिती गांभीर्याने घेणे गरजेचे आहे. उदया कोणीही उठायचा आणि नगरसेवकांना दम दयायचा हा प्रकार याच्या पुढे घडला गेलातर त्याला जी काही सजा दयायची ते आम्ही तुम्हांला न विचारता, येथून पुढे आम्ही सभागृहात चर्चा करणार नाहीत. तो ठेकेदार कुठला आहे, काय करतो, त्याचे धंदे काय तो शहरात येणार नाही याची जबाबदारी आम्ही घेवू आणि आपल्याला विनंती आहे आपण त्याच्यावर कडक कारवाई करावी असे जाहीर आदेश दयावेत.

**मा.तुषार कामठे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. भाऊसाहेबांनी जो विषय माझ्याबद्दल काढला त्याबद्दल मी मनापासून आभारी आहे. तसेच दत्ताकाका, एकनाथ पवार यांनी पाठींबा दाखवला व माझे सभागृहातील जे जे सहकारी माझ्या पाठीशी उभे राहीले त्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो. मा.महापौर साहेब, मी सप्टेंबर महीन्यात पहीले निवेदन आकाश चिन्ह व परवाना विभागाला दिलेले होते की अनधिकृत फ्लेक्स काढावेत म्हणून. तसेच कोहलीनी किती महीन्याची परमीशन घेतली आहे, किती पोलची घेतली याची निवीदा मागवली होती. मला माहितीच्या अधिकारात सुध्दा माहिती देण्यात आली नाही. सहा महीने मला एक कागद देण्यासाठी लावला. बीट निरीक्षक भाट साहेब म्हणून आहेत मी त्यांना दिवसातून दोन फोन लावतो ते फोन सुध्दा घेत नाहीत आणि उत्तर सुध्दा देत नाहीत. पी.बी.गायकवाड, श्री. खोराटे साहेबांकडे कंप्लेंट केलेली होती त्यांनी सुध्दा काही ऍक्शन घेतलेली नाही. मी कोहलीचे जे अनधिकृत फ्लेक्स होते ते काढण्याचे काम मी गेले तीन महीने चालू ठेवल होतं. या शहरामध्ये जे अनधिकृत फ्लेक्स लावले त्याबाबत माझी मोहीम होती. मी

आंदोलन सुध्दा केले होते. याच्यामध्ये माझा कुठलाही स्वार्थ नाही. माझी त्यांनी ५० लाखाची खंडणी मागण्याची कंप्लेंट केलेली आहे. जे अनधिकृत फ्लेक्स आहेत त्याबाबत येथून पुढे आमची मोहीम अशीच चालू राहणार आहे. प्रशासनाने याची दखल घेतली नाहीतर उदयापासून माझी ही अशीच माहिम चालू असेल, यामध्ये कुठलाही स्वार्थ नाही एवढेच बोलतो. आपण त्याच्यामध्ये दखल घेवून कोहलीला ब्लॅकलीस्ट मध्ये टाकावे एवढी विनंती करतो.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. कोहलीला कोण अधिकारी पाठीशी घालतो. तुषारने प्रशासनाला पत्रव्यवहार केलेला आहे. त्याठिकाणी आयटी लोक भरपूर आहेत. मेलवर कम्प्लेन्ट येतात. नगरसेवक काहीच करत नाही असे वाटते. त्या माध्यमातून तुषार प्रयत्न केला असेलतर आणि त्या कोहलीन हे जर पाऊल उचललेल असेलतर आयुक्त साहेब आपण देखील पहाव की कोण अधिकारी त्याला पाठीशी घालतात. कशासाठी घालतात. संपुर्ण शहराचे आपण फ्लेक्सच ऑडीट केलेतर आपल्या लक्षात येईल की किती लिगल आहेत हे दिसेल. तुषारची कोहलीने जी खोटी कम्प्लेन्ट केलेली असेलतर त्याची आपण चौकशी करावी, त्याला ब्लॅकलीस्ट करावे. आणि सभागृहात पैशाचा किंवा टॅक्सचा विषय त्यानी काढला असेलतर तो मिनिटस मधुन वगळण्यात यावे अशी मी विनंती करतो आणि कोहलीवर व संबंधित अधिका-याची चौकशी करुन कारवाई करावी असं मा.महापौर साहेब आपण याठिकाणी सांगाव.

**मा.एकनाथ पवार-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सर्व सन्मा.सदस्यांनी याठिकाणी तुषारच्या संदर्भातल मत या सभेच्या समोर आणलेले आहे. मी विनंती करतो की तुषारने सप्टेंबर पासून ज्या अधिका-यांना पत्र दिले, बीटनिरीक्षक जाणुनबूजून त्या गोष्टीकडे दुर्लक्ष करतो. त्या निमीत्ताने दोन्ही अधिका-यांवर निलंबनाची कारवाई करावी आणि त्या ठेकेदाराचे सगळे फ्लेक्स महापालकेनी जप्त करुन महसुलामध्ये वाढ करावी अशा पध्दतीचे मा.महापौर साहेब आपण निर्देष दयावेत.

**मा.महापौर-** आज आपल्या सगळया नगरसेवकांनी आपले सहकारी नगरसेवक तुषार कामठे यांच्यावर जे ठेकेदारांनी आरोप केले त्या संबंधित तो जो कोणी ठेकेदार असेल त्याचा ठेका रद्द करावा आणि जे अधिकारी असतील त्यांची योग्य ती चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करावी. मा.आयुक्तांनी याबाबत योग्य ती कारवाई करावी असे मी आयुक्तांना आदेश देतो.

**मा.निर्मला गायकवाड -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक -२

दिनांक – २८/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ –** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/५७/१८ दि.१२/१/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्रमांक २०३१ दि.१७/१/२०१८ .

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय पीएमसी-३००३/१४९० प्र क्र १२४/०३ नवि-२२ दि.१९/४/२००७ च्या शासन आदेशानुसार पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिकाचे परिवहन उपक्रमाचे विलीनीकरण करून भारतीय कंपनी कायदा १९५६ अन्वये पुणे महानगर परिवहन महामंडळ मर्यादित या अभिनामाची कंपनी स्थापन करण्यास शासनाची मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.एनयुआर-२०१३/प्र क्र.३३८/नवि-३३ दि.१८/२/२०१४ च्या शासन आदेशाप्रमाणे पुणे महानगर परिवहन महामंडळाचे सन २०१६-१७ चे वार्षिक लेख्यांची तपासणी करून संचालन तूट (Operating Deficit) महानगरपालिकेच्या मुख्य लेखा परिक्षक यांनी प्रमाणित करणे आहे. त्याकरिता मा.आयुक्त यांनी विषयांकित कारणासाठी लेखा परिक्षण करणेच्या सुचना दिलेल्या आहेत.

त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य लेखा परिक्षण विभागामार्फत लेखापरिक्षण करण्यात आले असुन त्यातील ठळक बाबी खालीलप्रमाणे.

· महामंडळाचे सन २०१६-१७ चे एकुण उत्पन्न र.रु.५७६.७८ कोटी

. महामंडळाचा सन २०१६-१७ चे एकुण खर्च र.रु. ९२०.५४ कोटी

. एकुण तोटा र.रु. ३४३.७६ कोटी

मनपा व इतर अनुदान वजा जाता एकुण संचालन तुट र.रु. २१०.४४ कोटी

त्याप्रमाणे पिंपरी चिंचवड मनपाचे मुख्य लेखापरिक्षण कार्यालयाकडून पुणे महानगर परिवहन महामंडळाचे सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील **र.रु.२१०.४४ कोटी** संचालन तूट (Operating Deficit) बाबत केलेल्या प्रस्तावा सोबतचे लेखापरिक्षण अहवालास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सारीका लांडगे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पीएमपीएमएलच्या गेले आठरा वर्षे या कामगारांचा आपण सांभाळ करतो आहेत. माझी विनंती आहे की ठराव असा केलेला आहे. ज्या कामगारांची हालत सर्व नगरसेवकांनी, पीएमपीएमएलचे सदस्य

त्याठिकाणी आहेत त्यांना माहिती आहे. अनेकवेळा मागणी करुन सुध्दा कर्मचारी त्याठिकाणी आहेत त्यांची हालअपेष्ठा अतीशय विचीत्र चालू आहे असं अनेकवेळा या सभागृहामध्ये सांगीतल गेल असताना सुध्दा आपण त्या कामगारांना डयुटया चेंज करुन देत नाहीत. इथला जो कर्मचारी आहे त्याला हाडपसर, वडू याठिकाणी आपले कर्मचारी आणि त्यांचे कर्मचारी त्या त्या ठिकाणी ठेवलेले आहेत आपल्या कर्मचा-यांची पिळवणूक होत आहे ती थांबवण्याची आपल्याला विनंती आहे. १७८ कामगार पीसीएमटीचे पीएमपीएमएलने घेतलेले आहेत ते पुन्हा एकदा आपल्या महापालिकेकडे घ्यावेत. आपल्याकडे कामगार कमी आहेत. मी विनंती करतो की ते कर्मचारी घेणेबाबत आपण ठराव केलेला असेलतर त्याची अंमलबजावणी करावी व आपल्या महापालिकेमध्ये घ्यावेत अन्यथा त्यांना कायदेशिर घेता येत नसेलतर आपल्या कर्मचा-याना आपल्या शहरात काम देण्यात यावे अशी विनंती करतो. काल कुंभार म्हणुन कर्मचारी माझ्या वॉर्डात राहत आहे त्याची कहाणी मी ऐकली तो रिटायर्ड झाला आहे. वायसीएममध्ये तो ऍडमीट आहे त्याला पीएफ सुध्दा मिळालेला नाही. एवढी आपल्या कर्मचा-याची पिळवणूक होत असेलतर, सेवा केलेला फंड मिळत नसेलतर यापेक्षा दुर्भाग्याची गोष्ट नाही. त्याठिकाणी जी हिटलरशाही होती ते आता येथून गेलेले आहेत आता नयना गूंडे आलेल्या आहेत. आपल्याला विनंती करतो की कसेही करुन तीकडे जाण्यासाठी आडीच ते तीन तास लागतात व येण्यासाठी आडीच ते तीन तास लागतात. आणि आठ तास डयुटी जर केली असेलतर त्या कर्मचा-यांची मानसीक स्थिती खुप विचीत्र झालेली आहे. यामध्ये मा.महापौर साहेब, आपण लक्ष दयावे. जे जे सदस्य त्या समितीवर आहेत त्यांनी आपल्या कर्मचा-यांना याठिकाणी आणण्यासाठी प्रयत्न करावेत एवढी विनंती करतो.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. दत्ताकाका साने यांनी मांडलेली अत्यंत महत्वाची सूचना आहे. आपले १७८ कर्मचारी तिकडे गेले एक ते दिड वर्षे आपल्या महापालिका परिसरातून रोज अपडाऊन पुणे येथे करतात. गेली पुर्ण त्यांची सर्व्हिस पाणीपुरवठा, विदयूत, टॅक्स विभाग या विभागात झालेली होती परंतु तुकाराम मुंढे यांनी पुणे महानगर परिवहन महामंडळाकडे वर्ग करुन घेतलेले आहे. माझ्या प्रभागामध्ये एक व्यक्ती आहे त्याला ब्रेनटयूमर आहे. दहा ते पंधरा दिवस तो माझ्याकडे आला, सत्तारुढ पक्षनेत्यांची सुध्दा त्याने भेट घेतलेली होती. तो रडत होता की उदया मी राजीनामा देतो मला सर्व्हीस करायची नाही असा म्हणत होता एवढा तो त्रस्त झालेला कर्मचारी होतो. ही तीसरी वेळ आहे या कर्मचा-यांच्या विषयावर आपण चर्चा करतो. हा विषय गांभीर्याने आपण विचारात घेतला पाहीजे. १७८ लोकांना आपल्या महापालिकेत पुन्हा एकदा कायमस्वरुपी घेतले पाहीजे अशी मी मागणी करतो. आपले पिंपरी चिंचवड शहर स्मार्ट सिटीमध्ये आलेले आहे. बीआरटीएस रस्ते सोडलेतर आजूबाजूचा परिसर आहे त्याठिकाणी बससेवा उपलब्ध करुन दिलेली आहे. पिंपरी असेल, काळेवाडी असेल अख्या पिंपरी चिंचवड शहरात दोन-तीन दिवसापुर्वी सर्व

वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी दिलेली होती. जेवढे ज्येष्ठ नागरीक, विदयार्थी वर्ग, अपंग, अंध लोक असतील आता उन्हाळा चालू झालेला आहे काही काही ठिकाणी अक्षरश: बसस्टॉप उभे केलेले नाहीत. अक्षरश: कडक उन्हामध्ये हे लोक बसची वाट बघत असतात. अशा काही घटना घडलेल्या आहेत या शहरामध्ये की एखादा व्यक्ती उन्हामध्ये उभा आणि तो उन्हाने सुध्दा एक्सपायर झालेला आहे. माझी या सभागृहाच्या वतीने तुम्हांला नंम्र विनंती आहे की ज्या ज्या ठिकाणी आपले इन्टरनल जेवढे रस्ते आहेत, ज्या ज्या ठिकाणी पीएमपीएलची बससेवा सर्वसामान्य नागरीकांसाठी केलेली आहे त्या त्या ठिकाणी आपण चांगले सुसज्ज असे बसस्टॉप उभे करावेत. जेणेकरुन उन्हाळा असेल, पावसाळा असेल त्या लोकांना तिथं व्यवस्थितपणे थांबता येईल त्याचप्रमाणे त्या त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. कारण की एवढया मोठया प्रमाणात आपण निधी वर्ग करतो परंतु आपल्या नागरीकांची आपण काळजी घेताना दिसत नाहीत. हा विषय जिव्हाळयाचा आहे महत्वाचा विषय आहे याकडे लक्ष दयावी अशी विनंती करतो.

**मा.संदीप वाघेरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पीएमपीएमएलवर एक वर्ष झाले विषय चालला आहे. तुकाराम मुंढे साहेब हे तुकलकी महंमद आहेत. ते जेव्हा पासून पीएमपीएमएलला आले तेव्हापासून आपल्या १७८ कर्मचा-यांवर अन्याय झाला, जे सतरा वर्षे आपल्या महापालिकेच्या अस्थापनेवर होते. त्यांनी तातडीचा आदेश काढला आणि त्यांच्या अस्थापनेवर घेतले त्यांना कात्रज-हाडपसर, पुण्यामध्ये वेगवेगळया ठिकाणी त्यांना जॉब दिले आहेत. सकाळी ६ वाजता त्यांची डयुटी असते ते सकाळी चार वाजता पाच वाजता उठणार म्हणजे आठ तासाचे काम त्यांना बारा तास कराव लागत होतं. त्या परिस्थितीमध्ये आमच्या येथील एक राजु परदेशी म्हणून आहे त्याला पॅरेलीसेसचा अटॅक आला त्याला दोन मुलीं आहेत. तो कात्रजला जावुन कधी येणार. शेवट तो राजीनामा देण्याच्या विचारात आला. आज १७८ मधले १४३ कर्मचारी राहीलेले आहेत. बाकीचे कोणी रिटायर्ड झाले त्यातले तीन अटॅकने मेले. चार जणाना अटॅक आला. मा.महापौर साहेब आपण किती दिवस त्यांचा अंत बघायचा. आपल्या जीबी मध्ये मागे ठराव झालेला आहे त्याची अंमलबजावणी करुन, मॅडमला सांगुन त्यांची अस्थापना आपल्याकडे वर्ग करून घेता येईल आणि त्यांना कमीत कमी आता दोन-चार वर्षे राहीलेले आहेत ते सुखाचे तरी जातील. त्यांच्या बद्दल सहानुभूतीपुर्वक विचार करत नाहीत. फक्त चर्चाच करतो. अजून किती चर्चा करायची, एवढे बोलून थांबतो.

**मा.पंकज भालेकर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज आपण याठिकाणी पीएमपीएमएल या विषयावर चर्चा करतो. त्यांना दरवेळेस निधी देण्यासाठी विषय येतो त्यावेळेस कर्मचा-यांचा विषय बोलला जातो. त्यानंतर कोणी याठिकाणी लक्ष देत नाहीत. मला वाटते की चार पाच जीबी पुर्वी याठिकाणी ठराव झालेला होता १७८ कर्मचारी महापालिकेमध्ये पीएमपीएमएलचे पुर्वी काम करत होते त्यांना परत घेण्यासाठी ठराव झालेला

होता. त्याच्यानंतर आजपर्यंत पीएमपीएमएलला पत्र सुध्दा दिलेले नाही. मी प्रशासनाला वारंवार विचारले त्यांनी सांगीतले की सर्व विभागातून माहिती मागवतो. साध मागणीचे पत्र सुध्दा आपल्या महापालिकेकडून पीएमपीएमएलला गेलेले नाही. यात लक्ष घातले पाहीजे. हे कर्मचारी सोळा सतरा वर्षे आपल्याकडे काम करतात त्यामुळ आज त्यांची जबाबदारी आज आपली आहे. सर्व सन्मा.नगरसवेकांनी सांगीतले त्याप्रमाणे आपण १७८ कर्मचा-यांचे पत्र पीएमपीएमएलला आपल्याकडे घेण्यासंदर्भात दयावे. मागच्या वेळेस मी सांगीतलेलं होत पीएमपीएमएलचे कर्मचारी आजारी पडतात, त्यावेळेस ते हॉस्पिटलमध्ये असतात जो ऍडव्हान्स मिळतो तो घेण्यासाठी सुध्दा त्यांना पुण्यामध्ये जावे लागते. मागच्यावेळेस सांगीतले होते एक कर्मचारी आजारी पडला त्याच्या ऍडव्हान्स पेमेंटची प्रोसेस करण्यासाठी मी स्वत: पुण्यामध्ये गेलेलो होतो. याठिकाणी कोणी पीएमपीएमएलचे अधिकारी आलेले असतीलतर त्यांना कृपया सांगावे की निदान आपल्या परिसरातील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील जे वास्तव्यास असलेले कर्मचारी आहेत त्या कर्मच-यासाठी ऍडव्हान्स स्किम तरी आपल्या महापालिकेमध्ये पहील्यासारखी राबवावी जेणेकरुन त्यांना हेलपाटे मारायला लागायचे नाहीत. एवढे सांगतो आणि थांबतो.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या सभागृहातले कामगार क्षेत्रामध्ये निवडून आलेले बरेचसे नगरसेवक आहेत. जो माणूस सर्व्हिसला लागतो आणि सर्व्हिसला लागल्यानंतर त्याच ५८ व्या वर्षापर्यंत नियोजन असते, ते नियोजन करताना त्याचा संसाराचा आणि घराचा गाडा ओढता ओढता तो कामावर जात असतो. आपण प्रत्येक वेळेस त्यांनी निधीची मागणी केली की आपण तो विषय घेतो. आताच माझ्या सहकार्यानी सांगीतले त्याप्रमाणे आपण निधी पुरता त्यांचा विषय घेतो पण ते कामगार खरच वा-यावर सोडले जातात. आपल्या कामगारासाठी पीएमपीएमएल सावत्र भावाची वागणूक का करतय. प्रत्येकवेळेस चर्चा झाल्यानंतर त्याचा निधी मंजूर करतो. मा.महापौर साहेब, माझी विनंती आहे की खरच त्यांचा निधी आडवा. पहिल्यांदा कामागारांचा विषय होवू दयावा आणि मग त्यांचा निधी दया. आपल्याकडून कुठलाच पत्रव्यवहार पीएमपीएमएलला केला जात नाही. आपल्याकडे बंद रुट चेंज करायचे म्हणलेतरी आपल्याला कुठलाच अधिकार नाही. एक दिवस त्यांना सभागृहात बोलवावे आणि हे सगळे विषय करा व कामगारांचा विषय मार्गी लावावा व नंतर त्यांचा विषय करावा असं मला वाटत, धन्यवाद.

**मा.हर्षल ढोरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. गेल्या कित्येक दिवस हा पीएमपीएमएलचा विषय आपण सभागृहामध्ये घेत असतो. या विषयाची कुठेही गांभीर्याने दखल घेतली जात नाही. स्थायी समितीमध्ये सदस्य म्हणून मी गेले एक वर्षे काम करतो. आमच्या सभापती सिमाताई सावळे यांनी अनेक वेळा मुंढे यांना आमंत्रीत केले की तुम्ही या, आम्हांला पीएमपीएमएलचे प्रश्न तुमच्या समोर मांडायचे आहेत. फक्त निधीसाठी पिंपरी चिंचवड

महापालिका आहे का ही खरोखर आमच्या सर्व नगरसेवकांच्या मनामध्ये शंका आहे. जेव्हा फक्त निधीचा विषय येतो तेव्हाच आपल्यापुढे हा विषय येतो. परंतु आज १७८ कर्मचारी याच्यामधले जवळ जवळ ७५ टक्के कर्मचारी हे येत्या सहा महीन्यात रिटायर्ड होणार आहेत. ज्यांच वय झाल आहे अशा कर्मचा-यांना तुम्ही डायरेक्ट कात्रज, हाडपसर अशा ठिकाणी त्यांना काम करण्यासाठी पाठवतात. तो कर्मचारी सकाळी घरातून निघाला की तो रात्री १२.०० वाजताच घरी येणार अशा प्रकारची विचीत्र वागणूक आमच्या कर्मचा-यांना दिली जाते. मी मा.महापौरांना आणि आयुक्त साहेबांना एवढीच विनंती करतो की हा विषय सगळयाच नगरसेवकांचा विषय आहे. खरच आपल्या १७८ कर्मचा-यांना पुन्हा एकदा आपल्या पिंपरी चिंचवड महापालिकेत घ्यावे असे तुम्ही आदेश आयुक्तांना दयावेत अशी विनंती आहे, धन्यवाद.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पीएमपीएमएलचा विषय यावेळेला मुख्यलेखापरिक्षणासाठी त्यांनी आपल्याकडे अहवाल पाठविलेला आहे. मा.आयुक्त साहेब खरेतर अशी खुप मोठी अपेक्षा होती की तुकाराम मुंढे साहेब ज्यावेळेला आपल्याकडे पीएमपीएमएलला आले त्यावेळेला बसमध्ये काहीतरी चांगल्या सुधारणा होतील, उत्पन्नामध्ये खुप चांगल्या पध्दतीने वाढ होईल परंतु म्हणतातना की मुलांना खुप धाक लावलातर उलट होत असते. आपण घरामध्ये मुलाला जर खुप धाक लावायला गेलतर मुल बीघडताताच. ज्यावेळेला मुंढे साहेबांनी खुप धाक लावण्याचा प्रयत्न केला परंतु  येथे तुम्ही चार्ट दिलेला आहे या चार्टमध्ये मागील वर्षापेक्षा आजपर्यंत मोठी तूट आलेली आहे. ७१०.४९ एवढ उत्पन्न मागील वर्षी होतं आणि या वर्षाची ५७७.८५ असे उत्पन्न आहे. किती मोठी तूट यामध्ये आहे. आपले कर्मचारी वारंवार सांगत होते, तुम्ही ऐकलेल आहे तुम्ही कर्मचा-याशी बोललेले आहात की याच्यामधुन आम्हांला शिक्षा देवून पीएमपीएमएल मध्ये सुधारणा होणार नाही. कारण तेथे प्रायव्हेट ज्या बसेस आहेत त्याच बसेस ऑनरुट आहेत त्यामुळे आपल्या लोकांना घरी बसावे लागते. म्हणजे हे तुकाराम मुंढे साहेबांनी केलेलं काम आहे असं मी म्हणणार नाही, शंभर टक्के. त्यांच्या खाली असलेले दोन तीन अधिकारी आहेत या दोन तीन अधिका-यांनीच हे सगळ त्यांच्याकडे शिजवलेल हे सगळ प्रकरण आहे. त्यामुळे बाकीच्या लोकांना त्रास झालेला आहे. की आपल्या पिंपरी चिंचवडच्या लोकांना वेळेवर बस मिळणार नाही म्हणून त्यांना लांब इकडून तीकडे टाका. त्यांच्या काही लोकांना त्यांनी शिक्षा केलेली असेल की जे त्यांचे आवडते नाहीत म्हणून. मी नेहमी सांगते की आपल्याकडचा क्लास वन अधिकारी एकच आहे परंतु शेवटी त्यांना घरी बसविल्या शिवाय ते लोक गप्प बसले नाहीत. आपण मगाशी एका ठेकेदाराबद्दल बोललो की त्या माणसानी त्रास दिला म्हणून आपण आपल्या नगरसेवकाची बाजू घेतली, आपण त्या नगरसेवकाच्या बाजूने आहेत कुठल्याही ठेकेदाराची हिम्मत होता कामा नये. पण ज्यावेळेस पीएमपीएलमध्ये अधिकारी लोक असे वागतात तेथे हे सर्रास घडत. त्यावेळेला कोण बघणार. तुम्हांला नावानिशी सगळे कर्मचारी

त्यांच प्रतिनीधीत्व म्हणून आम्ही तुमच्या पुढे घेवून आलेलो होतो. १७८ सस्पेन्ड केलेले आहेत त्यांच्या तारखा बघा म्हणजे तारीखा वेगळया आहेत त्यांची अनुपस्थिती वेगळया दिवशी दाखवली आणि निलंबीत केलेले आहे असे कर्मचारी आहेत. अशाप्रकारचा सगळा सावळागोंधळ आहे. कोणताही बीझनेस एवढा सगळा सपोर्ट असताना एवढया लॉसमध्ये जातो, किती दिवस करायचे. आपल्या नागरीकांच्या सेवेसाठी आपण तो ट्रान्सपोर्ट विभाग सांभाळतो. जस आरोग्य विभाग आपल्याला कम्पलसरी सांभाळायला पाहीजे त्याच पध्दतीन ट्रान्सपोर्ट विभाग पण सांभाळायला पाहीजे. आपण हे सर्व करत असतो परंतु तुमच्या सारखी मोठया लेव्हलची माणस असताना हा धंदा आपला तोटयात जातोच कसा. जसे जाहीरातीचे किती दिवसाचे पैसे भरलेले होते, फ्लेक्सच्या बोर्डचे. मग ते इतके दिवस फ्लेक्सचे बोर्ड तेथे ठेवले का का पुढे अजून चार महीने कुणाच्यातरी अज्ञाने चालले हे पीएमपीएमएलमध्ये बघीतल जात का. त्यांच्या कितीतरी इमारती भाडयाने दिलेल्या आहेत त्यांच भाड येते का, कितीतरी पीएमपीएमएलच्या बसवर जाहीराती आहेत या जाहीराती महिनोमहीने तशाच चाललेल्या असतात. त्याचा रेव्हेन्यू बुडतो का. पीएमपीएमएलला २१० कोटी दयायचे आहेत. १४०२ बसेस ऑनरोडवर चालतात. ६५३ बसेस ऑफ रोड आहेत. एवढया बसेस बंद असतील आणि तुम्ही प्रायव्हेट बसेस घेणार असालतर मग सगळ प्रायव्हेट करानां. तुम्ही ठेकेदाराच्या बस वापरा त्यांच्याकडून आपल्याला उत्पन्न मिळेल. एवढी तूट भरुन काढून परत त्यांना सगळया गोष्टी दयायच्या असतीलतर त्याच्या ऐवजी तुम्ही सगळया ठेकेदाराच्याच बसेस घ्या किंवा आपण घेतलेल्या बसेस कम्पलसरी तुमच्या कडे बस आल्या असतीलतर ठेकेदाराला चालवायला दया. पिंपरी चिंचवड मधील बहुतांशी पासकेंद्र बंद केलेले आहेत. लोक म्हणतील आमच्या येथे पास केंद्र नाही आम्ही कुठ लांब जावुन पास काढायचा. लोक हुशार आहेत, ओला, उबर सारख्या गाडया दारात येवून सोडतात. रिक्षा आहेत, उबर रीक्षा चालू झालेल्या आहेत. फोन केलातर दारात येतात. ज्याठिकाणी जायचे त्याठिकाणी सोडतात. मग बससाठी पास केंद्र ते सुध्दा कुठतरी लांब जायच आणि त्याच्यासाठी १०० रु. खर्च करायचा. ही पिंपरी चिंचवड कामगार नगरी आहे या नगरीतील नागरीकांसाठी ट्रान्सपोर्ट आणि आरोग्य हे पाहीजे का तर त्या रक्त वाहीन्या आहेत. हे सुरळीत चालू ठेवायचे असेलतर आणि लोकांना जर चांगल्या सुविधा दयायच्या असतीलतर याठिकाणी चांगल लक्ष घातले गेले पाहीजे. दरवेळेला हा विषय येतो कर्मचा-यांना त्रासदायक आहे. स्टार प्रवाहला त्यादिवशी त्यांची मुलाखत दाखवत होते. मी म्हणलं हे कर्मचारी टिव्हीवर दिसले, झाल म्हणल आता यांनातर काढून टाकतात की काय आता. ते कर्मचारी टिव्हीवर दिसत होते पण भीती आम्हांला वाटत होती. कारण शेवटी ते लोक आमच्याकडेच येणार आहेत. आम्हांला असं केल, आम्हांला तसं केल, आम्हांला ती शिक्षा दिली. ही सगळी लोक कोर्टात गेली, मग कोर्टाचा खर्च कोण करणार. एवढे पैसे त्यांच्याकडे आहेत का. त्यांना एवढा पगार आहे का, एवढा खर्च करुन ते लोक काय काम करणार. आणि म्हणून धाक हा नक्की

असला पाहीजे. परंतु हा धाक लावत असताना आपले उत्पन्न किती खाली गेले. २१०.४९ कोटीची आपल्याला तूट भरुन काढायची, या सगळया गोष्टीचा विचार करायचा आहे. थोडया दिवस निधी न देता काय होते ते बघु. आपल्या कर्मचा-यांना जर वाईट वागणूक देणार असतीलतर तिथे तुम्हां-आम्हांला सन्मान नसेल, तुम्ही लोक काम करणार नसालतर, आपल्या येथील पास केंद्र बंद करणार असतीलतर आपल्या नागरीकांना कर्मचा-यांना त्रास होणार असेलतर मग काय म्हणून आपण ती पीएमपीएमएल करायची, आता खरच पश्चाताप होतोय की ती कंपनी केली नसतीतर बरं झाल असतं. काम करत असताना जो काम करत असतोना तोच विचार करत बसतो. जो काम करतो तो चुकतो, चुकला म्हणजे काम करायचे नाही असं नसतं. आणि म्हणून ज्यावेळेला आपण काम करतो त्यावेळेला कोणालाही असं स्वप्न नव्हते पडल की पुढ ही पिंपरी चिंचवड आज जसे आपण गाव समाविष्ट करण्याचा विचार करतो गांवाना आपण निधी देण्याचा विचार करतो तसच लिंक असली पाहीजे पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये लोकांना सहजरित्या इकडून तीकडे लवकर चांगल्या दृष्टिकोनातून ट्रान्सपोर्टेशन असले पाहीजे. उदया मेट्रोचे सुध्दा असच होवु शकतं. मग समोरच्यानी तसंच हसायच कां. आणि म्हणून ज्यावेळेला आपण करारनामा करतो, काम करतो तो चुकतो. दुरुस्ती करुन घ्या. आम्हांला पिंपरी चिंचवडचा स्वाभिमान आहे पुण्या बरोबर पिंपरी चिचवडचे नाव टाकले गेले पाहीजे. ते सुध्दा सांगीतल गेल पाहीजे. आमचे नाव टाकले गेले पाहीजे. या पध्दतीने याचा विचार केला पाहीजे. तो पर्यंत हा विषय तहकूब ठेवावा. जो पर्यंत चांगल्या गोष्टीचे निर्णय आपल्याला मिळत नाहीत तोपर्यंत, एवढीच माझी विनंती आहे.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज हा विषय याठिकाणी आलेला आहे. मला वाटत त्यांचे जवळ जवळ सगळे पैसे दिलेले आहेत एखादाच हाप्ता राहीला ते पैसे देण्या अगोदर आपले जे १७८ कर्मचारी आहेत त्या कर्मचा-यांचा प्रश्न सोडवावा. त्यांना सांगा की या लोकांना त्यांच्या जवळच्या ठिकाणी दया, त्यांचे हाल पाहीलेले आहेत. ब-याचशा लोकांनी व्हीआरएस घेतली आहे. आज ते कर्मचारी नौकरी सोडण्याच्या तयारीत आहेत. परंतु ही जी पीएमपीएमएल आहे ती पब्लिक ट्रान्सपोर्टसाठी आवश्यक आहे. सगळया गोष्टी मान्य असताना त्यांचा किती तोटा आपण सहन करायचा. याठिकाणी लेखापरीक्षण अहवाल सादर केलेला आहे असे त्यात म्हणलेले आहे. सिंगापुरला जा, तुम्ही दुबईला जा, युएसला जा त्याच्या बसवरती पब्लिक ट्रान्सपोर्टवरतीच फक्त ॲड आहे. या ॲडवरती त्या भागातल पब्लिक ट्रान्सपोर्ट चालवत. अशाप्रकारचा आपण व्यवस्थित प्लॅन केलातर चांगले होईल, कारण आपण पैसे देतो त्यामुळे आपल्याला बोलण्याचा हाक्क आहे. आपण काही गोष्टी अशाप्रकारे सुचवल्या तर बरे होईल. शहराची पब्लिक ट्रान्सपोर्ट ही रक्तवाहीनी आहे. २५ ते ३० टक्के बसेस ठेकेदारामार्फत आहेत. आज त्यांचेच कागदपत्रावरुन दिसतय की त्यांच्या इमारतीचे भाडे ५ कोटी पेन्डीग आहे. ते सुध्दा वसुल करत नाहीत. हे

अधिकारी आपल्याला सांगतात की तुम्ही पैसे दया. मला तर वाटतय आपण जवळ जवळ सगळे पैसे दिलेले असताना काही शुल्लक पैशासाठी हा विषय का आणला गेलेला आहे. हा विषय फक्त  लेखापरिक्षण अहवाला सांगण्यासाठीच समोर आलेला आहे. अगोदर किती पैसे दिलेले आहेत ते सुध्दा यामध्ये टाका. आमची एकच विनंती राहील की राहीलेले पैसे देताना आपल्या कर्मचा-यांवर जो अन्याय झाला त्या कर्मचा-यांना पहीला न्याय दया. माझी संपुर्ण सभागृहाच्या वतीने आपल्याला विनंती असेल की हे पब्लिक ट्रान्सपोर्ट आहे हे कसे तोटयातून बाहेर निघाले यासाठी त्या अधिका-यांना इकडे बोलवा, आज आपल्या शहरात पीएमपीएमएलच ऑफीस नाही. आपल्याला तीकडच जाव लागतं. मी मागच्यावेळेस पण सांगीतल होत की तुम्ही एखाद याठिकाणी ऑफीस करा. आपल्या लोकांना काही अडचणी असतीलतर आपण त्यांच्यापर्यंत जाऊ शकू. एखादा रुट वाढवायचा असेलतर यठिकाणी कोणी अधिकारी आहेत का, आम्हांला तुम्ही सांगा की तुम्ही या या माणसाला भेटा. हे तुमची काम करतील. या रुटवर बस पाहीजे, या रुटवर बस नको हे सांगण्यासाठी असं कोणी आहे का. मा.महापौर साहेब, माझी पुन्हा एकदा विनंती आहे की हा शेवटचा हाप्ता देताना पुर्वी तुकाराम मुंढे ऐकत नव्हते मान्य आहे पण आता आपल्याच पदाधिका-यांच्या सांगण्यावरुन त्यांची बदली झाली आणि आता नयना गुंडे आलेल्या आहेत तरी आपण लक्ष घालून कर्मचा-यांना न्याय दयावा, त्यानंतरच हे कराव, धन्यवाद.

**मा.आशा धायगूडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ख-या अर्थाने पीएमपीएमएलचा विषय सभागृहात आला की निश्चितपणे नवीन असो, जुने असो, ज्येष्ठ नगरसेवक असो प्रत्येकाची भावना असते की मी या विषयावर बोलले पाहीजे. याच्या मागच एकच कारण असंत की माझ्या शहरातील काही नागरीक त्या पीएमपीएमएलचे कर्मचारी आहेत त्यांना न्याय मिळावा आणि म्हणून प्रत्येकाची इच्छा असते की आपण आपले विषय, आपले विचार या सभागृहात मांडले पाहीजे. माहित नाही तो कोणता दिवस होता, काय आपल्या सभागृहाला बुध्दी सुचली असेल म्हणून पीसीएमटी आणि पीएमटी आपण एकत्रीत केली आणि ज्या दोन टोकाच्या भूमीका असणा-या दोन शहराना आपण एकत्र पीएमपीएमएलच्या नावाखाली स्थापन्याचा प्रयत्न केला. पीएमपीएमएल  कसे केले, का केले हे आता जवळपास या सभागृहाला माहिती आहे. पीएमपीएमएल केल खर परंतु याच्या उपर कोणता दृष्टिकोन होता हे माहित नाही. आपण सगळेच्या सगळे अधिकार तिथ असणारे एमडी जे असतात त्यांना ते प्रधान केलेले आहेत त्यामुळे आजची अवस्था काय आहे ती माहिती आहे त्यामुळे आपल्या सभागृहाच्या वतीने किंवा आपल्या महापालिकेच्या वतीने, आपले महापौर असतील, स्थायी चेअरमन असतील, आयुक्त असतील हे त्याठिकाणी प्रतिनिधीत्व करतात ते लीट्रली सहीसाठी किंवा त्यांच्या हो ला हो म्हणण्यासाठी जातात अशी काहीशी अवस्था आहे. मग त्याठिकाणी तुकाराम मुंढे साहेब आले त्यावेळेला भारतीय जनता पार्टीची सत्ता होती म्हणून सभागृहात

आणण्यासाठी सिमाताईनी प्रयत्न केला. महापौर असतील त्यांनी प्रयत्न केला, आयुक्तानी प्रयत्न केले परंतु या प्रयत्नास आपल्याला फारसे यश मिळाले नाही. कारण आजपर्यंत जी परंपरा होती की तीकडचे जे एमडी असतात ते आजपर्यंत कधीही आपल्या सभागृहात त्यांनी पाऊल ठेवलेला नाही, आणि पुढे तीच परंपरा चालू ठेवण्याचा प्रयत्न मुंढे साहेबांनी केला. येथून पुढच्या काळामध्ये आपल्या शहरातील कर्मचारी त्याठिकाणी असतीलतर त्यांच्याशी कशाप्रकारची वागणूक किंवा वर्तणुक असली पाहीजे त्याच्यावर कुठेतरी सभागृहाने, महापौर म्हणुन, आयुक्त म्हणुन आपण सर्वांनी एकत्रीत बसून निर्णय घेण्याची गरज आज झालेली आहे. मा.महापौर साहेब, आज १५८ कर्मचारी होते, मागच्यावेळेस ११३ कर्मचारी आलेले होते ज्यावेळेस त्यांच्यावरती कारवाई होते, त्यांना कोणत्या ना कोणत्या आरोपाखाली कामावरुन निलंबीत केले जाते असे एक ना अनेक प्रकार त्याठिकाणी घडत असतात आणि त्याठिकाणी कुठेतरी पीएमपीएमएलच्या माध्यमातून फक्त हुकूमशाही पध्दतीने कामकाज केले जाते त्यांच्यावर आपल्या महानगरपालिकेचा कुठेतरी अंकुश असला पाहीजे. कारण आज २१० कोटीची तुट असेल किंवा अनेक निधी त्यांना महानगरपालिकेतून देतो ते पैसे तुमच्या ना माझ्या कुणाच्याच घरचे नाहीत. त्याठिकाणी दिलेले पैसे हे सगळया करदात्या नागरिकांचे आहेत. जे कररुपी पैसे आपल्या पालिकेत देतात त्यातन दिलेली जी अमौंट आहे ती आपल्या शहराच्या विकासासाठी लागली पाहीजे. ख-या अर्थाने पीएमपीएमएल किती वर्षे तुटीवर राहणार आहे, त्यांना कधीतरी स्वत:चा संसार उभा करता येणार आहे का, हा संशोधनाचा विषय असणार आहे. मा.आयुक्त साहेब, मा.महापौर साहेब, येथून पुढच्या काळामध्ये जर आपल्या सगळयांना एकत्र राहायच असेल पीएमपीएमएल चालु ठेवायची असेलतर मा.महापौर, मा.स्थायी समिती अध्यक्ष, आयुक्त असतील यांच्या म्हणण्याला सुध्दा एक वेगळ वजन, एक वेगळा दर्जा त्याठिकाणी प्राप्त झाला पाहीजे यादृष्टिकोनातून तुम्ही ही पाउल उचलली पाहीजेत नाहीतर असेच राहणार. प्रत्येकवेळेला विषय आला की प्रत्येक नगरसेवकाला वाटत माझी भुमीका मांडली पाहीजे. माझे विषय मांडले पाहीजे. परंतु हे फक्त सभागृहात भाषण म्हणून कागदावर राहणार असं न होता यापुढील काळात त्यांच्याशी झालेला करारनामा जो कोणी स्वार्थ म्हणून केलेला असेल कोणत्या पध्दतीने केलेला असेल, माहित नाही मला. परंतु जे केल गेल आहे ते अत्यंत चुकीच केल गेल आहे. त्याच्यावर आपल्याला येथून पुढच्या काळामध्ये बदल करायचे असतीलतर निश्चितपणे मा.महापौर साहेब आपल्याला त्यांच्याशी झालेला करारनामा जो आहे त्याच्या मधल्या मुद्दयाना हात घातल्याशिवाय आपण आपल्या कर्मचा-यांना कोणत्याही प्रकारचा न्याय यापुढच्या काळात देवू शकणार नाही हे तुम्हीही मान्य केल पाहीजे. नुसते बोलले आणि येथे विषय मांडले, प्रत्येकवेळेला तेथे येणारा एमडी काम करेल हे कोणीही सांगू शकत नाही. नियमामध्ये चांगल्या प्रकारची रचना केलीतर निश्चितपणे आपण चांगल्या प्रकारचे काम येथून पुढील काळात करु शकु. नयना गुंढे मॅडम आलेल्या आहेत. मला विनंती करावीसी

वाटते की यापुढे प्रत्येक जीबीला आपण त्यांना निमंत्रीत केले पाहीजे. त्यांनी सुध्दा आपल्याकडन एवढया मोठया प्रमाणात रक्कम ते घेत असतीलतर त्यांनी सुध्दा आपल्या महानगरपालिकेच्या जनरल बॉडी मिटींगला हजर राहणं हे तुम्ही त्यांना बंधनकारक करण ही यापुढच्या काळाजी गरज असेल. त्याशिवाय आपल्या लोकांना न्याय मिळणार नाही. अनेकांनी अनेक मुद्दे सांगीतले की आपले कर्मचारी इकडून तीकडे जातात, काय अवस्था होते. मा.महापौर साहेब, आज तुम्हांला सांगू इच्छते की फक्त आपल्या महापालिकेचा पीसीएमसी मधला फक्त एकच अधिकारी पीएपीएमएलमध्ये काम करतो त्यांना सुध्दा निलंबीत केलेले आहे. अशाप्रकारची अवस्था, अशाप्रकारची अवहेलना जर पीएमपीएमएल आपल्या कर्मचा-यांची करत असेलतर ते आपण सहन करण्याचे कारण नाही. परंतु मी तुम्हांला सांगीतल की तुम्ही, मी येथे बोलून होणार नाही त्यावेळेला जे सभागृहात असतील त्यांनी जो करारनामा केलेला आहे त्याच्यामध्ये जोपर्यंत तुम्ही योग्य ते बदल करणार नाहीत तोपर्यंत तुमच्या माझ्या चर्चा फक्त चर्चाच राहील याच्यावरती ठोस निर्णय होणार नाही. ठोस निर्णय यापुढच्या काळात घ्यायचे असतीलतर पीएमपीएमएलला अनुदान किंवा रक्कम आपण सभागृहाच्या वतीने देतो, आपली पब्लिक ट्रान्सपोर्ट चांगली चालली पाहीजे म्हणून मदत करतो, ती जर करायची असेलतर त्यांचे प्रत्येक वर्षाला आपल्याकडे जी कठोरी येते की आम्हांला पैसे दया त्यात जर पैसे टाकायचे असतीलतर तुम्हांला सुध्दा पीएमपीएमएलमध्ये केलेले करारनामे जे आहेत त्याच्यातल्या काही मुद्दयाना हात घालावा लागेल. त्यात बदल करावे लागतील तरच आपण शहरतील नागरीकांना जे तेथे कर्मचारी म्हणून काम करतात त्यांना न्याय देवू शकू. असं माझ म्हणण येथे मांडते, धन्यवाद.

**मा.उषा उर्फ माई ढोरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पीएमपीएमएलचा विषय १९८६ पासून गाजत आलेला आहे. ९२ साली प्रथम ३३ टक्के महिला झाल्या त्यावेळेला पीसीएमटी होती. तेव्हा देखील पीएमपीएलची परिस्थिती अशीच होती. खरेतर आपण बाकीच्या सुविधा देत असताना वाहतूक व्यवस्था देखील आपल्याकडून चांगल्या पध्दतीने झाली पाहीजे. पीसीएमटीची सुधारणा व्हावी यासाठी भरपुर प्रयत्न केलेले आहेत. आयुक्त श्रीनिवास पाटील होते त्यांनी कोंडे साहेबांकडे पीसीएमटीचा चार्ज दिला. त्यानंतर अनेक कर्मचारी, अधिकारी आले पीसीएमटीची परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला पण काही केल्याने ती त्यावेळेस परिस्थिती कंट्रोलमध्ये आलेली नाही. तीचा जो बोजा होता तीची जी आर्थीक परिस्थिती होती ती नेहमी कमकुवत होती. शेवटी असा निर्णय घेतला गेला की पुणे महापालिका आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका या दोन्ही मिळून एक कंपनी तयार करु. त्यावेळेला जे नेते होते त्यांनी व सभागृहाचे जे नगरसेवक होते त्यांनी एकमताने विषय केला गेला व पीएमपीएमएल अशी संस्था स्थापन केली. काही करुन त्याठिकाणी कंट्रोल पाहीजे. त्याचा आर्थीक दर्जा सुधारला पाहीजे. कर्मचा-यांना काम मिळाले पाहीजे. हा चांगला हेतू ठेवून त्यावेळेला ती कंपनी केली

गेली. त्याच्यानंतर आपण सर्वांनी मुंढे साहेब आल्यानंतर त्यांना भरपुर प्रयत्न केलेला आहे. पीएमपीएमएलची परिस्थिती सुधारली पाहीजे, कर्मचा-यांनी काम करायला पाहीजे. दिलेली जबाबदारी त्यांनी योग्य प्रकारे पार पाडली पाहीजे. यासाठी त्यांनी देखील प्रयत्न केले. पण फारच हातातून गेलेली एखादी केस असेलतर तीला किती आपण वर उचलायच. १७८ कामगारांचा मोठा प्रश्न आहे. आज ज्यावेळेस महापालिका झाली त्यावेळेस महापालिकेत स्थापत्य समिती, विधी समिती, वैदयकीय समिती होती त्याचप्रमाणे दळणवळण किंवा आपले ट्रान्सपोर्ट चांगले असले पाहीजे म्हणून पीसीएमटीचा कारभार हा आपण चालू केलेला आहे. त्यावेळेला महापालिकेत आपल्या शेतक-यांची मुल कामाला लागली पाहीजेत या हेतूने हे कर्मचारी कामाला लागलेले आहेत. खरंतर हा सावत्र आईचा मुलगा म्हणून आपण कधीही त्याच्याकडे पाहू नये. गुंडे मॅडम आलेल्या आहेत आपण त्यांच्याशी विचार विनीमय करुन पिंपरी चिंचवड मधील कर्मचारी या भागात कसे काम करतील हे बघावे. पुर्वी डेपो होते भोसरी डेपो, संततुकारामनगर डेपो, निगडी डेपो ते डेपो परत आणण्याचा आणि सील करण्याचा प्रयत्न करावा. महापौर आपण नशीबवान आहात परत पीसीएमटी तुमच्या ताब्यात आल्यासारखी होईल. आपण आपल्या माणसाकरीता आपल्या जनते करता हा जो कारभार आहे तो कसा पध्दतशिर याठिकाणी चालू होईल. अनेक महीला आहेत आपल्याला सगळयांना माहिती गजानन मंदीर सोहळा वेळेस त्या मंदीरामध्ये गेल की अनेक वृध्द लोक असे म्हणतात की माई आम्हांला आळंदी/देहू याठिकाणी जाण्यासाठी बस करावी, पोर आमच्या नादी लागत नाहीत ते कधी घेवून जाणार. पण आम्हांला त्याठिकाणी बस मिळत नाही. आम्ही पत्रव्यवहार केला त्याच्यावर ॲक्शन घेतली नाही. तरी देहू आणि आळंदी अशा पुणीत झालेल्या भुमाते मध्ये आमची पिंपरी चिचवड आहे. त्यामध्ये आमची गाव आहेत. मग आमच्या ज्येष्ठ नागरींकांना देवाला जायचे असेलतर पीएमपीएमएलची सेवा आम्हांला मिळत नाही. अशी सेवा करायची असेलतर हा पत्रव्यवहार आपल्याला करण्यासाठी शहरामध्ये एक दोन ठिकाणी पीएमपीएमएलचे ऑफीस झाले पाहीजे. जे ऐकत नव्हते ते गेले येथून गेल्यानंतर ते आयुक्त झाले पण आता गुंडे मॅडम यांच्याशी विचार विनीमय करुन आपल्या हद्दीमध्ये पिंपरी चिंचवड इमारतीमध्ये त्यांना जागा दिलीतर बरे होईल. कितीतरी इमारती बीनभाडयाच्या आहेत त्यांना त्या दिल्यातर ते लोक त्याठिकाणी बसण्यासाठी येतील. आपल्याला पत्रव्यवहार करता येईल यासाठी प्रयत्न करावेत. १७८ कर्मचारी आहेत त्या कर्मचा-यांवर बीनबुडाचे आरोप करुन त्यांना निलंबन केलेले आहे. कुठे तळेगाव आणि कुठे कात्रज येथील कामगार त्याठिकाणी जाऊ शकत नाहीत. आपण ज्याप्रमाणे सुविधा पुरवत असताना आपल्या महापालिकेचा जो कारभार आहे आपण पाणी घरामध्ये देतो आणि कचरा गाडी दारामध्ये येते अशा सेवा ही संस्था देते. मग ही सुध्दा अत्यावश्यक सेवा आहे. ही सेवा चांगल्याप्रकारे देण्यासाठी म्हणून आपले कर्मचारी जे निलंबीत केलेले आहेत त्या कर्मचा-यांना सन्मानाने आपण कामावर घ्यावे आणि

ही आपली सेवा प्रत्येक गावोगावी कशी चांगल्याप्रकारे पुरवली जाईल, लोकांची सेवा कशी आपल्याकडून होईल यासाठी आपण प्रयत्नशील रहावे. आपल्याला चांगला गोल्डन चान्स आलेला आहे आपल्या पीसीएमटीचा कारभार आपल्या भागामध्ये कसा चांगला चालवता येईल हे बघावे. ती कंपनी जरी असलीतरी आपल्या हद्दीमध्ये आल्यानंतर आपल्या कर्मचा-यांना बराचसा त्रास झालेला आहे. ते सुध्दा आपले म्हणणे ऐकल्या शिवाय राहणार नाहीत. रिटायरमेंटला आलेल्या कर्मचा-यांना देखील चांगला न्याय मिळेल. या वयामध्ये त्यांना कुठेतरी सन्मान केल्यासारखा होईल. रिटायरमेंट झाले की म्हणतात कर्मचारी ज्येष्ठ झाला, वयस्कर झाला. या वयामध्ये त्यांना कुठेतरी आनंदाचा उत्साह त्यांच्यामध्ये येईल. त्यांच्या आयुष्यालाही आरोग्यालाही चांगली कलाटणी मिळाल्या शिवाय राहणार नाही. मी पुन्हा एकदा आपल्याला विनंती करते की आपल्या पीएमपीएमएलचा कारभार चांगल्या प्रकारे कसा चालेल व १७८ लोकांना सन्मान कसा दिला जाईल यासाठी प्रयत्नशील रहावे.

**मा. शत्रुघ्न काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय याठिकाणी आयुक्त साहेबांनी आणलेला आहे. ब-याचशा सन्मा.सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. लोकल ट्रान्सपोर्ट आपल्या शहराचा कना आहे. यामधुन सर्वसामान्य नागरीकांना आपल्या नौकरीसाठी जावे लागते. आजचा जो विषय राहूल कलाटे यांनी सांगीतले, एवढी तुट कशी होते. खरेतर ब-याचशा सन्मा.सदस्यांनी पीएमपीएमएलची माहिती घेतली आहे. एवढया कोटीची तुट होती. खरेतर भारतीय जनता पार्टी सत्तेत आल्यानंतर पहील्यांदा लेखापरिक्षणाचे काम होतय. यातून जी तूट होती. लोकल ट्रान्सपोर्ट आहे हे सेवा मध्ये मोडत. सेवा मध्ये मोडत असताना ही तुट कशी होते, आयुक्त साहेबांचे आभार मानतो. पीएमपीएमएल सुधारली पाहीजे. गाडीत बसण्याची इच्छा कुठल्याही सर्वसामान्य नागरीकांना झाली पाहीजे. कर्मचा-यांचा विषय आहे त्याच बरोबर लोकल ट्रान्सपोर्ट चांगल्या प्रकारे पाहीजे.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा जो विषय आहे त्यात ऑपरेटींग डेफिसीट कस आल त्याचा लेखाजोखा आज आपण आमच्या समोर मांडलेला आहे. मुख्यलेखापरिक्षकांनी परीक्षण केलेल आहे. वास्तविक पाहता मी तळदेकर मॅडमला आणि त्यांच्या सर्व सहकार्यांना धन्यवाद देतो. ज्या लोकांनी अहवाल तयार करण्यामध्ये सहकार्य केले त्यांनाही धन्यवाद देतो. ऑपरेटींग लॉसेस कसे होतात, कशामुळे होतात जे काही कागदपत्र पुरविली गेली त्या कागदपत्रांच्या अनुषंगाने त्याच्या माहितीच्या अनुषंगाने त्यांनी आपल्यासमोर सविस्तर माहिती ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. विशेष म्हणजे याच्यामध्ये उपाययोजना सुध्दा त्यांनी सांगीतलेल्या आहेत. अधिकारी कोण होते येथून मागचे प्रशासन कोण होते. महापौर, स्थायी समिती अध्यक्षा असे तीन सन्मा.सदस्य त्या समीतीवर आहेत ते महीन्यातून एक-दोन मिटींगला जातात यापुढे मला वाटत नाही की त्यांचा तेथे काही सहभाग असतो. काही सुचना असतीलतर त्या सूचना केल्या जातात. परंतु बाकीचे त्यातून काही

निष्पन्न होत नाही. यामध्ये अहवाल देत असताना अतीशय चांगल्या पध्दतीची माहिती दिलेली आहे. एकूण बसची संख्या किती आहे त्यांनी सांगीतल की दि.३१/३/२०१७ च्या अखेर त्याचे आयुर्मान काय असले पाहीजे. त्यानी सांगीतल की एकूण १४०२ बसेस आहेत त्यामध्ये जुन्या ० ते पाच वर्षा पर्यंतच्या बससंख्या २८० आहेत, दहा वर्षाच्या बस ७९३ आहेत, ११ ते १२ वर्षाच्या बस १३२ आहेत, बारा वर्षापुढील बसेस आहेत या बसेसच आयुर्मान बाराव्या वर्षापेक्षा जास्त झाल ते १९७ आहेत. अशाप्रकारे शंभर टक्के तक्ता त्यांनी आपल्यासमोर दिला आहे. पीएमपीएमएलच्या बसेस एकूण १४०२ आहेत. दुसरीकडे बसेस धावतात दि.३१/३/२०१७ अखेरचा बसचा तक्ता त्यांनी दिलेला आहे त्यामध्ये १२०२ पीएमपीएमएमलच्या बसेस आणि पीपीपीच्या २०० बसेस, भाडेतत्वावरील ६५३ बसेस आहेत. मा.आयुक्त साहेब मला हा प्रश्न पडतो की जर ४९७ बसेस ऑफरोड असणार आहेत म्हणजे टक्केवारीमध्ये पाहीलतर ४१.३४ टक्के बेसेस या ऑनरोड आहेत. तरी ४० टक्के पेक्षा जास्त बसेस ऑफरोड असणार आहेत तर ही तुट हे डेफिसीएट वाढतच जाणार आहे. कोणीही सांगू शकणार नाही की संस्था कधी वर येईल. अच्छे दिन कब आयेंगे म्हणजे प्रवाशांचे आच्छे दिन कधी येणार हे स्वप्न स्वप्नच राहणार आहे. आपण पाहतो की बसेस ऑफ रोड आहेत, बसेस खराब आहेत, बसेस स्वच्छ नसतात, बसेस ब्रेकडाऊन होतात, बसेस उलटया होतात, बसेसला आग लागते, अलीकडेतर बसेसला आग लागण्याच प्रमाण अतीशय वाढलेल आहे. त्यामुळे शहरातील प्रवाशी हा बीलकूल सुरक्षीत राहीलेला नाही. पैसे खर्च करुन सुध्दा त्याला सेवा चांगली मिळत नाही. ऍक्टप्रमाणे ही कंपनी फॉर्म केली गेली जे व्हायच ते झाल. हे पैसे देण्याबद्दलचा विषय नाही. हे जे लेखापरिक्षण झालेले आहे त्या लेखापरिक्षणाचा अहवाल आपल्या समोर ठेवलेला आहे. मा.आयुक्त साहेब, मला असे वाटते की या अहवालाच्या अनुषंगाने जर चर्चा करायची म्हणलेतर पुर्ण दिवस पण कमी पडले आणि सर्व सन्मा. सदस्यांनी पण हा अहवाल पाहीला की नाही हे मला माहित नाही. परंतु हा अहवाल जरी सर्व सन्माननीयांनी पाहीलातर त्यांना सुध्दा अश्चर्याचा धक्का बसल्या शिवाय राहणार नाही की एवढी वाईट परिस्थिती या पीएमपीएमएलची आहे. एवढया वाईट परिस्थितीमध्ये येणारे जे कोणी प्रशासन असेल ते प्रशासन कशा पध्दतीने भविष्यामध्ये हाताळणार हा पण एक मोठा प्रश्नचिन्ह आहे. या उपाययोजना त्यांनी दिलेल्या आहेत त्याच्या अनुषंगाने खरच उपाययोजना करणार आहेत का. जे रुट फायदयाचे नाहीत त्या रुटवर सलग बसेस चालू आहेत. रिकाम्या बसेस जातात त्याठिकाणी लहान बसेस, छोटया बसेसची आवश्यकता आहे असं नमुद केलेलं आहे. ज्या ठिकाणी पैसे मिळत नाहीत अशा ठिकाणीच या बसेस वाहतात. म्हणजे कंट्रोल तेथे नाही. प्रॉपर मॅनेजमेंट तेथे केले जात नाही. आपण जर तोटा पाहीलातर जो आलेख आम्हांला दिला गेलेला आहे त्या तोटयामध्ये जर पाहीलतर मागच्या वर्षापेक्षा उत्पन्नामध्ये घट झालेली आहे. १५-१६ मध्ये उत्पन्न जे आहे ते ६१०.४९ कोटी होतं ते उत्पन्न आता ५७७.८५ कोटी रुपये १६-१७ मध्ये उत्पन्न झालेलं आहे.

त्याच्या उलट जर पाहीलतर जी तुट १५-१६ मध्ये होती ती ९२८.५६ होती ती तुट यावेळेला मात्र ९३१.३८ रुपयाने तुट झालेली आहे. म्हणजे उत्पन्न कमी झाले की तुट निश्चित वाढणार आहे. मग ब्रेकअप होणे, मग पासेसची संख्या मोफत बसेसची संख्या त्याच्यामध्ये असणारे लिकेजस, चो-या या सर्व बाबींचा विचार केलातर निश्चितच ही संस्था आहे ती मोडकळीस निघालेली आहे. तीला किती जीवदान दयाव, कस जीवदान दयाव हा मोठा प्रश्न आपल्यासमोर आहे. जी बस दहा वर्षापेक्षा जास्त झालेली आहे ती सारखी बंद पडणारच आणि ऑफरोडची संख्या पाहता याच्यावर काहीतरी उपाययोजना करणे गरजेचे आहे. काय उपाययोजना आपण करणार. दुस-या बाजुला बघीतलेतर कॉम्पीटेशन हे हेल्दी होत चाललेले आहे. ओला असेल, प्रायव्हेट बसेस असतील, प्रायव्हेट वाहतूक करणारे लोक असतील त्यांना सामोरे जात असताना ही तूट कशी कमी करता येईल हे पहावे. प्रवासी सुखरुप कसा घरी पोहचेल की नाही याचा सुध्दा भरवसा राहीलेला नाही. त्यामुळे प्रवाशाना चांगली प्रवाससेवा कशी उपलब्ध करुन देता येईल या सर्व गोष्टींचा साकल्याने विचार व्हायला पाहीजे. मा.आयुक्त साहेब, जसं आता शेंडगेताईनी सांगीतल, खर पाहता मागच्या वेळेस काम करत असताना आम्ही आमचे हातपाय स्वत: बांधलेले आहेत आता त्यामध्ये काही अधिकार राहीलेले नाहीत. सभागृहामध्ये आम्ही फक्त येथे ओरडणार, कारण त्यावेळेला कंपनी, कंपनी करुन दोन्ही महापालिका एकत्रीत येतील, एकत्रीत आल्यानंतर काहीतरी या शहराचे चांगले होईल. एकाच रुटवर दोन संस्थेच्या बसेस चालतात या दोघांमध्ये समन्वय असावा आणि कोणीतरी एक सेंट्रल बॉडी येवून त्याच्यावर गव्हर्नींग कराव आणि त्यातन प्रवाशांच चांगल व्हाव. याच उदात्त हेतूने हा निर्णय त्यावेळेला घेतला गेला. त्यावेळेला हा निर्णय घेत असताना कोणाच्याही मनामध्ये विषमता नव्हती, दुमत नव्हतं. किंवा कोणालाही असं वाटलेही नव्हते की भविष्यामध्ये या परिस्थितीला आपल्याला सामोरे जावे लागेल असे वाटले असतेतर मला वाटत कोणताही पक्ष कोणताही सदस्य, कुठल्याही पार्टीतला असो त्यांनी त्याला होकार दिला नसता. कारण या शहरातील प्रत्येक नगरसेवकांना मग तो कुठल्याही पक्षाचा असो त्याला त्या परिसरातील नागरीकांबद्दलची एक अस्था आहे, एक स्वाभिमान आहे, अभिमान आहे. कोणालाच असं वाटणार नाही की या लोकांची अशी दुरावस्था व्हावी म्हणुन. मग अशा परिस्थितीमध्ये त्यावेळेला तो निर्णय घेतला गेला परंतु आज आमच्या वतीने जे तीन लोक प्रतिनिधीत्व करतात. ज्या काही गोष्टी केल्या जातात त्यामध्ये किती परसेन्टमध्ये त्यांना अधिकार आहेत आणि का केल जात. कारण ज्यावेळेला सभागृहामध्ये हा विषय येतो त्यावेळेला मात्र नागरीकाचे/कर्मचा-यांचे हाल, बससेचे प्रॉब्लेम या गोष्टीवर सर्वजण जीव तोडून बोलत असतात. परंतु हे बोलणे हे या चार भींतीमध्ये राहतं. हे बोलणं जास्तीत जास्त आमचे पत्रकार मीत्र पत्रकाच्या माध्यमातून जे वर्तमानपत्रामध्ये छापतात परंतु त्याचा परिणाम मात्र शुन्य होतो शुन्य. काही होत नाही आणि आम्ही या सभागृहामध्ये आमचे घसे कोरडे करतो. त्याचा उपयोग होत नाही. त्याची

अंमलबजावणी होत नाही. या गोष्टीचे आज आम्हांला खेद आहे आणि दु:ख आहे. या मध्ये काय करावे लागेल. एवढा चांगला अहवाल यामध्ये दिलेला आहे. त्या अहवालामध्ये पाहीलतर लगेच आपल्या लक्षात येईल काय काय गोष्टींच्या उपाययोजना त्या लोकांनी करणे गरजेच आहे. मा.महापौर साहेब, तुम्ही असाल, तुमच्या बरोबर स्टॅण्डींग चेअरमन, आयुक्त आहेत या अहवालाच्या अनुषंगाने तुम्ही त्याठिकाणी आवाज उठवा तुम्ही त्यांना सांगावे की हे काय चाललेले आहे किती दिवस चालणार आहे आणि हा कारभार असाच होत राहीलातर आपण अनेक वर्षे पैसेच देत राहू. त्याच्यामध्ये काही सुधारणा होणार नाही नुकसानतर होणारच होणार आहे. महापालिकेचे आर्थीक भुर्दंड होणार आणि त्याच्यापेक्षाही वाईट याच्यामध्ये एक गोष्ट नमुद केलेली आहे कितीतरी कोटी रुपयाच भाड हे मात्र थकीत आहे. त्यांच्या ज्या इमारती आहेत, मालमत्ता आहे त्या इमारती आणि मालमत्तांच भाड ४९८ कोटी ५७ लाख ४७६ भाडे उत्पन्न थकीत असल्याचे दिसून येते. तसेच प्रपत्र अ मधील वर्षानुवर्ष करारनामे न केल्यामुळे  पीएमपीएमएलला जुन्या दरानेच आकारणी केली जाते. त्यामध्ये पीएमपीएमएलचे मोठया प्रमाणात आर्थीक नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे यापेक्षा वाईट गोष्ट काय असणार आहे. एका बाजुला ते स्वत: कुबडी घेवून चालतात. एका बाजुला त्यांचे हात-पाय गारठलेले आहेत. दुस-या बाजुला ते आकारणी करत नाहीत, पैसे वसुल करत नाहीत. ४९८ कोटी रु. त्यांचे भाड थकलेले आहे. अशा परिस्थितीत नेमका पीएमपीएमएलचा कारभार चालतो काय, काम करतात काय, कोण काम करतय, कोण काळा बाजार करतय. कशी ही संस्था चालणार, याच भविष्य काय असणार आहे. या सर्व गोष्टींचा आम्हांला प्रश्न पडलेला आहे. मा.महापौर साहेब, माझी आपल्याला  विनंती आहे की  हा विषय लेखापरिक्षणाचा विषय आहे परंतु यामध्ये जे मुद्दे आहेत  ते लेखापरिक्षणाचे आहेत त्या अनुषंगाने त्या पीएमपीएमएलचे जे अधिकारी आहेत ती लोक ॲडमिनीस्ट्रेशनमध्ये काम करतात त्या सर्वांना या सभागृहामध्ये बोलवाव. हा अहवाल त्यांच्याकडे दयावा. आपल्या सदस्यांनीही या अहवालाचा अभ्यास करावा. अभ्यास करुन मग आपल्या सदस्यांनी त्यांना प्रश्न विचारावेत. वाटलतर खास पीएमपीएमएलसाठी एक स्पेशल जनरल बॉडी लावा अशा प्रकारची आपल्याला विनंती करतो. हा विषय आपण मंजूर केला किंवा नाही केलातरी प्रश्न नाही हा लेखापरिक्षण अहवाल आहे. हा लेखापरिक्षण अहवाल वाचल्यानंतर आपल्या लक्षात येणार आहे की नेमका त्याठिकाणी काय सावळा गोंधळ आहे काय चुकीचे होते काय, कशा पध्दतीने पीएमपीएमएलचे कर्मचारी/ अधिकारी काम करतात हे  निश्चितपणे आपल्या निदर्शनास येणार आहेत. त्यामुळे आम्ही येथे ओरडून, बोलून त्यामध्ये काहीही फरक होत नाही. त्यांचे जे प्रमुख लोक असतील की ज्यांच्याकडे निर्णयाची क्षमता आहे त्यांना बोलवावे. हव असेलतर पुणे महापालिकेच्या अधिका-यांना पण घ्याव आणि एक बैठक आपण लावून त्या अहवालाच्या अनुषंगाने आपण त्यांच्याशी

प्रश्नोत्तर करुन, सादकबादक चर्चा करुन मगच मला वाटत काहीतरी गोष्टी निष्पन्न होणार आहेत, धन्यवाद.

**मा.उषा मुंढे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.महापौर, मा.चेअरमन तुम्ही पीएमपीएमएलमध्ये जो काही ठराव केला की अपंगत्व आलेल्या कामगारांना कामावर घेण्याचा जो काही ठराव केला त्याबाबत मा.महापौर साहेब, तुमच चेअरमन, सावळेताईंच, पुण्याचे महापौर आणि स्टॅण्डीक चेअरमन मी तुमच अभिनंदन करते. की ज्या कर्मचा-यांना अपंगत्व आलेले आहे अशा कर्मचा-यांना कामावर घेणेसाठी जो काही ठराव केला त्याबद्दल अभिनंदन करते.

**मा.सिमाताई सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पीएमपीएमएलचे लेखापरिक्षणाचा विषय हा स्थायी समितीकडे होता, स्थायी समितीने महापालिका सभेपुढ चर्चेसाठी विषय पाठवलेला होता. कारण असे होते की महापालिकामध्ये काय चालते हे सगळयांना कळालं पाहीजे आणि म्हणून हा विषय महासभेकडे शिफारस केलेली होती. आमच्या मनात आणले असतेतर त्याच ठिकाणी आम्ही मंजूरी देवून मोकळे झालो असतो. अनेक कर्मचारी सगळया नगरसेवकांकडे जात होते विनंती करत होते त्या १५९ कर्मचा-यांना व्हॉटसअपवरती, मेसेजवरती सूचना देवून त्याठिकणी तत्कालीन सीएमडीने घरी बसवले होते आणि ज्यांना घरी बसवल त्यांना म्हणणे मांडण्यास संधीच दिलेली नव्हती. कर्मचा-यांना कामावरुन कमी करण्याची किंवा त्यांना शिक्षा करण्याचे प्रोसेस असते. त्यांच्यावर काय आरोप आहेत त्या संदर्भात त्यांना पत्र दिले पाहीजे, त्यांना शोकॉज नोटीस काढली पाहीजे, नोटीस दिल्यानंतर त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले पाहीजे. म्हणणे ऐकल्यानंतर प्रशासनाचे जर समाधान होत नसेलतर परत एक नोटीस काढली पाहीजे आणि त्यानंतरही परत त्यांची सुनावणी घेवून जर समाधान झाले नाहीतर त्याची डीई लावता येते. याठिकाणी काय केल की डायरेक्ट हॉट्सपवरती आणि मॅसेजवरती त्यांना घरी बसवलेले आहे. ज्यांची ज्यांची कोणाची सुनावणी घेण्याची वेळ होती त्यांना उदया सुनावणी असेलतर दोन दिवस आधिच त्यांना सांगीतल की तुम्हांला डिसमीस केलेल आहे. एक ना अनेक अशा कर्मचा-यांच्या तक्रारी होत्या. काही लोकांनी टिका सुध्दा केलेली आहे. कर्मचा-यांची बाजू घेतली. मग त्यातन किती भ्रष्टाचार केला अशी पण टिका झाली, काही काही लोक बीनडोक आहेत. कळतच नाही की आपण काय बोलतो ते. कर्मचा-यांची बाजू नाही घेतलीतरी तीकडन टिका करणार आणि कर्मचा-यांची बाजू घेतलीतरी तीकडनही टिका करणार. मग संचालक मंडळाने पैसे घेतले का, मग संचालक मंडळ त्यांच्याच बाजुने का भांडतय. अरे, तुम्हाला किती माहिती आहे त्यातली. एखादयाच्या घरची चुल बंद होतेय, एकांनी सुसायट केलेले आहे. ज्यादिवशी आपण ठराव करत होतो त्या दिवशी भोसरीमध्ये एकाची प्रेतयात्रा निघाली होती. इतके आपण निर्ढावलो का. कोण मेल, कोण जगल, कोण उपासी राहत याची आम्हांला फिकीरच राहीलेली नाही. संचालक मंडळात काम

करताना मा.महापौर तुम्ही असाल, मी असेल, पुण्याचे महापौर असतील, तीथलेही चेअरमन असतील. आपण त्यांना वारंवार पहील्या मिटींग पासून ते कालच्या झालेल्या शेवटच्या मिटींग पर्यंत भांडतच आलेलो आहोत. ते केवळ आणि केवळ कर्मचा-यांसाठीच आम्ही भांडतो. एकही मुद्दा हा कुठल्या सदस्यांना किंवा कुठल्या संचालकांना सुविधा पाहीजे म्हणून मांडलेला नव्हता. मला माहिती नाही यापुर्वी कोणी भांडत होत की नव्हत पण आम्ही मात्र निश्चितपणे भांडण केलेली आहेत. सगळेच चोर आहेत ही जी काही भावना झालेली आहे या भावनेला कुठेतरी खोडून काढण्याची वेळ होती. कर्मचा-यांच्या सुदैवाने म्हणा, आणि काही लोकांच्या दुर्दैवाने म्हणा कोणाला वाटत होत मुंढे जावेत कोणाला वाटत होतं मुंढे रहावेत. ते जावेत की रहावेत या भांडणात मी पडणार नाही पण त्यांनी कर्मचा-यांवर अन्याय केला आस माझ ठाम मत झाल होतं आणि म्हणूनच आपण त्याठिकाणी ठराव मांडला. तो ठराव मांडल्यानंतर १५८ कर्मचारी ज्यांना ताबडतोबीने घरी बसवले होते ते १४ कर्मचारी ज्यांना कामावर असताना घरी बसवले. काही न्यायच नव्हता. आता ते बीनकामाचे झाले म्हणून त्यांना घरी बसउन टाका. आपल्या घरात वयस्कर कोणी असेल, ज्येष्ठ असेल, आपले आईवडील असतील तर ते बीनकामाचे म्हणून त्यांना काय वृध्दाश्रामात नेऊन ठेवायच का. का ढकलून दयायचे एखादया डोंगराच्या कडेवरुन. काय करत होतं याच भान राहीलेल नव्हतं. म्हणून त्यांची बदली झाली काय किंवा नाही झाली काय, मला काही दु:ख वाटल नाही, मला आनंदच झाला. अशाप्रकारचा कारभार करणारा कुठलाही आयएएस ऑफिसर असेलतर ती टिका झाली पाहीजे मग भले कोणी काहीही म्हणू देत. त्या कर्मचा-याना कामावर घेण्यासाठी रोज उठून कर्मचारी आमच्याकडे यायचे. एका कर्मचा-याची बायपास सर्जरी निगडीला रात्री दिड वाजता हार्टअटॅक आला. हार्टअटॅक आल्यानंतर त्यांनी नियम सांगीतला की आपल्या वायसीएमला न्यायच नाही, ससूणच सर्टिफिकेट चालणार. ३६ टाक्याच ऑपरेशन झाल. ओपन हार्ट सर्जरी झाल्यानंतर माणुस घरीच राहणार. त्याला कामावर रुजूच करुन घेतल नाही, त्याला कामावरुन काढून टाकल. हे काय प्रकार आहे, त्याला फोन करुन विचारले तर ते म्हणाले नाही त्यांना नाही घेता येणार कामावर. न सांगता गैरहजर राहीलेला आहे. पहीले पीएमपीएमएलला नोटीस दयावी लागेल की काय अशी परिस्थिती पीएमपीएमएलने उपस्थित केली होती. आयुक्त साहेब, आजच्या लेखापरिक्षणाच्या निमीत्ताने एवढच सांगेल की अशाप्रकारचा कारभार करत असताना पीएमपीएमला अनेकवेळा टिकेला सामोरे जावे लागेल. मी सभागृहाच्या निदर्शनास आणुन देऊ इच्छिते की ज्या ज्या ठिकाणी बसेसला आग लागतील, आपण आपले डेपो दुरुस्तीचे बंद केले का तर खर्च जास्त जातो आणि बाहेर काम देण्यासाठी सुरवात केलेली आहे. सहा बसेस जळाल्या होत्या एका महीनाभराच्या आतमध्ये. का बंद केला तर म्हणे खर्च जास्त वाढतो. आता ज्या बसेस जळाल्या आता त्यांचा दुप्पटी तीप्पटीने खर्च वाढलेला आहे. आता हे कोणाला विचारायला जायच, ते तर गेले निघुन नाशिकला. केवळ आणि केवळ त्यांना

कोणीतरी चांगले म्हणाव म्हणून त्यांचा जो काही खोटाटोप असायचा, त्याच्या विरोधात ते वागत होते. कर्मचारी काय असेच असतात त्यांचे म्हणणे ग्राहय धरले काय, नाही धरले काय या वृत्तीने ते वागत होते आणि म्हणून पीएमपीएमएलची वाट लागायला ख-या अर्थाने सुरवात झाली होती. आम्ही त्याठिकाणी मिटींगला जात होतो आम्हांला माहिती होतं काय परिस्थिती होती ती. जाईल ती मिटींग आमची गाजायची. गेलो की त्यांनी नाही म्हणायच आणि आम्ही हां म्हणायचं. आमच्या बरोबर सुध्दा एक आयएएस ऑफिसर काम करत होते, हार्डीकर साहेब, पुणे महापालिकेचे आयुक्त सुध्दा आयएएसच होते, कोणाचे सुध्दा ऐकायचे नाही. एककलमी कारभार करुन मला माहिती नाही त्यांनी काय साध्य केले. मागच्या मिटींगमध्ये १५८ कर्मचारी ज्यांना शोकॉज नोटीस न देता घरी बसवल होतं हे आणि १४ कर्मचारी ज्यांना कामावर अपंगत्व आलं होत ते आणि ज्यांना आकासापोटी, केवळ जो निगडीला राहतो, जो भोसरीला राहतो त्याला येथून तुम्ही हाडपसर असेल, कात्रज असेल अशा ठिकाणी त्यांना कामावर बोलवतात. सगळया लोकांना आम्ही सांगीतल की ते कामच करणार आहेत. ते कामावरच राहणार आहेत. त्यांना आमच्या शहरात डयुटी दिलीतर जास्त चांगल्या पध्दतीचे ते काम करु शकतील. मी नयना गुंडे मॅडमच याठिकाणी आभार मानेल की त्यांनी उदयाच्या एक तारखेपासून तर पाच तारखेपर्यंत या कर्मचा-यांची सुनावणी ठेवली आहे. त्यांना सांगीतले पहीले यांना कामावर घ्या आणि मग सुनावणी चालु करावी. आता ज्या कर्मचा-यांना कामावरुन कमी केलं होत त्यांच्या कुठल्याही अटि शर्ती पाळल्या नव्हत्या. स्वत: प्रशासनान पाळली नाही परंतु कामावर घेत असताना मात्र परत त्यांची सुनावणी घ्यायची. आम्ही म्हणल हरकत नाही तुम्ही नियमबाहय काम करु नका. सुनावणी घ्या पण त्याना एकदाच कामावर घ्यावे लागेल. कारण यांना कामावर घेतले नाहीतर यांच्या घरी जे मुलबाळ आहेत त्यांच्याकडे काय पर्याय असु शकेल पोट भरण्याचा याचा आपण साहनुभूतीपुर्वक विचार करावा म्हणून विनंती केली आणि नयना गुंडे मॅडमन कालच्या मिटींगमध्ये आम्हांला सांगीतल, काल आमच बजेट असताना सुध्दा आम्ही त्याठिकाणी मिटींगला गेलो. नयना गुंडे मॅडमने सांगीतले आहे की मी यांना लवकरात लवकर कामावर घेण्याची तयारी चालू केलेली आहे. मी तुमचे, त्यांचे महापौर साहेबांचे, आयुक्त साहेबांचे मनापासून आभार मानते आणि अभिनंदनही करते. आयुक्त साहेब तुमचही अभिनंदन करते कारण आपण सगळयानी त्याठिकाणी होकार दर्शविला होता. आज जे २१० कोटी रु. देण्याचे आहे त्या मधील ८४ कोटी आपल्या वाटयावरती होते. त्यामध्ये ६६ कोटी रु. आपण दिलेले आहेत व १८ कोटीची बाकी आहे. पहील्यांदा अशाप्रकारचा इतका विस्तृतपणे अहवाल आपल्यासमोर आलेला आहे आणि त्याचा अभ्यासही आपण सगळया सदस्यांनी चांगल्याप्रकारे केलेला आहे. प्रत्येकानी आपआपल म्हणणही मांडलेल आहे परंतु परवा दिवशी सुध्दा आपण बोललो आणि आता जे कोणी नवीन चेअरमन होतील त्यांनी सुध्दा ती बाजू त्याठिकाणी प्रकर्षाने मांडली पाहीजे. की सीएमडीचे जे अधिकार आहेत कंपनी

ॲक्टनुसार पुर्णपणे अधिकार जे सीएमडीना दिलेले आहेत ते अधिकार एक कलमी आहेत आणि त्या अधिकारांमध्ये तुमचे आमचे म्हणणे तेथे ऐकल्या जात नाही. एकाधिकारशाहीन त्याठिकाणी ते निर्णय घेतात. ५५० बसेस घेण्याचा आपल्याकडे विषय आलेला होता तो मंजुर केलेला होता. की पीएमपीएमएलच्या स्वत:च्या बसेस असल्या पाहीजेत म्हणून त्याठिकाणी आपण विषय केलेला होता. त्यांनी परस्पर निर्णय घेतला रद्द करायचा. आम्हांलातर माहितच नाही त्यादिवशी सभागृहात गेल्यानंतर अजेंडयावर विषय होता रद्द करायचा म्हणून. खरतर पीएमपीएमएलच्या स्वत:च्या बसेस असायलाच पाहीजेत. आता ठेकेदाराच्या बसेस आहेत या बसेस कि.मी.वरती आहेत. खरंतर बसेस भाडेतत्वावर दयायच्या असतील किंवा घ्यायच्या असतीलतर ॲक्यूपेशी बेसीसवरती घेतल्या पाहीजेत. जेणेकरुन जीतक जास्त प्रवासी घेता येतील तीतके जास्त प्रवाशी ते घेतील आणि आता जे बसस्टॉपवरती ताटकळत जे प्रवासी थांबतात यांची संख्या सुध्दा कमी होणार आहे. अशाप्रकारचा एक नवीन नियम त्याठिकाणी केला पाहीजे. कि.मी.वरती आपण भाड देतो. त्यामुळे कॉन्ट्रॅक्टर बस पळवायचच काम करतय. त्यामुळे पीएमपीएमएलमध्ये आपल्या बसेस असणे सुध्दा तेवढेच आवश्यक आहे. त्यामध्ये काही बसेस निर्णयामध्ये आपल्याला बदल करता आलातर ५५० बसेस मागच्या आणि नवीन ८०० बसेस २०० मिनी बसेस आहेत. ८ मार्चला नयना गुंडे मॅडमनी सांगीतल की तुम्हांला त्यातल्या काही बसेस पाठवतो. ८ मार्चला महीला दिन आल्यामुळे बसेस देणार आहेत. एमआयडीसीमध्ये किंवा आयटी सारख्या ठिकाणी आम्हांला त्या बसेस चालु करुन देता आल्यातर आम्हांला खुप आनंद होईल. काही अंशी का होईना आम्ही लोकांच्या पसंतीसाठी उतरलो त्यांच्यासाठी आम्ही काम करु शकलो याचा आम्हांला आनंद निश्चितपणे होणार आहे. हा विषय आपण मंजूर करावा कारण ब-यापैकी त्याठिकाणी आपण पैसे देवून झालेले आहेत. नाही म्हणटल तरी पीएमपीएमएल ही एक आपलीच जबाबदारी आहे, आपले कर्मचारी आहेत. आपल्या कर्मचा-यांना आपल्या शहरामध्ये घेण्याच्या सुध्दा ठराव केलेला आहे. पीएमपीएमएलचे काम केले पाहीजे. निगडीचा डेपो त्यांना चालू करण्यासाठी सांगीतलेले आहे.

मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- कंपनी ॲक्ट प्रमाणे पी.एम.पी.एम.एल. मध्ये स्थापन करावयाच्या ऑडीट कमिटीसाठी नेमणेत येणा-या तीन सदस्यांमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडील एक सदस्य नेमणेस मान्यता देणेत यावी.

त्याचप्रमाणे नॉमिनेशन व रिमुनरेशन कमिटीमध्ये नेमणेत येणा-या तीन सदस्यांमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडील एक सदस्य नेमणेस मान्यता देणेत यावी.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे –** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.सिमाताई सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. पीएमपीएमएलचा अजेंडा होता त्यावरती आपण पाहील की परत नौकरभरतीमध्ये सुध्दा त्यांनी सीआयआरटीच्या मानांकानुसार जी काही नोकरभरती होते ती ९.१ नुसार आपण देत होतो आणि आता त्यांनी

साडेसहाचा जो विषय केलेला आहे त्यामध्ये आपण सांगीतले की सीआयआरटी असताना सुध्दा आता पीएमपीएमएल स्वत:चा जो काही नौकरभरतीचा नवीन मानांकन आणतय त्याला आपला विरोध नाही परंतु त्या अनुषंगाने त्या श्री.गवळीना ४० कोटी दंड मारला होता त्या गवळीच सुध्दा आपण त्याठिकाणी निलंबन मागे घेवून त्यांना सुध्दा कामावर हजर करुन घेण्यासाठी सांगीतलेले आहे. तेथे श्री.बुर्से आहेत त्यांच सुध्दा निलंबन मागे घेवून त्यांच्यावरती कारवाईतर चालूच ठेवा परंतु त्यांना पहील कामावर घ्या असा आपण त्याठिकाणी ठराव केलेला आहे. आपण निश्चितपणे त्याठिकाणी १०० टक्के कर्मचा-यांच्या बाजुने आहोत त्याचबरोबर आपल्याला पीएमपीएमएल सुध्दा सुरळीत कशी चालविता येईल याच्याकडे सुध्दा आपल लक्ष असले पाहीजे. परत एकदा आपल आणि पुण्याचे महापौर आणि स्टॅण्डींग चेअरमनच अभिनंदन करुन थांबते, जयहिन्द, जय महाराष्ट्र.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. गेली एक तासभर पीएमपीएमएलच्या संदर्भात सर्व सदस्य आपले मत व्यक्त करत होते. खरतर मी पहील्यांदा पीएमपीएमएल संचालक मंडळाचे अभिनंदन करतो. मुख्यलेखापरिक्षण विभागाचा अहवाल सभेमध्ये पहील्यांदा मांडलेला आहे. आणि जे खर आहे, चांगल आहे, काय वाईट आहे, काय सुधारले पाहीजे, काय केले पाहीजे अशा पध्दतीची जी मनोमन भुमीका या सर्व सदस्यांनी मांडलेली आहे आणि तो अहवाल आपल्यासमोर आहे. खरेतर सर्वांच्या मनामध्ये एक भावना आहे की पीएमपीएमएल ही आपली लाईफलाईन आहे ती चांगल्या पध्दतीने सुधारली पाहीजे. खरतर मंगलाताईनी उपरोधीकपणे खरच बोललं. कदाचित तुमचा समज झाला की पीएमपीएमएलची कंपनी आपण करत असताना काही चुका झाल्या आणि जो काम करतो तो चुकतो हे खरच आहे. पण ज्या पध्दतीने पीएमपीएमएलची जी वाटचाल, आपल्या मनामध्ये असं वाटल होतं की पुणे आणि पिंपरी मधली बसेसचे संख्या चांगल्या पध्दतीने झालीतर, त्याचे नियोजन जर चांगले झाले असतेतर मला असे वाटते की पीएमपीएमएलची सुधारणा लोकांच्या दृष्टीने फायदेशीर ठरली असती आणि ही भुमीका आमचीही नाही की पीएमपीएमएलच्या माध्यमातून आपल्याला करोडो रुपयाच उत्पन्नच मिळाले पाहीजे. उत्पन्ना पेक्षाही सगळयात महत्वाच की पिंपरी चिंचवड, पुण्याच्या लोकांना चांगल्या पध्दतीच्या बसेसच्या फॅसिलीटी मिळाल्या पाहीजेत. मनाप्रमाणे त्यांना बस आपल्या जवळच्या भागातून गेल्या पाहीजेत आणि हीच मनामध्ये सगळयांच्या भावना होती. खरेतर यासंदर्भात ज्यावेळेला मागच्या वर्षीचा किंवा त्याच्या अगोदरचा नफातोटयाचा जर आपण विचार केलातर खरतर पीएमपीएमएल असेल किंवा पाणी असेल हा प्रॉफीटचा विषयच नाही पण ती लोकांची गरज आहे. आमच्या सिमाताई, मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब तेथे संचालक मंडळावर आहेत. आम्ही सत्तेमध्ये आज आलो म्हणून फक्त पीएमपीएमएलची बाजु मांडण्याच काम खरच कधीही केलेल नाही. विशेषत: ज्या ज्यावेळेस पीएमपीएमएलच्या कामगारांच्या संदर्भामध्ये मुद्दे आले.

मग मुंढे असतील का गुंडे असतील त्याचा विचार भारतीय जनता पार्टीच्या माझ्या पदाधिका-यांनी केला मग ते पुण्यातले असु दयात किंवा पिंपरी चिंचवडचे असु दयात. पहीली भावना होती की आपल्या कर्मचा-यांना सन्मानाची वागणुक मिळाली पाहीजे. मुंढे संदर्भात खरतर शासन ज्या पक्षाच असतं अधिका-यांना तो पक्ष ओन करतांत, मुंढेना ओन नाही केलं. खरतर चेअरमन असतील, महापौर असतील ज्या ज्या वेळेस पीएमपीएमएल बैठका झाल्या तेव्हा कर्मचा-यांच्या बाजुने ठामपणे माझे दोन्ही पदाधिकारी, विशेषत: पुण्याच्या महापौरांना, पुण्याच्या स्थायी समिती सदस्यंना १७८ कर्मचा-यांचा विषय आला मला असं वाटतय की या महापालिकेच्या महा सभेमध्ये आपण तो विषय केला. असे कधीही केले नाही की आपण तो विषय केला नाही. कर्मचारी आमचे आहेत का तुमचे आहेत, कर्मचारी पीएमपीएमएलचे आहेत व ते आपल्या शहरासाठी काम करतात. खरतर सगळयांची मनापासूनची इच्छा आहे की पीएमपीएमएल चांगल्या पध्दतीने शहरात धावली पाहीजे आणि या शहरामधल्या सर्वसामान्य माणसाची लाईफलाईन ख-या अर्थाने बनली पाहीजे. हा प्रयत्न करावा म्हणूनच मा.मुख्यमंत्री यांनी मुंढेना दिले. तर मुंढेनी बाकीच्या कामापेक्षाही सगळयात महत्वाची गोष्ट जे लक्ष दिल गेल ते प्रसिध्दीकड आणि मला असं वाटतय की कर्मचा-याना वेठीस धरुन एखादा अधिकारी काम करतो त्याच्यामध्ये प्रॉफीट किती मिळवतोय हे माझ्या अगोदरच्या सगळया सन्मा.सदस्यांनी सांगीतले की कामापेक्षाही कर्मचा-याना वेठीस धरण्याचे काम केले आणि खरतर आम्ही जाहीररीत्या मुंढे यांची बदली व्हावी अशा पध्दतीच धोरण स्विकारल. त्यामध्ये वाईट वाटण्याच काहीच कारण नाही. आणि खरतर पुढच्या काळामध्ये ही वस्तुस्थिती आहे. म्हणजे पुणे शहराचा एखादा नगरसेवक सभागृहामधला पीएमपीएमएलच्या संचालक मंडळामध्ये जातो आपल म्हणण मांडतो आणि ही वस्तुस्थिती आहे की पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सभागृहामधला एक प्रतिनीधी वेळोवेळी पीएमपीएमएलच्या मिटींगला गेला पाहीजे त्यांनी आपले सजेशन दिले पाहीजे. याठिकाणी आपण लेखापरिक्षणला मान्यता देण्याच काम करतो. माझी या निमीत्ताने सभागृहाला विनंती आहे की पीएमपीएमएलचे अधिकारी या महा सभेला कधी आलेले नाहीत. एक प्रथा आपण पुढच्या काळामध्ये चांगली पाडु यात खरतर तुमची स्टॅण्डींगची शेवटची मिटींग असताना ज्येष्ठ नागरीकांसाठी सातशेचा पास मुंढेच्या काळामध्ये झाला व काल आपण पाचशेचा केला. विदयार्थ्यांच्या बसेसच्या संदर्भामधला पासच्या संदर्भातील विषय आहे, मागच्यावेळेस त्याच पध्दतीने केलं. खरतर चुकीच्या पध्दतीने मागच्या काळामध्ये जे जे विषय झाले मग ते कर्मचा-याच्या संदर्भातील असतील, ज्येष्ठांच्या संदर्भातील असतील, अपंगाच्या संदर्भामधले विषय असतील, कर्मचा-यांच्या बदल्यांच्या संदर्भामधले असतील या सगळया विषयाला विरोध करण्याच काम सुध्दा या संचालक मंडळाने केलेले आहे. सिमाताईन सांगीतल, खरं आहे की जे पीएमपीएमएलच्या कंपनीची रचना करत असताना संपुर्ण अधिकार एमडीला दिले गेले. पुणे महापालिका असेल, पिंपरी चिंचवड महापालिका असेल एमडीला किती

अधिकार दिले पाहीजे म्हणजे त्या अधिकारावर सुध्दा आपल्याला बंधन घालण्याचे काम पुढच्या काळामध्ये करावे लागेल. एवढच सांगेल जे चांगल आहे ते चांगलच केल पाहीजे. मुंढेच्या काळात किती खर्च वाढला, जसा प्रॉफीट कमावल त्याच्यापेक्षाही मागच्या दोन वर्षात खर्चा कमी नाही झाला. पीएमपीएमएल सुधारण्यासाठी त्यांच्या अहवालामध्ये शेवटच्या पानावर बघीतलतर त्यांनी काही उपाययोजना आपल्याला सुचवलेल्या आहेत. या उपाययोजना अंमलात आणाण्यासाठी पीएमपीएमएलने चांगल्या बसेस, बसेसच्या संदर्भात वेळापत्रक असेल, महिलादिनाचे ताईनी सांगीतलेले आहे, छोटया मिनी बसेस जर आपल्या शहरातून धावायला लागल्यातर मला वाटते की आपल्या बंधु-भगिनींना आपआपल्या कामाच्या ठिकाणी जाण्यासाठी निश्चितच त्याचा चांगल्या पध्दतीने उपयोग होवु शकतो. पीएमपीएमएल सुधारली पाहीजे ही सगळया सदस्यांची मागणी आहे. परंतु पीएमपीएमएल सुधारत असताना या शहरातील सर्व माणसाना या शहरातील सर्व नगरसेवकांना विश्वासात घेवून पीएमपीएमएलची वाटचाल झाली पाहीजे. नाहीतर पीएमपीएमएल सेल्फ होण्याच्या दृष्टिने जर पुढच्या काळात काम केलतर मला वाटतय की १२ वर्षे ज्या बसेस घेतल्या, आपण बघतोय की आपल्या स्वत:ची गाडी सुध्दा आपण १२ वर्षे चालू शकतोय का आणि वस्तुस्थिती आहे. मला कधी कधी आश्चर्य वाटतय म्हणजे पीएमपीएमएलच्या कामाची पध्दत अधिकारी, कर्मचारी, ठेकेदार, महीना दोन महीन्यापुर्वीच एक बस आयुक्त साहेबांच्या दारात बंद पडली, दुसरी सचिन चिखले यांनी बघीतली की महापलिकेच्या समोर बस जळाली. मला असं वाटतय की तिथ सुध्दा जे चुकीच्या पध्दतीने अधिकारी कर्मचारी काम करत असतील त्यांना सुध्दा चांगल्या पध्दतीची शिस्त आणण्याची गरज आहे. पीएमपीएमएल ख-या अर्थाने प्रॉफीटमध्ये किती जाईल यापेक्षा पण पीएमपीएमएल ही आपल्या शहराची लाईफलाईन होण्याच्या दृष्टिने निश्चितच आपण सर्वजण प्रयत्न करु यात अशी मी विनंती करतो. खरतर हे पैसे आपण दिलेले आहेत आठ-दहा कोटी देणं बाकी आहे. कर्मचा-यांना न्याय देण्याचे काम करावे. १७८ एवढे आपले कर्मचारी आहेत. कर्मचा-यांचा ठराव मागच्या संचालक मंडळाने घेतलेला आहे. मुंढे गेले आणि गुंडे आलेल्या आहेत. गुंडेताई खुप चांगले काम करतात. माई बोलता बोलता म्हणाल्या की एखादा खेडला राहणारा कर्मचारी तो शेवाळवाडीच्या डेपोमध्ये जातो अशा पध्दतीची गळचेपी होवु नये जवळच्या ठिकाणी काम दिलतर आपली एनर्जी कामासाठी जावी. मला असं वाटतय की पीएमपीएमएल प्रॉफीटमध्ये येण्यासाठी सुध्दा निश्चितच मदत होवू शकेल. मी विनंती करतो की मुख्यलेखापरिक्षण विभागाने जो आपल्याला अहवाल दिला त्याला मंजूरी दयावी. पीएमपीएमएल सुधारण्यासाठी आपल्याला ज्या ज्या गोष्टी करता येतील त्या त्या करण्यासाठी त्या अधिका-यांना सुचना दयाव्यात एवढी विनंती करतो आणि हा विषय उपसूचनेसह मंजूर करावा.

**मा.निर्मला गायकवाड -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक- १४५ विषय क्रमांक – २

दिनांक – २८/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ –** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/५७/१८ दि.१२/१/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्रमांक २०३१ दि.१७/१/२०१८ .

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय पीएमसी-३००३/१४९० प्र क्र १२४/०३ नवि-२२ दि.१९/४/२००७ च्या शासन आदेशानुसार पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिकाचे परिवहन उपक्रमाचे विलीनीकरण करून भारतीय कंपनी कायदा १९५६ अन्वये पुणे महानगर परिवहन महामंडळ मर्यादित या अभिनामाची कंपनी स्थापन करण्यास शासनाची मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.एनयुआर-२०१३/प्र क्र.३३८/नवि-३३ दि.१८/२/२०१४ च्या शासन आदेशाप्रमाणे पुणे महानगर परिवहन महामंडळाचे सन २०१६-१७ चे वार्षिक लेख्यांची तपासणी करून संचालन तूट (Operating Deficit) महानगरपालिकेच्या मुख्य लेखा परिक्षक यांनी प्रमाणित करणे आहे. त्याकरिता मा.आयुक्त यांनी विषयांकित कारणासाठी लेखा परिक्षण करणेच्या सुचना दिलेल्या आहेत.

त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य लेखा परिक्षण विभागामार्फत लेखापरिक्षण करण्यात आले असुन त्यातील ठळक बाबी खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| · महामंडळाचे सन २०१६-१७ चे एकुण उत्पन्न | र.रु.५७६.७८ कोटी |
| . महामंडळाचा सन २०१६-१७ चे एकुण खर्च | र.रु. ९२०.५४ कोटी |
| . एकुण तोटा | र.रु. ३४३.७६ कोटी |
| . मनपा व इतर अनुदान वजा जाता एकुण संचालन तुट | र.रु. २१०.४४ कोटी |

त्याप्रमाणे पिंपरी चिंचवड मनपाचे मुख्य लेखापरिक्षण कार्यालयाकडून पुणे महानगर परिवहन महामंडळाचे सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील **र.रु.२१०.४४ कोटी** संचालन तूट (Operating Deficit) बाबत केलेल्या प्रस्तावा सोबतचे लेखापरिक्षण अहवालास मान्यता देणेत येत आहे. तसेच कंपनी ॲक्ट प्रमाणे पी.एम.पी.एम.एल. मध्ये स्थापन करावयाच्या ऑडीट कमिटीसाठी नेमणेत येणा-या तीन सदस्यांमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडील एक सदस्य नेमणेस मान्यता देणेत येत आहे.

त्याचप्रमाणे नॉमिनेशन व रिमुनरेशन कमिटीमध्ये नेमणेत येणा-या तीन सदस्यांमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडील एक सदस्य नेमणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.हर्षल ढोरे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ३

दिनांक – २८/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ–** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कर/मुख्य/१२/कावि/१३/२०१८ दि.१६/१/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्रमांक २०६३ दि.२४/१/२०१८

शहरातील नागरिकांना ऑनलाईन (डिजीटल) पेमेंट गेट-वेचा वापर करण्यास प्रवृत्त करणे, कराचा भरणा करणेसाठी वेळेचा होणारा अपव्यय टाळणे तसेच कॅशलेस ट्रांजेक्शन करण्यासाठी प्रोत्साहन देणेच्या दृष्टीने महापालिकेच्या संकेतस्थळावर मिळकत कराचा भरणा करण्याची सुविधा देणेत येत आहे. सध्या ऑनलाईन (डिजीटल) पेमेंट गेट-वेकरिता विविध ऍप विकसित असून सदर ऍपचा वापर करुन नागरिकांना जास्तीत जास्त ऑनलाईन कराचा भरणा करणेकामी पर्याय उपलब्ध करुन देणे शक्य होणार आहे. यापैकीच मे. One 97 communications ltd.(paytm) यांनी मिळकत कराचा भरणा त्यांचे ऍपद्वारे स्विकृतीकामी दिनांक 19/5/2017 रोजीचे प्रस्तावाद्वारे कळविले आहे. मे. One 97 communications ltd.(paytm) यांचेशी करारनामा करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन इकडील विभागाने करारनामा मसुदा तयार केलेला आहे.

**सदर करारनाम्यामध्ये पुढील प्रमुख बाबींचा समावेश आहे.**

1. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांकरिता महापालिकेचे संकेत स्थळावरील ऑनलाईन पेमेंट गेट-वे व्यतिरिक्त पेटीएम ऍपचा वापर करुन मिळकत कराचा भरणा करणेची सुविधा उपलब्ध होणार आहे.
2. सदर करारनामा कालावधी हा प्रायोगिक तत्वावर 1 वर्ष कालावधी करीता करणेत येणार आहे. मे.पेटीएम यांचे काम समाधानकारक असल्यास सदर कालावधी हा 2 वर्षासाठी वाढविणेत येईल.

3. उक्त सुविधेसाठी मे.पेटीएम यांना पालिकेच्या वतीने कोणत्याही प्रकारची रक्कम देय असणार नाही.

4. या पध्दतीने जमा होणारा मिळकत कर भरणा हा त्याच दिवशी पालिकेच्या खात्यामध्ये जमा करणेत येईल. असे न झाल्यास संबंधितांना प्रत्येकी र.रु.100/- साठी प्रति दिनी र.रु.5/- इतकी व्याज रक्कम आकारली जाईल.

5. पेटीएम ऍपचा वापर करुन मिळकत कराचा भरणा करणा-या मिळकतधारकांकडून खालीलप्रमाणे शुल्क आकारणेत येणार आहे.

| Particulars | Fee (INR/%) |
|---|---|
| Net Banking | Rs. 5/- (flat fee) |
| Credit Card | 0.80% of transaction amount |
| Debit Card | 0.50% if transaction amount is <= INR 2000 |
| | 0.75% if transaction amount is > INR 2000 |
| Paytm Wallet | Rs. 5/- (flat fee) |

सदर फी मध्ये शासनाचे कर, शुल्क, फी, GST / CGST / SGST / UTGST / IGST यांचा समावेश नाही. सदर सुविधेद्वारे भरणा करताना नागरीकांना उपरोक्त फी व्यतिरिक्त या सेवेसाठी लागू असलेले शुल्क, फी इत्यादी देखील भरावे लागतील. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मिळकतधारकांना मिळकतकर भरणा करणेकरिता Paytm ची सुविधा उपलब्ध करून देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.संदिप कस्पटे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या विषयाची सविस्तर माहिती दयावी. यामुळे नागरीकांना लॉस होणार का याची माहिती दयावी.

**मा.विठ्ठल नाना काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. महापालिकेनी पेटीएमला का प्राधान्य दयावे हा मुद्दा सांगणे गरजेचे आहे. महापलिकेचे पिंपरी चिंचवड शहरातील किती नागरीक ऑनलाईन पेमेंट करतात याची माहिती दयावी. केंद्रशासनाने जो भीम अप्लीकेशन काढलेले आहे ते आपण का वापरत नाहीत. ते देखील फ्री आहे ते विदाऊट नेटच देखील आपल्याला वापर करता येतं. डायरेक्ट मोबाईल टू मोबाईल ते पेमेंट भरु शकतो याची माहिती दयावी. शहरातील किती नागरीक याचा वापर करतात त्याची माहिती दयावी जे आदरणीय मोदी साहेबांनी भीम अप्लीकेशन फ्री दिलेले आहे ते आपण का वापरत नाहीत, त्याची माहिती दयावी.

**मा.वैशाली घोडेकर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मला पहील्यांदा हा विषय का आलेला आहे हा प्रश्न पडलेला आहे. एवढयासाठी नागरीकांवर आपण किती अजून बोजा टाकणार आहात ऑनलाईनसाठी पण. ज्यावेळेला मी नेट बँकींग करते, डेबीट कार्ड वापरते त्यावेळेला बँक ऑलरेडी चार्जेस कट करते. याच्यामध्ये पण बँक व महापालिका चार्जेस लावणार का याचा खुलासा करावा. हे जे तुम्ही नवीन पेटीएम वॉलेट याच्यामध्ये ऍड केलेले आहे तर तो ऍड करण्याचा महापालिकेचा हेतू काय आहे. आज शहरामध्ये पेटीएम बघीतलतर पेटीएमने एवढे सेल्सबॉय शहरामध्ये दिलेले आहेत की जेवढा पेटीएमला आपण उदयोग देतो त्याच्यात ते कमीशन्स देतात. मग याचा महापालिकेला उपयोग काय आहे. महापालिका काय कमीशन स्वरुपात देणार का कारण त्यांना आपण एवढा बीझनेस देणार आहोत. पेटीएम ज्यावेळेस एखादा नागरीक वापरणार आहे त्यावेळेला पेटीएम स्वत: त्याचे काही चार्जेस कट करणार आहे का. जर तो चार्जेस कट करणार असेलतर महापालिका पण चार्ज लावणार आणि पेटीएमवालाही चार्ज कट करणार तरी याचा खुलासा करावा. यामध्ये दोनदा चार्जेस कट होणार का एकदाच कट होणार याचाही खुलासा याठिकाणी अधिका-यांनी दयावा आणि खुलासा दिल्यानंतर आम्हांला बोलायच आहे.

**मा.महापालिका आयुक्त -** मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. आताच जो प्रश्न विचारला आहे त्याच्या संदर्भात खुलासा पुढीलप्रमाणे आहे. आज आपण जी कर वसुली करतो त्याच्यामध्ये कॅसलेस केल्यामुळे मोठयाप्रमाणात आपल्याला ऑनलाईन स्वरुपामध्ये कॅसलेस पध्दतीने वसुली होत आहे. आजच्या स्थितीमध्ये सुमारे ३६ टक्के वसुली ही आपली ऑनलाईन पध्दतीने होते आहे. आणि अधिकाधिक वसुली ऑनलाईन पध्दतीने करण्यासाठी आपल्या महानगरपालिकेने ऑनलाईन पेमेंट करणा-यासाठी काही सवलतीचे धोरण देखील यापुर्वी मंजुर केलेले आहे. तथापि विवीध पध्दतीचा अवलंब करुन ऑनलाईन पध्दतीने नागरीक घर बसल्या आपल्याला भरणा करु शकतात आणि त्यामुळे कॅशलेस अधिक पध्दतीने करण्यासाठी अधिकाधिक ज्या पध्दती आहेत त्या फक्त नेट आपल्या पोर्टमध्ये आणण्यासाठी हे विषयपत्र आज सभागृहासमोर आणण्यात आलेल आहे. आज आपण ऑनलाईन पध्दतीने पेमेंट करतोच आहोत. त्या सोबतच पेटीएमच्या वॉलेटच्या माध्यमातून देखील पेमेंट करण्याची सुविधा नागरीकांना उपलब्ध करुन देण्याच्यासाठी हा विषय आपण सभागृहासमोर आणलेला आहे. याच्यामध्ये नेट बँकींग पध्दतीने जर कोणी पेमेंट करत असेलतर त्याच्यावरती पाच रुपये फि लावली जाते ती नेट बँकींग करणारी संस्थेच्या मार्फत गोळा केली जाते. आपण कुठलेही ऍडीशनल शुल्क त्याच्यावरती लावत नाहीत. क्रेडीट कार्डसाठी ०.८० परसेन्ट ऑफ ट्रॅन्झेक्शन अमौंट हे ती संस्था लावत असते आपण कुठलेही विशेष शुल्क त्याच्यावरती लावत नाहीत. डेबीट कार्ड करिता सुध्दा दोन हजारच्या खाली असेलतर ०.५० टक्के ट्रॅन्झेक्शन अमौंट आणि दोन हजारच्या वर असेलतर ०.७५ टक्के ट्रॅन्झेक्शन अमौंट इतकं शुल्क त्याच्यावरती ती सुध्दा ती

बँक लावत असते आणि त्याच पध्दतीने पेटीएम मार्फत जरी पेमेंट झालेतर फ्लॅट फि ५ रु. त्याच्यावरती लावण्यात येणार आहे आणि ती देखील पेटीएमच गोळा करणार आहे आपण कुठलेही विशेष शुल्क त्याच्यावरती  लावत नाहीत. केवळ नागरीकांना एक ॲडीशनल पध्दतीने आपल्याला ऑनलाईन पेमेंट करता याव त्याच्यासाठी ही सुविधा आपण उपलब्ध करुन देतो आहोत ही या मागची भुमीका आहे.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आयुक्त साहेब आपण खुप गोल गोल फिरुन हा विषय आमच्या समोर आणलेला आहे. नानाने आपल्याला एक प्रश्न साध्या आणि सोप्या भाषेत विचारला होता. हे पाच रु. तुम्ही आणलेले आहेत ते महापालिका देणार का पेटीएम देणार आणि याच्या मधुन ही पेटीएम संकल्पना आपल्या डोक्यात का आली. जर पंतप्रधानाच्या नावाने भीम ॲप्स आपल्या समोर असताना एकही रुपया आपल्या नागरीकांचा न जाता जर काही काम होत असेलतर आम्ही त्याला नक्कीच मंजूरी देऊ. अनेक मार्केट आपल्या समोर ओपन आहेत ते आपल्याला फ्रि मार्केटींग करुन हे फ्रि ॲप्स आपल्याला पुरवू शकतात ही कोणाची संकल्पना आहे. याच्या पाठीमागे काही वेगळा हेतू आहे का. नागरीकांचे का पाच रुपये कट करायचे आहेत. कशासाठी आपण लोकांकडन पैसे घ्यायचे. जर फुकट देत असेल, एखादी वेगळी कंपनी जर फुकट देत असेलतर मग पेटीएम हाच ॲप्स आपल्यासमोर का. याच्या व्यतिरीक्त काही नाही का फुकट कोणी देणारा. कितीतरी बँका आपल्या समोर आहेत की त्यांना आपण वसुली करुन देणार आहेत, त्यांचा धंदा आपण करुन देणार आहेत. नानान विचारल आहे पाच रुपयाच काय.

**मा.महापालिका आयुक्त  -** मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. आपण कोणालाही कुठलेही चार्जेस ॲडीशनल लावत नाहीत. हे चार्जेस आहेत ते ती ती सेवा पुरवठाधारक संस्था त्यांच्या स्टॅण्डर्ड रेट प्रमाणे जो ती सेवा वापरेल त्यांच्याकडून वसुल करतात आपल्याकडन कुठलही पेमेंट आपण त्यांना देणार नाहीत किंवा आपण त्यांच्याकडून कुठलही घेणार नाहीत. जो नागरीक पेटीएमच्या  मार्फत पेमेंट करु इच्छित असे ते त्याच्यासाठी ऐच्छिक आहे. त्याने पेटीएम वापराव किंवा त्यांनी नेट बँकीग वापराव किंवा त्यांनी क्रेडीट कार्ड वापराव, डेबीट कार्ड वापराव हा त्याचा चॉईस आहे आपण फक्त ही सुविधा व्यापक करतो वेगवेगळया मोडसनी. भीम ॲप्स असेल किंवा अन्य कुठलही ॲप्स असेल त्याच्या माध्यमातून नेट बँकींग प्रणालीनच ते  पेमेंट करतात आणि त्याच्यावरती सुध्दा ती ती बँक त्यांचे दर, सेवाशुल्क आकारतच असते. तसेच हे पेटीएमने आपल्याला एक त्यांच स्टॅण्डर्ड सेवाशुल्क आहे हे त्याच्यात नमुद केलेलं आहे. ही ॲडीशनल सुविधा देण्यासाठी प्रस्ताव आहे. जर सभागृहाला मान्य असेलतर त्याच्याप्रमाणे आपण ती सुविधा उपलब्ध करुन देणार आहोत. आपण कुठलेही त्याच्यात शुल्क गोळा करणार नाहीत किंवा आपण कुठलही शुल्क ॲडीशनल देणार नाहीत.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऐच्छिक असेलतर या ॲपव्दारे जर मला पैसे भरायचे असतीलतर माझे पाच रुपये कट होणारच नां. मग हा नागरीकांना भुर्दंड आहेचनां. आम्ही महानगरपालिका म्हणत नाही पण जर मला त्या ॲपव्दारे पैसे भरायचे असतीलतर माझे पाच रु. कट होणार आहेत. हा विषय आणला कशासाठी. हे पैसे नागरीकांचे जाणार आहेत. जो हा ॲप वापरणार आहे त्यांच्याकडुन पाच रु. जाणार आहेत. आमचा या विषयाला विरोध आहे.

**मा.विठ्ठल उर्फ नाना काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता दत्ता काका यांनी सांगीतल्याप्रमाणे जर नागरीकांना पाच रुपये भुर्दंड बसतोतर भीमॲप फ्रि आहे ते का आपण प्रमोट करत नाहीत. आपण पेटीएमला का प्राधान्य देतो. नागरीक ठरवतील कशाव्दारे पेमेंट करायचे ते. याच्यामध्ये आपला काही इन्ट्रेस्ट आहे का महापालिकेचा काय इन्ट्रेस्ट आहे त्यात. भीम ॲप नागरीकांसाठी फ्री केलेले आहे. मोबाईल टू मोबाईल पैसे भरता येतात. याला कसलेही पैसे लागत नाहीत. पेटीएम वापरण्यामागचा काय हेतू आहे.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या विषया मधील पेटीएम हे भारतीय जनता पार्टीच्या पदाधिका-याची कंपनी आहे, अस आहे का. भीमॲप शंभर टक्के असला पाहीजे. खरतर आजची जर पिंपरी चिंचवड शहराची परिस्थिती बघीतलीतर एखादयाला महापालिकेच्या करसंकलन केंद्रामध्ये जावे, आपली गाडी काढावी, आपला लाईनमध्ये थांबायला एक तास दयावा जे या सगळया गोष्टी करु शकत नाहीत खरतर त्यांच्यासाठी हा विषय आहे. ज्यांच्याकडे चार-चार, पाच-पाच तास वेळ आहे, आपल्या घरापासून पंधरा मिनीटात सहज आपल्या गाडीवर जावु शकतो त्यांच्यासाठी हा विषय नाही. खरतर एखादया माणसाला आपल्या पेटीएम मधुन किंवा आपल्या डेबीट कार्डामधुन जर आपला कर भरलातर मला वाटते की महापालिकेच्या तिजोरीमध्ये जास्त पैसे येणार आहेत. खरतर महापालिकेच्या तिजोरीमध्ये जास्तीत जास्त पैसा जमा व्हावा असा उद्देश आहे. मा.मोदी साहेबांचे कौतूक नाना तुम्ही करताय याचा मला सगळयात जास्त आनंद वाटला कारण की कॅशलेस व्यवहार करण्याच्या दृष्टिने आदरणीय मोदी साहेबांनी केल आहे. आणि मला असं वाटतय की आताची परिस्थिती बँकेमधुन पैसे घेवून जाणं ब-याचदा काही काही लोकांच एक एक दोन लाखामधे करसंकलन भरण्याची गरज आहे. मधल्या काळात आपण बघीतल, नोटबंदीच्या काळात कर भरण्यासाठी परवानगी दिलीतर कोटयावधी रुपये जमा झाले आहेत. मला असं वाटतय की आपण घराच्या घरामध्ये लोकांना कर भरण्यासाठी सुविधा करुन देतो हा खरतर चर्चेचा विषय नाही. सगळयानी या विषयाला समर्थन केले पाहीजे. एवढा चांगला विषय आहे, काका तुमच्या भागामध्ये मोठया सोसायटया झालेल्या आहेत. आता लोक रांगेमध्ये उभे रहायला तयार नाहीत. त्यामुळे या विषयाची चर्चा न करता मा.महापौर साहेब, हा विषय मंजूर करावा.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. विषय चांगला आहे विषयाबद्दलच काही दुमत नाही. फक्त याच्यामध्ये सगळयांच म्हणणं असंच आहे की एटीएम, पेटीएम, याच्यापेक्षा इन्शॉर्ट असं म्हणाच आहे की ऑनलाईन पेमेंट, कुठलही पेमेंट असणार कुठलही ऍप्स असणार ते फ्रि असायला पाहीजे. महापालिकेला पैशाची गरज आहे. सगळयांना समजत की कॅशलेस असेलतर सोप आहे. जस आता नाना काटे यांच म्हणण आहे की अमुक अमुक कंपनी फ्रि करते किंवा अमुक कंपनी ०.२५ ने करेल. हा विषय चांगला आहे फक्त एवढाच बदल करावा की कोणत्याही कंपनी मार्फत महापालिकेला ऑनलाईन पेमेंट करु शकतो एवढे चेंज केलेतर काही फरक होणार नाही. सभागृह नेत्यांनी सांगीतले ऐटीएम, पेटीएम हे भारतीय जनता पार्टीचे नाही. एवढी चांगली बाजू मांडता तर निरव मोदी कोण आहे एवढतरी सांगाना आम्हाला. आमचे ज्ञान कमी आहे. त्याचा खुलासा केला तर बरे होईल.

मी पुढील प्रमाणे उपसूचना मांडतो— Online Payment करिता कोणत्याही कंपनी/अॅपव्दारे स्वीकारली जाईल ही मुभा या विषयाच्या अनुशंगाने नागरीकांकरिता उपलब्ध करुन मान्यता देण्यात यावी.

**मा.राहुल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. उपसूचनेला मी अनुमोदन देतो. ही अतीशय चांगली संकल्पना आहे. जेणे करुन नागरीकांना खेटे मारावे लागणार नाहीत, लाईनीत उभे रहावे लागणार नाही. फक्त साहेबांना एकच आमची विनंती आहे की पेटीएम सारखे अजून कुठलेही ऍप असेलतर त्यांनाही अनुमती दया आणि तुम्ही जे म्हणल आहे संबंधितांनी प्रत्येकी १०० रुपये म्हणजे हे कंपनीने भरायचे पेटीएमनी का नागरीकांने याचा खुलासा करावा. या कंपनीचे मालक जो आहे शर्मा, तुम्हीजर भारतीय जनता पार्टीच्या वेबसाईटवर गेलातर विजय शर्मा हा तुमचा मोठा देणगीदार आहे. लोकांच्या सोईसाठी जेवढे ऍप असतील तेवढे दयावेत.

**मा.एकनाथ पवार-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर विषय जरी छोटा असलातरी सगळयाच्या मनामध्ये भावना आहे की ऑनलाईन ट्रान्झेक्शन झाले पाहीजे. यासाठी उपसूचना दिली मी अनुमोदन देतो. आणि योगेशभाईनी सांगीतल की निरव मोदी कोण होते. खरतर ही चर्चा कुठ व्हायला पाहीजे संसदेच्या सभागृहा मध्ये, ही चर्चा कुठ व्हायला पाहीजे, राज्याच्या विधानसभेमध्ये. ललीत मोदी पासून ते निरव मोदी पर्यंत, मला असं वाटतय की ही कॉंग्रेसची देन आहे. ते कॉंग्रेसच जन्मलेल बाळ आहे. याची जबाबदारी घेता आलीतर राष्ट्रवादी म्हणुन घ्या एवढच माझ म्हणण आहे हा विषय मंजूर करावा.

**मा.हर्षल ढोरे –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारलेली आहे, विषय मंजूर करण्यात यावा.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – १४६ | विषय क्रमांक – ३

दिनांक – २८/२/२०१८ | विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ–** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कर/मुख्य/१२/कावि/१३/२०१८ दि.१६/१/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्रमांक २०६३ दि.२४/१/२०१८

शहरातील नागरिकांना ऑनलाईन (डिजीटल) पेमेंट गेट-वेचा वापर करण्यास प्रवृत्त करणे, कराचा भरणा करणेसाठी वेळेचा होणारा अपव्यय टाळणे तसेच कॅशलेस ट्रांजेक्शन करण्यासाठी प्रोत्साहन देणेच्या दृष्टीने महापालिकेच्या संकेतस्थळावर मिळकत कराचा भरणा करण्याची सुविधा देणेत येत आहे. सध्या ऑनलाईन (डिजीटल) पेमेंट गेट-वेकरिता विविध ऍप विकसित असून सदर ऍपचा वापर करुन नागरिकांना जास्तीत जास्त ऑनलाईन कराचा भरणा करणेकामी पर्याय उपलब्ध करुन देणे शक्य होणार आहे. यापैकीच मे. One 97 communications ltd.(paytm) यांनी मिळकत कराचा भरणा त्यांचे ऍपद्वारे स्विकृतीकामी दिनांक 19/5/2017 रोजीचे प्रस्तावाद्वारे कळविले आहे. मे. One 97 communications ltd.(paytm) यांचेशी करारनामा करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन इकडील विभागाने करारनामा मसुदा तयार केलेला आहे.

**सदर करारनाम्यामध्ये पुढील प्रमुख बाबींचा समावेश आहे.**

1. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांकरिता महापालिकेचे संकेत स्थळावरील ऑनलाईन पेमेंट गेट-वे व्यतिरिक्त पेटीएम ऍपचा वापर करुन मिळकत कराचा भरणा करणेची सुविधा उपलब्ध होणार आहे.
2. सदर करारनामा कालावधी हा प्रायोगिक तत्वावर 1 वर्ष कालावधी करीता करणेत येणार आहे. मे.पेटीएम यांचे काम समाधानकारक असल्यास सदर कालावधी हा 2 वर्षासाठी वाढविणेत येईल.
3. उक्त सुविधेसाठी मे.पेटीएम यांना पालिकेच्या वतीने कोणत्याही प्रकारची रक्कम देय असणार नाही.
4. या पध्दतीने जमा होणारा मिळकत कर भरणा हा त्याच दिवशी पालिकेच्या खात्यामध्ये जमा करणेत येईल. असे न झाल्यास संबंधितांना प्रत्येकी र.रु.100/- साठी प्रति दिनी र.रु.5/- इतकी व्याज रक्कम आकारली जाईल.
5. पेटीएम ऍपचा वापर करुन मिळकत कराचा भरणा करणा-या मिळकतधारकांकडून खालीलप्रमाणे शुल्क आकारणेत येणार आहे.

| Particulars | Fee (INR/%) |
|---|---|

| | |
|---|---|
| Net Banking | Rs. 5/- (flat fee) |
| Credit Card | 0.80% of transaction amount |
| Debit Card | 0.50% if transaction amount is <= INR 2000 |
| | 0.75% if transaction amount is > INR 2000 |
| Paytm Wallet | Rs. 5/- (flat fee) |

सदर फी मध्ये शासनाचे कर, शुल्क, फी, GST / CGST / SGST / UTGST / IGST यांचा समावेश नाही. सदर सुविधेद्वारे भरणा करताना नागरीकांना उपरोक्त फी व्यतिरिक्त या सेवेसाठी लागू असलेले शुल्क, फी इत्यादी देखील भरावे लागतील. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मिळकतधारकांना मिळकतकर भरणा करणेकरिता Paytm ची सुविधा उपलब्ध करून देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच Online Payment करिता कोणत्याही कंपनी/ॲपव्दारे स्वीकारली जाईल ही मुभा या विषयाच्या अनुशंगाने नागरीकांकरिता उपलब्ध करुन मान्यता देण्यात येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.मनिषा पवार -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ४

दिनांक – २८/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ –**१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जशुकें/पापु/२६/२०१८ दि.२०/०१/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्रमांक २०७० दि.२४/१/२०१८

पिंपरी चिंचवड शहरातील पाणीपट्टीचे सध्याचे दर सन २००९-१० मध्ये मंजूर करण्यात आलेले आहेत, व सध्या त्याच दराने मीटर रिडींगनुसार पाणीपट्टी आकारण्यात येत आहे. आताचा पाणीपुरवठ्याचा वार्षिक देखभाल-दुरुस्तीचा खर्च ररु.१०९ कोटीच्या पुढे आहे. त्या तुलनेत पाणीपट्टीची वार्षिक मागणी व वसुली फारच कमी आहे. त्यानुषंगाने एका वर्षासाठी दर प्रस्तावित करणे, व त्यानंतर दरवर्षी प्रस्तूत आदेशातील सर्व प्रकारच्या दरांमध्ये वार्षिक वाढ प्रस्तावित करण्यात येत आहेत. तसेच, पिंपरी चिंचवड महापालिकेत अनधिकृत नळजोड नियमित करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे. पिंपरी चिंचवड शहरातील

पाणीपट्टीचे दर वाढविण्याबाबतचा प्रस्ताव व अनधिकृत नळजोड नियमित करण्याचे धोरणास सोबतचे परीशिष्ठ अ प्रमाणे मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदर विषयाच्या अनुषंगाने निवासी वापराकरीता प्रति कुटूंब/सदनिका प्रति महिना ६००० लिटर पाणी मोफत देणेस, त्याचप्रमाणे प्रतिवर्षी १०% दरवाढ न करता त्याऐवजी ती ५% करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.अर्चना बारणे-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.विलास मडिगेरी –** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- सदर विषयामध्ये सन २०१८-१९ या सरकारी वर्षाकरीता शहरातील सामान्य नागरिकांना अल्प दरात सेवा सुविधा उपलब्ध करुन देणेचे दृष्टीने निवासी वापराच्या पाणीपुरवठा दरात खालीलप्रमाणे दर निश्चीत करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | प्रति माह दर | निश्चित करावयाचे दर (प्रति १००० लि. साठी) | झोपडपट्टी साठी |
|---|---|---|---|
| १ | १ ते ६००० लि. | मोफत | मोफत |
| २ | ६००१ ते १५००० लि. | रुपये ४/०० | रुपये ०२/- |
| ३ | १५००१ ते २२५०० लि. | रुपये ०४/- | रुपये ०३/- |
| ४ | २२५०१ ते ३०००० लि. | रुपये ८/०० | --- |
| ५ | ३०,००१ चे पुढे | रुपये १२/०० | --- |

६) ग्राहकाचे देयके प्रति कुटूंब कमीत कमी Rs. ५०/- प्रति महिना म्हणजेच Rs.६००/- प्रति वर्ष ( झोपडपट्टी धोरण)

७) मिटर नसलेले झोपडपट्टीतील Rs.९००/- प्रतिवर्ष

**मा.बाबू उर्फ प्रेमकुमार नायर -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.मनिषा पवार-** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पहील्यांदा तर या वाढीला आमचा विरोध आहे. आपण लोकांना पाणीपुरवठा देवू शकत नाहीत, पाणीपुरवठा मुबलक होत नाही, एक टाईम पण पाणी मिळत नाही. कमी दाबाने पाणी मिळते काही लोकांना पाणी मिळत नाही. नावाला आपण आपल्या झोपडपट्टी बांधवासाठी म्हणतो की मोफत दिलेले आहे. किंवा पहील्या सहा हजार ली. पर्यंत आपण मोफत केल. परंतु

शहरवासियांवर आपण पर्यायाने अन्याय करत आहोत. पाण्याचे दर वाढले पाहीजे त्यामध्ये दुमत पण नाही, आपल इन्फ्रास्ट्रक्चर भरपूर व्हायला पाहीजे त्याबद्दलही दुमत नाही. परंतु बेसीकली जी पाण्याची रिक्वॉयरमेंट आहे ती आपण देऊ शकत नसु, आज एवढया टाक्या आपण बांधल्या लाईन टाकल्या सगळ केल परंतु आज शहराची पाण्याची परिस्थिती काय आहे. दर आठवडयाला तुम्हांला पाण्याचा मॅसेज मिळतो. बुधवारी पाणीपुरवठा बंद राहील, गुरुवारी कमी दाबाने येणार आहे, शुक्रवार पर्यंत पाण्याचा पत्ताच नसतो. आठवडयातून तीन-तीन दिवस पाणी आपल्याला उपलब्ध होत नाही. किती वाईट परिस्थिती आज शहरामध्ये आहे. दुस-या बाजूला किती खर्च करतो, त्याच प्लॅन आऊट केलेल आहे. स्मार्ट सिटीमध्ये सुध्दा आपल्याला त्याचा निधी असणार आहे. महापालिकेमध्ये २२५ का २१६ कोटी रु. आपण पाणीपुरवठयासाठी ठेवलेले आहेत. असे असताना नागरीकांवरचा हा बोजा  कालांतराने वाढविला पाहीजे. अजीबात वाढवायचा नाही अशा मताचा मी नाही. परंतु आज ती योग्य वेळ नाही. आज आपण लोकांना पिण्याच पाणी मुळात देवू शकत नाही अशा परिस्थितीमध्ये आपण ही दरवाढ करु नये अशी विनंती आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये आपण दरवाढ करता कामा नये. आपण जे पुर्वीचा पाण्याचा पुरवठा केलेला आहे, पुर्वीचे जे दर आहेत ते दर आपण कायम ठेवून आपण पहीला पाणीपुरवठा सुरळीत करावा. एका कुटूंबाला जे पाणी लागते ते पाणी देण्याची जी जबाबदारी आहे ती आपण पुर्ण करावी. भामा-आसखेडच्या संदर्भातील असेल, पवना धरणाच्या संदर्भातील असेल किंवा या शहराला रावेत वरुन मिळणारा पाणीपुरवठा असेल, तिथ बांधण्यात येणारे बंधारे असतील तेथील अधिकच पाणी उचलण्याचा प्रयत्न हे सर्व काही आपण केल्यानंतर मग मात्र आपल्याला पाणीपुरवठा सुरळीत झाला, लोकांना आपण किमान एक टाईम जरी पाणी व्यवस्थित देता आलतर त्यानंतरच आपण अशाप्रकारची वाढ सुचवावी अशी आपल्याला विनंती करण्यात येत आहे तोपर्यंत या विषयाच्या अनुषंगाने या वाढीला आमचा स्पष्ट विरोध आहे.

**मा.राजू बनसोडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज दापोडी, फुगेवाडी, कासारवाडी भागामध्ये ११ तारखेपासुन पाणी मिळत नाही. आज किती दिवस झाल पाण्याची बोंब आहे त्यात तुम्ही पाण्याची दरवाढ करत असालतर ते चुकीचे आहे.

**मा. ॲड.सचिन भोसले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. प्रथमतः आपण या शहरामधील नागरीकांना जी पाणीपट्टी आहे त्याच्यामध्ये वाढीव दराने आकारणी करतो ती मुळात चुकीची आहे. याचे कारण असे आहे की, पिंपरी चिंचवड महापालिकेत असे अनेक प्रभाग आहेत ज्याठिकाणी आजही नागरिकांना मुबलक आणि स्वच्छ पाणी मिळत नाही. पिंपरी चिंचवडमध्ये अशी प्रत्येक प्रभागामध्ये जर समस्या असेलतर आपण त्या नागरीकांकडून पाणीपुट्टीमध्ये वाढ करणे योग्य आहे का. कारण की आजही अनेक प्रभाग असे आहेत की त्याठिकाणी प्रेशरचा प्रॉब्लेम आहे, दुषीत पाण्याचा प्रॉब्लेम आहे, त्यांना वेळेत पाणी नाही अशा सगळया समस्या एका बाजुला असताना दुस-या बाजूला जर आपण पाणीपट्टीमध्ये वाढ

केलीतर ते शंभर टक्के चुकीचे ठरणार आहे. त्यामुळे पाणीपट्टीची दरवाढीला माझा शंभर टक्के विरोध आहे. पिंपरी चिंचवड शहरातल्या सर्व प्रभागामध्ये अनेक योजना महापालिकेत प्रलंबीत आहेत. ज्यामध्ये अमृत योजनेअंतर्गत २४ X ७ ही योजना राबवणार आहेत. ती योजना आपण पुर्ण करत नाहीत. आपल्या पिंपरी चिंचवड शहरा मधले सर्व नागरीक जोपर्यंत सॅटीसफाय होत नाहीत, समाधानकारक त्यांना पाणीपुरवठा होत नाही तोपर्यंत मला असं वाटतय की ही दरवाढ १०० टक्के चुकीची ठरणार आहे. त्यामुळे मी विनंती करतो की ही पाणीपट्टी दरवाढ रद्द करावी आणि त्याच्यावर योग्य तो विचार करावा.

**मा.शत्रुघ्न काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा जो दरवाढीचा विषय आलेला आहे त्यात माझा प्रश्न असा आहे की संबंधित अधिका-यांना, माझ्या प्रभागामध्ये १४० सोसायटया आहेत, मग त्या शंभर फ्लॅट पासून पन्नास फलॅट पासून साडेसहाशे ते सातशे फ्लॅट पर्यंत आहेत. आपण हा विषय घेतला १ ते ६ हाजार तो कसा आहे एका कुटूंबाला १ ते ६ हजार लि. आहे का एका कनेक्शनला १ ते ६ हजार लि. आहे. हे कसे काय हा प्रश्न आहे. कुटूंबाला आहे का फ्लॅटला हे सांगावे. तरी संबंधित अधिका-यांनी याची माहिती दयावी.

**मा.जावेद शेख -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, आता थोडक्यात हिशोब काढला की ज्याठिकाणी आपण ३० हजार ली.पाणी महीन्याला देत होतो आडीच रुपयानी त्याठिकाणी जर एखाद कुटूंब जर ३० हजार लि. पाणी वापरत असेलतर त्याला महीन्याला ५१ रुपये वाढतात. म्हणजे पहीले ७५/- रु.बील येत होत आता १२६ रु. येते. सगळयात पहीले आपल्या शहरात पाणी व्यवस्था पुर्णपणे सुधारावी. त्याच्यानंतर हा विषय आणावा. आता सध्या टाकी आमच्या जवळ आहे आकुर्डीत प्राधिकरणात टाकी आहे अजुनही आमच्या वॉर्डात पुर्णपणे पाणी सुरळीत नाही आणि परत हा दरवाढीचा विषय घेवून जर नागरीकां समोर जायच तर चप्पल काढून हाणायच बाकी राहील आम्हांला, बाकी काहीच राहीलेल नाही. कारण मागच्या सहा सात महीन्या पासून पाण्यासाठी किती बोंब झालेली आहे. पण अजुनपर्यंत पाण्याची व्यवस्था पुर्णपणे सुधारली गेलेली नाही. ज्या अर्थी नागरीक संतुष्ट नाहीत. तुम्ही जी त्यांना सर्व्हिस देतात त्या सर्व्हिपासून जर ते समाधान नसतीलतर त्याच्यानंतर परत तुम्ही दरवाढ करायची. तुम्ही समाधान करा, मी मान्य करतो एक माणुस रस्त्यानी जाताना १२/- रुपयाची बिसलेरी बाटली घेतो, गुळण्या करतो फेकून देतो. मान्य आहे दरवाढ व्हावी परंतु पहीले तुम्ही शहरातील जनतेला समाधानी करा त्याच्यानंतर तुमचा दरवाढीचा विषय असेलतर तो तुम्ही घेवून या. सध्याच्या परिस्थित फक्त आणि फक्त एक लक्ष केंद्रीत करा की शहराच्या पुर्ण काना कोप-यामध्ये, मग तुमचा दिघीचा भाग असेल, आमचा महापौर साहेबांचा भाग आहे, सांगवीची साईड असेल अशा ब-याचशा भागात अजुनपर्यंत व्यवस्थित पाणी जात नाही. पहील त्या लोकांचे समाधान करा व नंतर हा पाणी दर वाढीचा विषय आणावा. आज लोक काय म्हणतात की आम्हांला २४ X ७ नका देवू, तीन तास पाणी देतात ते तरी प्रेशरने दयावे.

लोकांच म्हणण तेच आहे की २४ X ७ ते नंतर करा पण पहील आम्हांला समाधानी पाणी दया. लोक हासतात आम्ही काम करायला चाललो की. अक्षरशा हासतात की तुम्ही आम्हांला वेळेवर पाणी देवू शकत नाहीतर २४ तास कधी देणार आहेत. हा दरवाढीचा विषय आहे तो योग्य वाटत नाही. माझ म्हणण आहे की हा विषय तुम्ही दसरी दाखल करावा आणि पहील जनतेला समाधानी करा नंतरच विषय आणावा, धन्यवाद.

**मा.प्रियंका बारसे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, सर्वात प्रथम हा विषय आला आहे पाणीपट्टीची वार्षीक मागणी आणि वसुली फारच कमी आहे. या टायटलवरती हा विषय आहे त्यामुळे मी सर्वात प्रथम हे सुचऊ इच्छिते की, आपली शहरातील अनधिकृत नळ जोडणी किती आहे ते पहा आणि ती अनधिकृत नळ जोडणी मंजुर करुन पहील्यांदा त्याला पाणी मीटर लावा जेणेकरुन वसुली आपली जास्तीत जास्त होईल. पाणी गळतीकडे पण आपण लक्ष दिले पाहीजे. एकाच बिल्डींगमध्ये चार-पाच अनधिकृत नळ जोडणी केलेली असते आणि हे शोधून देण्यासाठी सर्व नगरसेवकांनी सुध्दा प्रशासनाला सहकार्य करावे. त्याच बरोबर आता नळाच्या पाण्याचा प्रश्न समोर आला की दोन- दोन, तीन- तीन दिवस नळाला पाणी येत नाही आणि आम्हांला प्रशासन सुध्दा वेळेवर याबाबतीमध्ये कळवत नाही. रात्री ११ ते ११.१५ वाजता आम्हाला मॅसेज येतो की उदया सकाळी पाणी येणार नाही. अशा वेळी आम्ही नागरीकांना कोणत्या पध्दतीने तोंड दयायला पाहीजे याच उत्तरही आपणच दयाव. पाणीपुरवठा विभागाला, संबंधित व्यक्तीला सुचना दयाव्यात की किमान २४ तास अगोदर तरी आम्हांला पाणी येणार नाही किंवा तुमच्या टाक्या स्वच्छ करायच्या आहेत, एखादा दुरुस्तीचा प्रश्न आला आणि तो अचानक उदभवलतर आम्हांला तो मान्य आहे. पण स्वच्छतेच्या नावाखाली जर आपण पाणीपुरवठा बंद करणार असालतर तो २४ तास अगोदर आम्हांला कळवला जावा, धन्यवाद.

**मा.मिनल यादव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, आपली पिंपरी चिंचवड महापानगरलिका, आपण म्हणतो सर्वात श्रीमंत महापालिका आहे. अशा वेळेस पाणी ही अशी काळाची गरज आहे. प्रत्येक माणसाला पाण्याची गरज लागते. जी सर्वसामान्यांची गरज ती श्रीमंत महापालिका पुरवू शकत नाही याच्यासारखी लाजीरवाणी गोष्ट दुसरी कुठलीच नाही. ग्रामीण भागामध्ये शेतकरी कर्जामुळे आत्महात्या करतात. पुढील काळात शहरी भागामध्ये वेगवेगळया प्रकारची जर तुम्ही करवाढ करताय त्याच्यामुळे सामान्य जनता आत्महात्या करण्याची वेळ तुम्ही आणु नका आणि ता दिवस तुम्ही आम्ही जेव्हा इथे असू तेव्हा तो दाखवू नका. आयुक्त साहेब, आपण मागील काळात जवळ जवळ पाच सहा महीन्यापुर्वी पाण्यासंबंधात मोर्चा आमच्या भागातील महिलानी आणलेला होता तेव्हा तुम्ही तुरन्त बैठक लावुन सांगीतले की जे अनधिकृत कनेक्शन आहेत त्याच्यावर त्वरीत ॲक्शन घ्यावी पण फक्त हे तुमच बोलण झाल त्याच्यावर कुठलीही कारवाई झालेली नाही किंवा तुम्ही बोलले की जे जे लोक सकाळी मोटर लावतात त्याच्यावर आम्ही चेक करु. अनधिकृत कनेक्शन आहेत त्याच्यावर आम्ही

ॲक्शन घेवू पण जेव्हा तुम्ही बोललात त्याच्यावर काहीच झालेले नाही म्हणजे तुमच्या बोलण्याला किमंत आहे की नाही हे जाणवते. तुम्ही ही दरवाढ करण्यापेक्षा आपल्याला पाणीपुरवठा येतो त्याच्या ४० टक्के पाणीगळती होते. ती शोधण्याकडे तुम्ही जास्त लक्ष केंद्रीत केले पाहीजे नाहीतर दरवाढ यात तुमच लक्षच नसल पाहीजे. मेन तुमच ऐम असला पाहीजे की ४० टक्के पाणी गळती होते कशी. अनधिकृत कनेक्शन होतात कसे. ते सगळे अनधिकृत कनेक्शन तुम्ही आदि लिगल करुन घ्यावे त्यामुळे पालीकेचे इनकम नक्कीच वाढेल. त्याच्यापुढे तुम्ही ही दरवाढ करा ती आम्हांला मान्य आहे. ही काळाची गरज आहे पाण्यामध्ये दरवाढ झाली पाहीजे परंतु आता ती योग्य वेळ आहे का, आता लोक इथ आमच्या भगामध्ये आताच जावेदभाई बोलले की लोक आम्हांला चपलेनी हाणतील.  आदिच पाणी चढत नाही. दुधेकर साहेबांना आठवडयातून दोनवेळेस मी फोन करते की पाणी येत नाही तुमचे अधिकारी रात्री आकरा आकरा, बारा बारा वाजता मॅसेज टाकून मोकळे होतात की उदया पाणी येणार नाही. आम्हांला सकाळी पाच वाजल्या पासून लोकांना तोंड दयावे लागते. लोक सकाळी उठल्यापासून शिव्या देतात अशावेळी आम्ही काय करायचे. त्यावेळेस तुम्ही फोन स्विच ऑफ करुन बंद करुन मोकळे होतात. आम्हांला तोंड दयाव लागत आणि आम्ही आता कुठल्या तोंडानी सांगायचे की तुम्ही पाणी दरवाढवली आहे. तुम्ही साध तीन तास पाणी देवू शकत नाहीत आणि  २४X७ ला तुम्ही एवढा निधी गोळा करता, हे कशासाठी करता. ज्या बेसीक गरजा आहेत त्या पुर्ण करा आणि मग ही दरवाढ करा. याला पुर्ण आमच्या शिवसेनेच्या वतीने विरोध आहे.

**मा.संदिप कस्पटे -** मा.महापौर साहेब,  मा.आयुक्त साहेब,  सन्मा.सभागृह, पाणीपुरवठयाच्या दरवाढी विषयी मी आज सभागृहाच लक्ष वेधु इच्छितो  की  मी ज्या वाकड पिंपळेनिलख प्रभागातून निवडून आलो त्या प्रभागामध्ये जवळ जवळ दिडशे लहान मोठे पन्नास फ्लॅट, दोनशे फ्लॅट ते तीन हजार फ्लॅट असलेली पार्कस्ट्रीट सारखी सोसायटी आहे. २०११ ते २०१७ या कालावधीमध्ये आपल्या पिंपरी चिंचवड महापालिकेने ८८७९ बांधकामाना परवानगी दिली त्यापैकी जवळ जवळ ९०० या फक्त वाकड प्रभागातून आणि पिपळेनिलख प्रभागातून ३६६ परवानग्या त्या भागात बांधकामाना मिळालेल्या आहेत. सर्वात जास्त महसुल पिंपरी चिंचवड शहरात वाकड, पिंपळनिलख प्रभागातून जमा होतो. याठिकाणी मी खेदाने सांगु इच्छितो की या प्रभागामध्ये मुलभूत, पाण्यासारखी सुविधा आपण पुरवु शकत नाहीत. ज्या ठिकाणी २०० फ्लॅटची सोसायटी आहे, कमीत कमी १५० युनीट पाणी त्याठिकाणी आले पाहीजे. आशा ठिकाणी केवळ ३० ते ४० युनिट पाणीपुरवठा होतो. पाणीपुरवठयाच्या अधिका-यांना जर आम्ही सांगीतल की सर्व सोसायटीमध्ये पाणीपुरवठा वाढवा. पाणी मागीतले की त्यांची किडनी मागीतली अशी प्रतिक्रीया त्यांची असते. कुठलेही पाणीपुरवठयाचे अधिकारी सहकार्य करत नाहीत. दिवसभरात १०० फोन आले तर ९० फोन हे पाणीपुरवठया विषयीचे असतात.

याठिकाणी प्रामाणिक करदाते जे आपल्याला कर भरतात त्यांच्यावर अन्याय होतो असे मी नमुद करतो. जोपर्यंत आपण संपुर्ण शहरात मुबलक आणि सुरळीत पाणीपुरवठा करत नाहीत तोपर्यंत कुठल्याही प्रकारची दरवाढ करु नये अशी सर्वसामान्य जनतेच्या वतीने मी विनंती करतो.

**मा.विठ्ठल उर्फ नाना काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, सर्वांनी व्यथा मांडलेली आहे त्याच पध्दतीने मी सांगतो की सुरवातीला तुम्ही पाणी सुरळीत दया. सर्व नागरीकांना पाण्याची व्यवस्था नीट करा नंतरच हा विषय महापालिका सभेसमोर आणावा. हा विषय सर्व नगरसेवकांच्या वतीने, राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने मी सांगतो की दप्तरी दाखल करावा. कुठलीही दरवाढ करु नये आणि आता ५१ रुपयाचा फरक दिसतो हा देखील कुठलीही दरवाढ न करता आहे असा विषय थांबवलातर हरकत नाही.

**मा.राजेंद्र लांडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, आजचा जो हा विषय पाणीपट्टी दरवाढीचा आलेला आहे. साहजीकच आहे की आपल्या महापालिके मध्ये पाण्याचे दर खरच कमी आहेत पण आपण जर असं पाहीलेतर बरेचसे प्रभाग असे आहेत की त्याठिकाणी आम्ही फिरतो त्यावेळेस लोक अक्षरश: प्रश्नाचा भडीमार करतात की पाणी कधी येणार आहे, पाण्याचे नियोजन कसे आहे पण कोणताही अधिकारी या वारंवार तक्रारी देतोत त्याच्यामधुन आम्हांला समाधानकारक उत्तर देत नाहीत. रात्री एक-एक वाजता पाण्याचा टप्पा असतो महीला जागतात, परत सकाळी ४ वाजता टप्पा चालू होतो. अधिकारी म्हणतात की टाकीची लेव्हल आली नाही, टाकी भरत नाही. प्रत्येकवेळेस हे होतय, आज नवीन लाईन टाकण्याचे काम चालू आहे. ठेकेदार येत नाही. बरेच असे प्रॉब्लेम आहेत. निश्चित दरवाढ करा पण जे प्रशासनाला पहीले असे पण आदेश दया की आंद्र धरण असेल, भामा आसखेडचे असेल की पाण्यावरती माणस नेमून लवकरात लवकर हे काम मार्गी लावावे. तसे ग्रामीण भागात सगळयात जास्त नागरीकरण वाढले आहे त्या भागात आपण पाण्याची व्यवस्था कशी करणार आहोत कारण त्याठिकाणावरुन आपल्याला ग्रामीण भागातून जास्तीत जास्त महसुल मिळतो टॅक्स मिळतो. माझी प्रशासनाला अशी विनंती राहील की तुम्ही प्रत्येक प्रभागामध्ये पहील सक्षमपणे पाणी पुरवावे मगच या विषयावरती चर्चा करावी.

**मा.झामाबाई बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, पाणीपुरवठा हा जिव्हाळयाचा प्रश्न आहे. पिंपरी चिंचवड शहरात अनेक ठिकाणी सुरळीत पाणीपुरवठा होतो अणि अनेक ठिकाणी पाणीपुरवठयाचे खुपच प्रश्न उपलब्ध होत असतात. खरेतर प्रत्येकांनी सांगीतले मोठमोठया सोसायटया आहेत काही ठिकाणी पाणी सुरळीत आहे काही ठिकाणी नाही. परंतु थेरगाव परिसरात सोसायटया एवढया जास्त नाहीत परंतु जी बैठी घर आहेत त्या बैठया घरासाठी सांगते की पाणीपुरवठा अतीशय दुषीत होतो. ड्रेनेज लाईन आणि पाण्याची लाईन

दुषीत पाणी हे खरोखरच लोकांच्या आरोग्याचा प्रश्न आहे. ड्रेनेजचे पाणी पिण्याच्या पाण्यामध्ये मिक्स होते. काही ठिकाणी ड्रेनेजचे पाणी आहे का गटरचे पाणी आहे कुठले पाणी हे लोकांना कळत नाही. पाणी आल्या बरोबर पाणी किती तरी वाया जात आणि जो पाण्याचा आपला टाईमींग आहे त्या टाईमींग पर्यंत अर्धा वेळ तर त्या घाण पाण्यामध्येच जातो आणि लगेच पाणी बंद करतोत. काही लोकांना पाणी मिळत नाही. कुणाला हांडाभर कुणाला दोन हांडे असं पाणी मिळत. आपल्या महापालिकेचे पाणीपुरवठयाचे नियोजन आहे. ज्या ज्या ठिकाणी घाण पाणी मिक्स होते त्या त्या ठिकाणी खरच लक्ष दिले पाहीजे. लोकांच्या आरोग्याचा प्रश्न आहे, पाणीपट्टीत वाढ केलेली आहे ती भरण्यासाठी लोक तयार होतील. त्यांना सुरळीत आणि चांगले पाणी मिळालेतर, स्वच्छ पाणी मिळालतर व पाणीपट्टी वाढविलीतर लोक ती भरतील. आठ आठ दिवस पाणी दुषीत येत असेलतर ते लोक स्वयपाकांसाठी पाणी विकत आणतात त्यामुळे आपण त्यांना चांगल व स्वच्छ पाणी दिलतर ते विकत पाणी आणण्यापेक्षा आपण चार रु. वाढ केलीतरी त्यामध्ये काही हरकत राहणार नाही, स्वच्छ पाणी मिळाले पाहीजे. पाणीपुरवठा व्यवस्थित झाला पाहीजे आणि प्रेशरने पाणी मिळाले पाहीजे. खरोखरच काही भागात खुपच मागच्या आठवडयात घाण पाणी येत होते. त्याठिकाणी अधिका-यांनी पण धावपळ करुन एक दोन दिवसामध्ये सुरळीत पाणीपुरवठा केला. स्वच्छ पाणी देण्याचा प्रयत्न त्यांनी केला मी त्या अधिका-याचे अभिनंदन करते. धुमाळ असतील त्यांचे बाकीचे डेप्युटी असतील. दुषीत पाण्यापासुन लोकांच्या आरोग्याला जर धोका पोह्चत असेलतर प्रथम आरोग्य चांगलेतर सगळे चांगले आहे. दवाखान्याला पैसे घालवण्यापेक्षा, विकत पाणी आणण्यापेक्षा आपण जरी पाणीपट्टीमध्ये दरवाढ केलीतर माझी काही हरकत नाही आणि नागरीकांची सुध्दा हरकत राहणार नाही. परंतु स्वच्छ आणि प्रेशरने पाणी मिळावे एवढी अपेक्षा व्यक्त करते.

**मा.सारीका लांडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, प्र.क्र. ६ मध्ये देखील अत्यंत कमी दाबाने पाणीपुरवठा होतो. अधिकारी सांगतात टाकीमध्ये पाणी शिल्लक राहत नाही असे उत्तर असते. काही भागामध्ये १२ ते १ च्या दरम्यान पाणी येते. आयुक्त साहेबांना अनेकवेळा फोन लावलेला आहे. कारण की १२ ते १ च्या दरम्यान पाणी आलतर महिलांनी पाणी कधी भरायचे. सकाळी मुलांना शाळेत सोडायचे असते कसे मॅनेज करणार. माझ्या प्रभागामध्ये टाकी बांधलेली आहे त्याचे काम पुर्ण झालेले असून ती टाकी भरली जात नाही. मी विनंती करते की सर्वांना समान पाणीपुरवठा करावा. प्रेशरने पाणीपुरवठा मिळावा त्याच्या नंतर दरवाढ करावी.

**मा.निता पाडाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, तुम्ही हा विषय आणलेला आहे. १०९ कोटी देखभाल दुरुस्तीसाठी खर्च आहे. तरी १०९ कोटीची कुठे दुरुस्ती केली जाते, कारण की आयुक्त साहेब आपली देखभाल दुरुस्ती व्यवस्थित केली जात नाही. दोन तीन दिवस झाले की थेरगावचे पंपींग स्टेशन बंद पडते मग ठेकेदाराला कशासाठी आपण १०९ कोटी

देतात. देखभाल दुरुस्तीसाठी एवढा आपण खर्च करतोत तर मग प्रॉब्लेम शहरात यायलाच नाही पाहीजे. आपण सांगीतले देखभाल दुरुस्तीच्या तुलनेत आपली जी मागणी वसुली आहे ती खुपच कमी आहे. पण आयुक्त साहेब आपण कधी याचा विचार केला का की नागरीकांना पाणीपुरवठयाचे बील व्यवस्थित देतोत का. आपण जी पाणीपुरवठयाच्या बीलांच्या संदर्भात एजन्सि नेमलेली आहे ती एजन्सि मार्फत कोणत्याही नागरीकांना व्यवस्थित बील मिळत नाहीत. अक्षरक्षः सहा महीन्यानी कधी कधी एक वर्षानी बील येतात त्यामुळे लोकांना एकदम जास्त रक्कम येते त्याच्यामुळे आपले बील भरणा होत नाही याच्याकडे लक्ष दिले पाहीजे. विषय चांगला आहे लोकांची मानसीकता पण आहे, आपण पाचच टक्के वाढ करणार आहोत ते ठिक आहे. या गोष्टीकडे पाहीले पाहीजे. वसुली कशी झाली पाहीजे याच्याकडे लक्ष दिले पाहीजे. ठेकेदारावर अंकुश नाही. ठेकेदार बील देतात हे किती नगरसेवकांना माहित आहे. तो ठेकेदार कधी नगरसेवकांकड पण येत नाही. तुमच्या वॉर्डातील काही समस्या आहेत का, लोकांना बील व्यवस्थित जाते का हे विचारण्यासाठी. एकाही नागरीकांना बील व्यवस्थित जात नाही त्याच्याकडे आपण लक्ष दयावे. त्याचप्रमाणे २४X७ योजना चांगली आहे ती त्वरीत पुर्ण करावी एवढ सांगते आणि थांबते.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, खरेतर चार पाच महीन्यापुर्वीच मी हा प्रश्न सभागृहात उपस्थित केला होता. त्यातून संपुर्ण पाणीपुरवठया संदर्भात प्रशासनाचे लेखी उत्तर मला मिळालेले होते. त्याच वेळेस मी सांगीतले होते सर्व गट नेत्यांची पाणीपुरवठयावर समिती नेमा. कारण की हा मुद्दा, पाण्याचा प्रश्न हा काही राजकीय होवू शकत नाही. नागरीकांना मुलभूत सोई सुविधा देण्याचे महानगरपालिकेचे कर्तव्य असते त्यातील महत्वाचे कर्तव्य म्हणजे पाणी हा मुद्दा आहे. आयुक्त साहेब, तुम्ही महानगरपालिकेच्या संपुर्ण महाराष्ट्रातील संपुर्ण वर्गवारी जर केलीतर त्यानुसार आपला आलेख काढलातर आपण असाही दावा करु शकाल की सर्वात कमी पैसे आपले असतात. प्रत्येक महापालिकेची भौगोलीक परिस्थिती वेगवेगळी आहे. आपल्याकडे धरण आहेत, इतर महानगरपालिकेच्या ठिकाणी धरण नाहीत. पाणीपुरवठा करण्यासाठी जे योग्य नियोजन लागत त्या नियोजनाचा आभाव आहे. इथ कसं आहे चोर सोडुन सन्यासाला फाशी. आता ब-याच भगीनीनी अतीशय उत्तम भाषण केलेली आहेत. प्रश्न असा आहे की तुम्ही दरवाढ करण्यासंदर्भात एक वेळ अशी आल्या नंतर किमान ७० ते ८० टक्के लोकांचे समाधान जर झालेतर कोणी सभागृहातील सभासद म्हणणार नाही की दरवाढ करु नका कारण सर्वात स्वस्त पाणी आपण देतो पण प्रश्न असा येतो की २०१५ नंतर मी मागेही प्रश्न केलेला होता. प्रश्न केल्यानंतर प्रशासनाकडून काही उत्तर नाही त्यानंतर बजेटच्या सर्व मिटींग चालू होत्या त्यामुळे मी लेखी स्वरुपात प्रश्न दिलेला नाही. मी आज पुन्हा एकदा विचारतो की २०१५ नंतरचे अनधिकृत बांधकाम झालीच नाहीत असा तुमचा दावा आहे का. अनधिकृत कनेक्शनचे बील

वसुल होत नाहीत त्याच्या नोंदणी नाहीत. ३० टक्के पाण्याची चोरी आहे याचे सगळे प्रायश्चित जे करदाते आहेत जे प्रामाणिकपणे बील भरतात त्यांच्यावर हा भुर्दंड लागू होतो. मग आपण म्हणायच की महानगरपालिकेत ८५ कोटी रु. आपली तुट आहे तरी आपण दरवाढ करावी हे पटवून दयायच. ८५ कोटी तुट ही नगरसेवकां मुळे नाही, किंबहूना या संपुर्ण सोसायटीत प्रामाणिकपणे बील भरतात त्यांच्यामुळे नाही. २०१५ नंतर अनधिकृत घरे झालेली नाहीत असे स्थापत्य विभागाने आम्हांला सांगावे. त्यानंतर एकही घर अनधिकृत झालेल नाही अस सांगाव. किती अनधिकृत नळ कनेक्शन तोडले हे देखील सांगावे. किती लोक मोटर लावतात, पाणी ओढून घेतात हे सांगाव. किती मोटारी आतापर्यंत जप्त केलेल्या आहेत. याचा अर्थ एकही मोटार चालू नाही. चला तुम्हांला एकदाच पंचवीस मोटार पकडून देतो तुम्हांला. सर्व काही सुरळीत आहे. प्रमुख अधिका-यांना तर पंपींग आणि नळ कनेक्शन हेच माहित नाही. यांचा मोठा प्रॉब्लेम काय त्याना त्याच्यावर अवलंबून रहाव लागते. तो बरोबर सांगतो या परिसरातील वॉल आपण ताईट करुन किती आटया करायच्या तो त्याचा व्यवस्थित कार्यक्रम करतो. त्या पध्दतीने त्या त्या परिसरामध्ये पाण्याच वितरण होतं. मुळात जेवढी लोकसंख्या आहे त्यानुसार असलेले नियोजन, पाणीपुरवठा करण्यासाठी जी यंत्रणा लागते ती यंत्रणाच मुळात मुबलक नाही. एकतर तुम्हांला खासगी यंत्रणेव्दारे हे सर्वेक्षण केले पाहीजे. आपल्या अधिका-यांच काम नाही. एका एका सोसायटीमध्ये चार चार कनेक्शन आहेत. पहील्या मजल्यावर, दुस-या मजल्यावर, तीस-या मजल्यावर काही जुन्या सोसायटया अशा आहेत की त्याला खाली टाकीच नाही. परंतु हे नियम आहेत की खाली टाकी पाहीजे. परंतु त्यानंतरही अपेक्षा असते की चौथ्या, तीस-या मजल्यावर पाणी यावे त्यासाठी अनधिकृत कनेक्शन असतात ते कुणाला माहितही नाहीत. जर त्याला दयायचे असेल अधिकृत तर त्या अधिकृत तुम्ही नोंदी करा. ८५ कोटीचे डायरेक्ट तुमच २५ कोटीवर येईल. पुण्यात २५० कोटीची बील जातात व २२५ कोटीची वसुली आहे आपले ८५ कोटीची तुट आहे. ३० टक्के पाणी चोरी आहे याचे प्रायश्चित आम्ही नगरसेवकांनी करायचे का. रावेत बंधा-याचे टेंडर काय झाले पाणी किती जरी उचललेतरी चोरी नाही थांबविली आणि जर अनधिकृत नळकनेक्शन अधिकृत केले नाहीतर अनधिकृत घर असा शिक्का देतात टॅक्स घ्या, तस तुम्ही पाणीपट्टीसाठी करुन घ्या. अनधिकृत घर आहे पण टॅक्सतर घ्या तुम्ही. त्याच प्रायश्चित बाकीचे जे प्लॅन मंजूर करुन घर बांधतात त्यांच्यावर जो काय राग निघेल तो त्या अधिकृत घरावर निघतो. पिंपळेगुरव, पिंपळेसौदागर, वाकड, रावेत हा अधिकृत परिसर झाला त्यामुळे उत्पन्न वाढले आहे. नाहीतर आता हा अनधिकृत घराचा सुळसुळाट सुटलेला आहे त्यातुन ही तुट अशीच राहणार आहे आणि हीच भाषण प्रत्येकवेळेस आपण करत राहणार आहेत. माझे प्रशासनाला नंम्र आवाहन आहे वास्तव स्वरुप काय आहे याचा साकल्याने विचार करावा. पक्षानेत्यांना सांगतो की तोही विचार करावा की चोरी पहीली शोधावी. वीस-पंचवीस वर्षे तोच कार्यक्रम चालु आहे. आपण तीकड

दुर्लक्ष करतो म्हणून हे सगळ आपल्या समोर आलेल आहे. दरवाढ करणे हे क्रमप्राप्त आहे पण दरवाढ करण्यासाठी जे अधिकृत आहेत ते तरी समाधानी आहेत का. मा.महापौर साहेब, आपण आदेश दयावेत, सभागृहामध्ये आदेश देण्याचे अधिकार आपल्याला असतात. ही जी चोरी आहे, तीस टक्के चाळीस टक्के गळती आहे. ८५ टक्के जी तुट आहे. जे अनधिकृत घराची बांधकाम २०१५ नंतर झालेलीच नाहीत का आता तुम्ही चला कितीतरी घराची बांधकाम दिसतील. याचा अर्थ ते काही बीगर पाण्याचे राहतात का दहा वर्षे. त्यांचे पहीले सर्वेक्षण करा. या ८५ कोटीमध्ये ३५ ते ४० कोटीत दरवाढीचा निर्णय आलातर सर्व पक्षाचे गटनेते मिळून एकत्रीत बसून निर्णय घेता येईल. प्रशासनाचे जे प्रायश्चित आहे ते आम्ही का करावे. मुंबई सारख्या ठिकाणी माझे  नातेवाईक राहतात वीस ते पंचवीस वर्षे सकाळी ७ वा. पाणी येते. एक पाण्याची टाकी नाही अख्या मुंबईमध्ये, तेथील तज्ञ माणस आणावेत. नाही तेथे तज्ञ नेमतो त्याला आपण फुकट पैसे देतो. काहीतरी अशी योजना करा. हे भाषण पंचवीस वर्षापासुन मी पण ऐकतोय. प्रत्येक नगरसेवक या विषयावर बोलेल. पाणीच वेळेवर येत नाही नां. पण मुंबई सारख्या ठिकाणी इतक सुरळीत पाणी ६ वाजता येते.  का आख्ख मुंबई हे नौकरशाह आहे.  त्यांची जर गाडी चुकलीतर त्यांचा संपुर्ण दिवस खराब जातो म्हणून तेथे वेळेवर पाणी येते. याचा अर्थ याठिकाणी कुणाला काम धंदे नाहीत का. इथ आरामशीर आहे सातच पाणी पाचला येत कधी लाईट गेली, टाकी भरली नाही, जनरेटर नव्हते  हे उत्तर किती वर्षे ऐकायचे. काही दिवस टाकीचे शहर म्हणुन ओळखले जाईल एवढया टाक्या झाल्या आहेत. या परिस्थितीत तुम्ही वास्तव स्विकारा, तज्ञ माणस नेमा. सय्यद सारखे अधिकारी होते ते रिटायर्ड झाले, त्यांना डायबेटीस झाला असे अधिकारी होते ते पाहट तीन तीन वाजता उठून खरच पाणी गेल का ते बघत होते. ते फोन आला की घाबरायचे. कित्येक अधिकारी मी पाहीले आहेत की त्यांना रोगराईना सामोरे जावे लागले केवळ आपल्या या टेन्शनमुळे. नागरीक आमच्याकडे येतात त्याच भावना आम्ही तुमच्याकडे व्यक्त करणार. आज दुधेकर साहेब आहेत म्हणजे आमचा काही जमिनी वरुन वाद आहे का त्यांच्यात आमच्यात. हे भाषण या संदर्भातील ऐकण्यापेक्षा त्याच्यावर मास्टरप्लॅन तयार करावा. जसा डीपी तयार करतो, नियोजीत आराखडयानुसार आपण टेंडर निश्चित करतो. त्याच पध्दतीने मुंबईतील तज्ञ माणस बोलवा एजन्सि नेमा. ८५ कोटी मधले दहा कोटी त्यांना जाऊ दया. पाणीपुरवठा सुरळीत करा. किती वर्षे भाषण करायची आहेत. उत्तर ठरलेल असत की निगडीचा भाग उंचावर आहे, हा भाग खाली आहे, मग पाणी तीकडून जोरात येतं, इकड जात, तीकड जातं. मुंबईला तसे नाही का या सगळया परिस्थितीच भान ठेवून मास्टरप्लॅन करावा. मा.महापौर साहेब, तुम्ही सहा महीन्यापुर्वी समिती केली असती मी सांगीतल्याप्रमाणे तर हा विषय आला नसता.  सर्व पक्षाच्या संमतीने हा विषय परत येवू दया. याच्यावर साकल्याने शहर म्हणून विचार करुन निर्णय घ्यावा, घाईने निर्णय घेऊ नका.

**मा.स्विनल म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. संबंधित विषय हा २००९-१० नंतर पाणीपट्टीच्या दरवाढ करण्याबाबतचा आहे. सदर पाणीपट्टी सुचवलेली आहे हा वार्षीक खर्च १०९ कोटी आहे व वसुली बाकी आहे म्हणून भरपाई करण्यासाठी प्रस्तावीत आहे. तसेच पाणीपुरवठा लाभ करामध्ये ही वाढ करण्याचा विषय आहे. १०९ कोटीच्या वार्षीक खर्चाच्या मानाने ३० ते ३५ कोटीची पाणीपट्टी वसुली होते हे फार कमी निश्चित आहे. म्हणून मा.महापौर सहोब, महापालिका काही सेवा देत असतात त्या सर्व सेवामध्ये नफा मिळवतोच असे नाही. आपण वाहतूक सेवा, आरोग्य सेवा इ. जशा सेवा नागरीकांना आपण सेवाभावी सेवा म्हणून देतो त्याचप्रमाणे पिण्याचे पाणी ही देखील सेवा देतो. महत्वाचा विषय असा आहे की २०१६-१७ मध्ये पीएमपीएमएलचे लेखापरिक्षणा नुसार संचलन तुट ही २१० कोटी आलेली आहे. आपल्या महापालिकेच्या वाटयानुसार ४० टक्के रक्कम ही पीएमपीएमएलला दयावी लागते. त्याप्रमाणे जवळपास ८० ते ८५ कोटी रु. दयावे लागतात. परंतु मा.महापौर साहेब, मला अस वाटत की, शहरातील किती नागरीक पीएमपीएमएलने रोज प्रवास करतात. करत असतीलतर ते फक्त ३० ते ४० टक्के नागरीक प्रवास करत असावेत म्हाणजेच ३० ते ४० टक्के नागरीकांना सेवेसाठी आपण वार्षीक ८० ते ८५ कोटी संचलन तुटी व्दारे खर्च करतो व नागरीकांना सेवा देतो. तसेच पाणीपुरवठयासाठी आपण सेवाभावी क्षेत्र म्हणुन काही खर्च का सहन करु शकत नाहीत. पाणी तर आपले शहरातील १०० टक्के लोक पितात मग आपण ७० ते ७५ कोटी खर्च का सहन करु शकत नाहीत. तसेच लाभकरामध्ये पुढे होणा-या २४X७ पाणीपुरवठा खर्चासाठी वाढ करण्याचे धोरण आहे. तसे आपण आजपर्यंत पीएमपीएमएलचे बीआरटी संबंधीत कोटयावधी खर्च केलेले आहेत व त्यापासून अजून फारसा काही लाभही झालेला नाही. तसेच पाणीपुरवठयाचे पुढील २५ वर्षाचे नियोजन करताना जर काही खर्च एकदाच होत असेलतर तो लाभ करामध्ये वाढ कशासाठी. आता पाणीपुरवठयाची परिस्थिती गंभीर आहे. माझ्या प्रभागामध्ये पाणीपुरवठा अतीशय अनियमीत झालेला आहे. अतीशय कमी दाबाने पाणी येते. एक ते दोन तास येते ते पण ठरलेल्या वेळे पेक्षा उशिरा येतं आणि आले तरी ते फक्त दोन ते आडीच तास पाणीपुरवठा राहतो. यामुळे दररोज आम्हांला नागरीकांचा रोष सहन करावा लागतो. येथून मागे पंचवीस वर्षे पाण्याचे नियोजन का केलेले नाही. लोकसंख्या वाढीनुसार पाणीपुरवठा नियोजन होणे गरजेचे आहे. येथून पुढे मात्र पंचवीस वर्षाचे नियोजन करताना आताच काळजी घ्यावी कारण रक्कम तरतूद पाहीजेत तर काही स्थापत्याची कामे कमी करुन वर्ग करुन घ्या परंतु नियोजन चांगले करावे अशी मी विनंती करते. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माझी आपणास एवढीच विनंती आहे की सदर पाणीपट्टीची वाढ जी आपण सुचवलेली आहे ती कमी करुन जे सहा हजार लि.मोफत पाणीपुरवठा आहे तो सुध्दा नको आहे कारण पाण्याचे महत्व नागरीकांना समजणे गरजेचे आहे. स्थायी समितीव्दारे जे

पाणीपट्टी वाढ सुचवली आहे त्यामध्ये काही थोडेफार प्रमाणात वाढ करुन सदर विषय मंजुर करावा ही विनंती, धन्यवाद.

**मा.विनया तापकीर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सर्वात गंभीर भाग जर असेलतर आमचा च-होली आणि मोशी परिसर. अत्यंत पाणीपुरवठयाच दुर्लक्षीत झालेले क्षेत्र आहे. कारण प्रत्येक ठिकाणी दररोज शंभर शंभर फोन असतात. ताई, आज पाणी नाही, उदया पाणी नाही. रोज पाण्याचा हा प्रॉब्लेम आहे हा काही आमचा सॉल्व्ह होईनां. कालच एकाने मॅसेज केला की ताई, वर्षे-वर्षे आम्ही टँकर वापरतो, आमच्याकडे फक्त नळातून हवा येते, या हावेचा आम्ही कर भरायचा का. ग्रामीण भागात पाणीपुरवठयाकडे अत्यंत दुर्लक्ष होते. आमच्याकडे मोठमोठया सोसायटया निर्माण होतात. ग्रामीण भागात नागरीक राहीला येतात पण त्यांना आम्ही जर मुलभूत सुविधा पुरवू शकलो नाहीतर हे आमच दुर्भाग्य आहे. सगळयात जास्त महापालिकेला टॅक्स असेलतर आमचे प्रभागातून सगळयात जास्त टॅक्स आमचे नागरीक भरतात. मोठमोठया सोसायटया उभ्या राहतात. तिथं पुढे भविष्यात पाण्याचा खुप मोठा यक्ष प्रश्न येणार आहे कारण ते पाणी आपण देणार कुठून. सगळीकडून आलेले पाणी शेवटी आमच्याकडे येते. त्या पाण्यात आम्हांला भागवावे लागते. आमची बुर्डे वस्ती असू, अर्धतर पाईपातच पाणी जातं त्याच्यानंतर फक्त पंधरा ते वीस मीनीट पाणी तिथ राहतं. आंद्रा-भामा आसखेड धरणातून पाणी उचलले पाहीजे. पण येणा-या आताच्या बजेटमध्ये फक्त २३ कोटीची तरतूद ठेवलेली आहे. त्या २३ कोटीमध्ये काम होणारच नाही. मुळात म्हणजे पिंपरी चिचवड महानगरपालिकेची ही गरज आहे ती आता आपण आंद्रा धरणातून पाणी उचलले गेले पाहीजे तरच भविष्यात आपल्या नागरीकांचा प्रश्न सुटणार आहे. पाणीपुरवठयाचे अधिका-यांचे तर एवढ दुर्लक्ष आहे. जर तुम्ही सांगीतल की आज रावेतवर दुरुस्ती होणार आहे तेव्हापासून अधिका-यांचे चार दिवस फोन स्विच ऑफ असतात. काय करायच साहेब, तुम्ही उत्तर दयाव. अधिका-यांनी जर फोन स्विच ऑफ केल्यास आम्ही कोणाला बोलणार. आम्ही नागरीकांकड गेलोतर नागरीक आम्हांला बोलतात. लोकप्रतिनीधीना वस्तुस्थितीला सामोरे जावे लागते. मग तुम्ही अधिकारी का फोन बंद करता याचे उत्तर दयाव तसेच आमच्याकडे पाण्याच्या टाक्या आहेत वडमुखवाडीच्या टाकीला झाकण नाही. जेव्हा पासून टाकी बांधलेली आहे तेव्हापासून झाकण नाही. मागच्यावेळेस दोन-तीन कबुतर मरुन पडलेली होती आणि तेच पाणी आपण पितो. त्याठिकाणी गवत वाढलेले आहे, लोक कसे जाणार त्रास होतो टाकी भरायला जे लोक जातात त्यांना तिथ अक्षरश: त्रास हातो. त्यात कबुतर मरतात तेच पाणी आपण पितो. गेली वर्षेभर आम्हांला घाण पाण्याचा सामना करावा लागत होता. पुर्णपणे ड्रेनेज मिक्स पाणी आमच्या नळाला येत होतं. प्रत्येक वेळेस अधिका-याकड तक्रार केलीतर आज होईल काम, उदया होईल काम पण आजतागायत तरी अस झालेल नाही. साहेब, आमचा या दरवाढीला पुर्णपणे विरोध असेल. हा विषय दप्तरी दाखल करावा अशी विनंती करतो.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. अतीशय महत्वाचा विषय आहे गेले एक ते दिड महीना हे शहर ज्या विषयाकडे वेगळया नजरेनी पाहते. हे शहर म्हणजे सर्वसामान्य कामागार नगरीचे शहर आहे. याच्यामध्ये सर्वसामान्य नागरीक हा शास्तीकरापासून त्रस्त झालेला आहे. त्याचप्रमाणे मोठमोठे एमएसईबीचे बील आज आपल्या घरामध्ये पडत आहेत. त्याच्रपमाणे आज आपण नव्याने जो ठराव सभागृहापुढे आणलेला आहे तो पाणीपुरवठया संदर्भात आहे. मा.महापौर साहेब सर्वसामान्य नागरीकांना पोटाची खळगी भरण्यासाठी रोज सकाळ ते संध्याकाळ पर्यंत काबाडकस्ट करणारा जो व्यक्ती आहे त्यांनी नक्की शास्तीकर भरायचा का वाढलेली पाणीपट्टी भरायची का शाळेच्या मुलांच्या फि भरायची, का लाईट बील भरायचे का पोट भरायचे. एक व्यक्ती किती पैसे भरणार आहे. महापालिकाकडे सर्वसामान्य नागरीकांनी एक अपेक्षानी, एक प्रेमाने पाहीले पाहीजे. पण सर्वसामान्य नागरीकांनी महानगरपालिकेकडे पाहीले की पळून जाण्याच्या तयारीत आहे अशी परिस्थिती आहे. सर्वसामान्य नागरीक काय म्हणतो, ही महानगरपालिका बरखास्त करा आम्हांला गरज नाही. महत्वाची गोष्ट म्हणजे आज नागरीक त्रस्त झालेले आहेत. भरपुर योजना आपण महानगरपालिमार्फत सर्वसामान्य नागरीकांना देतो ही गोष्ट आम्ही पण मान्य करतो. त्यासाठी काही निधी उभा रहावा लागणार आहे हे आम्ही पण मान्य करतो. पण एक गोष्ट विसरता कामा नये चांदया पासून बांध्या पर्यंत आपण आहात. हा जो निधी आहे तो वरुन आणानां. आज माझ्या देशाचे पंतप्रधान मा.नरेंद्रभाई मोदीना एक आवाज दया तुम्हांला पैसे मीळतील. तुम्ही आवाजच देत नाहीत. मी तुमच्या बरोबर येणार पण सर्वसामान्य नागरीकांवर कोणत्याही प्रकारची दरवाढ करु नये. महत्वाची गोष्ट म्हणजे हा जो विषय आहे त्याच्यामध्ये पैसे कमी केले. पण झोपडपट्टीधारकांना काय एक प्रकारचा तुमचा अन्याय आहे. १ ते ६ हजार ला तीन रु. ६ ते १५ हजारला ४ रु. एक प्रकारचा तुम्ही अन्याय करता हे आम्हांला अमान्य आहे. हा दुजाभाव आम्ही सहन करणार नाहीत. या सभागृहाचे नगरसेवक म्हणून कोणतीही दरवाढ आम्हांला नको. सर्वसामान्य नागरीकांवर अन्याय करु नका. भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नगरसेवक दरवाढ विरोधात आहेत. मनसेचा मी एकमेव नगरसेवक तो सुध्दा विरोधात आहे. सर्वसामान्य नागरीक तुमच्या आमच्या विरोधात, सभागृहाच्या विरोधात जायला तयार आहे. आज तुम्हांला मी सांगतो की ही अन्यायकारक दरवाढ करु नका. ज्या ज्या ठिकाणी मोठमोठे हॉटेल आहेत, अनधिकृतरीत्या हॉटेल्स बांधलेले आहेत दोन दोन इंची, चार चार इंची कनेक्शन हॉटेलसाठी वापरले जातात. त्यांच्यावर कारवाई करा. त्यांच्यावर का कारवाई करत नाहीत. आज अनधिकृतरीत्या जे पाणी वापरतात. मोठमोठया सोसायटयाना जे अनधिकृतरीत्या कनेक्शन आहेत. झोपडपट्टीमध्ये जे कनेक्शन आहेते ते का तुम्ही व्यवस्थीत करत नाहीत. महत्वाची गोष्ट म्हणजे जे मोठमोठे टपरीधारक आहेत ज्यांनी अनधिकृतरीत्या एक-एक, दोन-दोन इंचाचे अनधिकृत कनेक्शन

घेतले त्याच्यावर कारवाई करा आणि ज्या ज्या ठिकाणी गळती होते ती थांबविण्याचा प्रयत्न करावा. आज सर्वसामान्य नागरीक त्रस्त असताना पुन्हा एकदा दरवाढ सभागृहासमोर आणलेली आहे यासाठी आम्ही विरोध करतो. महाराष्ट्र नवनिर्माण सेना तर्फे आम्ही या दरवाढीस विरोध करणार आहोत. हा विषय दसरी दाखल करावा अशी विनंती करतो.

**मा.तुषार कामठे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. प्रशासनाचे मी मनापासून अभिनंदन करतो. हा विषय आपण अजेंडयावर आणला त्याच्या मागचे कारण माहित नाही. याठिकाणी कोणीही पक्षाची भुमीका मांडत नाहीत. सामान्य जनतेची भुमीका मांडण्यासाठी येथे आपण बसलेलो आहोत. आज माझ्या वाकडमध्ये ९८० सोसायटया आहेत. त्यांच्या पाण्याची समस्या गेली एक वर्षा पासून मी सांगतो आहे. आयुक्त साहेबां समोर २७ डिसेंबर, २० तारखेला सोसायटीच्या लोकांबरोबर मिटींग केलेली होती. त्यांनी कल्पना दिलेली होती. तसेच आमच्या प्रभागामध्ये तांबे साहेब म्हणून आहेत, ज्यांच नाव गोडबोले पाहीजे होते पण त्यांच तांबे नाव आहे. ते गोड बोलण्याशिवाय बाकी दुसर काहीच करत नाहीत. त्यांना सांगायचे आहे की पाण्याची समस्या आपण सोडवावी. आमचा पाणी दरवाढीचा विषय नाही. सखोल पाणी, समतोल पाणी आपण दिलेतर, आमच्या लोकांना पाण्याची कमी आहे. तीन तारखेला कुठल्याही पक्षाचे अंदोलन नाही, माझ्या येथील सोसायटया तीन तारखेला महापालिकेवर मोर्चा घेवून येत आहेत हे आपल्याला सांगू इच्छितो. त्याच्यामध्ये कुठल्याही पक्षाचे नाहीतर सामान्य जनता आहे. महापालिकेमध्ये येवून तीस वर्षे झाले पण अजून सुखसुविधा आम्हांला दिलेल्या नाहीत. मी आपल्याला सांगु इच्छितो की आपण आमच्याकडे निधी देवू नका पण लोकांना पिण्यासाठी पाणी दयावे. पाण्याची एवढी समस्या झालेली आहे महापालिकेला माझ्या येथून जे उत्पन्न येत होतं त्याच्या १० टक्के सुध्दा उत्पन्न आमच्याकडे येत नाही. ते उत्पन्न पाणी टँकरला जातय. एक वर्षाच पाण्याच बील झाल आहे १ कोटी ३६ लाख रुपये, १९ सोसायटयां आहेत. मी सांगु इच्छितो की महापालिकेला उत्पन्न झालय फक्त १९ लाख रु. म्हणून मी आपल्याला सांगु इच्छितो की पहील्यांदा आपण पाणी व्यवस्थित दयावे नंतर पाणी दरवाढीचा विषय घ्यावा. आज व्यक्तीश: कुठल्याही पक्षाची माझी भूमीका नाही, माझा व्यक्तीश: पाणी दरवाढीला विरोध आहे हे मी आपल्याला सांगु इच्छितो.

**मा.सुवर्णा बुर्डे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. गेली अनेक वर्षे जे सत्तेत होते ते आज या पाण्याविषयी बोलतात त्याचे मला अतीशय दुर्दैव वाटते. आज माझ्या प्रभागामध्ये किंवा मा.महापौर, तुमच्याही प्रभागामध्ये गेली पाच वर्षे काय अवस्था होती आणि आज वर्षभरात काय अवस्था आहे. गेल्या पंचवार्षीकमध्ये पाण्याची एवढी दुर्दैवी अवस्था होती. तसेच आम्ही या वर्षामध्ये कमीत कमी तक्रारी येण्याच्या दृष्टिने प्रयत्न केले. आज आमच्याकडे अधिकारी वर्गाकडुन ज्या दिवशी पाणी येणार नसेल त्या दिवशी आम्हांला पाण्याचे मॅसेज सोडले जातात. की आमच्याकडे आज पाणी येणार नाही. ते मॅसेज आम्ही लोकांमध्ये

पोहचवतो. लोकांपर्यंत ही कम्प्लेन्ट आम्ही पोहचवतो की आज आपल्याकडे पाणी येणार नाही. गेल्या पाच वर्षात यांनी काय केले, आता आम्ही काय करतो हा बदल बघुन घ्यावा आणि मग बोलाव आणि पुर्ण प्रभागामध्ये प्रभागाचेच नाव घ्याव. मी ज्या वस्तीचे नेतृत्व करते त्या वस्तीच नाव न घेता बोलाव. गेल्या पाच वर्षामध्ये आपण काय काय केले हे मला उलगडायला लावू नका. याच्यामध्ये तुम्ही राजकारण आणु नका.

**मा.महापौर-** बुर्डेताई आपण विषयावरती बोलावे.

**(**सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** विनया तापकीर आणि सुरेखा बुर्डे आपण सभागृहात गोंधळ घालू नये. आपण खाली बसावे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** कृपया सर्वानी खाली बसावे. विरोध नोंदवून विषय क्रमांक ४ उपसूचनेसह मंजूर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – १४७ विषय क्रमांक – ४

दिनांक – २८/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ –**१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जशुकें/पापु/२६/२०१८ दि.२०/०१/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्रमांक २०७० दि.२४/१/२०१८

पिंपरी चिंचवड शहरातील पाणीपट्टीचे सध्याचे दर सन २००९-१० मध्ये मंजूर करण्यात आलेले आहेत, व सध्या त्याच दराने मीटर रिडींगनुसार पाणीपट्टी आकारण्यात येत आहे. आताचा पाणीपुरवठ्याचा वार्षिक देखभाल-दुरुस्तीचा खर्च ररु.१०९ कोटीच्या पुढे आहे. त्या तुलनेत पाणीपट्टीची वार्षिक मागणी व वसुली फारच कमी आहे. त्यानुषंगाने एका वर्षासाठी दर प्रस्तावित करणे, व त्यानंतर दरवर्षी प्रस्तूत आदेशातील सर्व प्रकारच्या दरांमध्ये वार्षिक वाढ प्रस्तावित करण्यात येत आहेत. तसेच, पिंपरी चिंचवड महापालिकेत अनधिकृत नळजोड नियमित करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे. पिंपरी चिंचवड शहरातील पाणीपट्टीचे दर वाढविण्याबाबतचा प्रस्ताव व अनधिकृत नळजोड नियमित करण्याचे धोरणास सोबतचे परीशिष्ठ अ प्रमाणे मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदर विषयाच्या अनुषंगाने निवासी वापराकरीता प्रति कुटूंब/सदनिका प्रति महिना ६००० लिटर पाणी

मोफत देणेस, त्याचप्रमाणे प्रतिवर्षी १०% दरवाढ न करता त्याऐवजी ती ५% करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर विषयामध्ये सन २०१८-१९ या सरकारी वर्षाकरीता शहरातील सामान्य नागरिकांना अल्प दरात सेवा सुविधा उपलब्ध करुन देणेचे दृष्टीने निवासी वापराच्या पाणीपुरवठा दरात खालीलप्रमाणे दर निश्चीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | प्रति माह दर | निश्चित करावयाचे दर (प्रति १००० लि. साठी) | झोपडपट्टी साठी |
|---|---|---|---|
| १ | १ ते ६००० लि. | मोफत | मोफत |
| २ | ६००१ ते १५००० लि. | रुपये ४/०० | रुपये ०२/- |
| ३ | १५००१ ते २२५०० लि. | रुपये ०४/- | रुपये ०३/- |
| ४ | २२५०१ ते ३०००० लि. | रुपये ८/०० | --- |
| ५ | ३०,००१ चे पुढे | रुपये १२/०० | --- |

६) ग्राहकाचे देयके प्रति कुटूंब कमीत कमी Rs. ५०/- प्रति महिना म्हणजेच Rs.६००/- प्रति वर्ष ( झोपडपट्टी धोरण)

७) मिटर नसलेले झोपडपट्टीतील Rs.९००/- प्रतिवर्ष

अनुकूल - ७८ प्रतिकूल- ४४

अशी मते पडली व सदर ठराव बहुमताने मंजूर झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** सर्वांनी खाली बसून घ्यावे, गोंधळ घालू नये.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** सर्वांनी खाली बसून घ्यावे, गोंधळ घालू नये.

(सभागृहात गोंधळ)

**मा.विलास मडिगेरी** – मा.महापौर साहेब, सभागृहातील गोंधळामुळे ही सभा आज दि. २८/२/२०१८ रोजी ५.३५ पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.नामदेव ढाके** – मा.महापौर सहोब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** सभागृहातील गोंधळामुळे ही सभा आज दि. २८/२/२०१८ रोजी सायं.५.३५ मी. (दहा मिनीटासाठी) पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

---------

**(**नितीन (आप्पा) प्रताप काळजे**)**

**महापौर**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी -४११ ०१८.

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक – १३</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

(दि.२०/२/२०१८ व दि.२८/२/२०१८ (दु.२.००) ची तहकूब सभा)

<u>दिनांक – २८.२.२०१८</u> <u>वेळ – सायं. ५.३५ वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२८/२/२०१८ (दु.२.००) (माहे फेब्रुवारी २०१८) ची तहकूब मा.महापालिका सभा बुधवार दि.२८.२.२०१८ रोजी सायं. ५.३५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे — महापौर

२) मा.शैलजा अविनाश मोरे — उपमहापौर

३) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे

४) मा.साधना अंकुश मळेकर

५) मा.दत्तात्रय बाबूराव साने

६) मा.अश्विनी संतोष जाधव

७) मा.सारीका शिवाजी सस्ते

८) मा.राहुल गुलाब जाधव

९) मा.वसंत प्रभाकर बोराटे

१०) मा.बुर्डे सुवर्णा विकास

११) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

१२) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

१३) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१४) मा.उंडे लक्ष्मण धोंडू

१५) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१६) मा.गायकवाड निर्मला मनोज

१७) मा.सागर बाळासाहेब गवळी

१८) मा.गोफणे अनुराधा  देविदास

१९) मा.बारसे प्रियांका प्रविण

२०) मा.अजित दामोदर गव्हाणे

२१) मा.बोईनवाड यशोदा प्रकाश

२२) मा.लांडगे सारिका संतोष

२३) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२४) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२५) मा.फुगे भिमाबाई पोपट

२६) मा.सावळे सिमा रविंद्र

२७) मा.लोंढे नम्रता योगेश

२८) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२९) मा.गीता सुशिल मंचरकर

३०) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३१) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३२) मा.अनुराधा गणपत गोरखे

३३) मा.मंगला अशोक कदम

३४) मा.अश्विनी भिमा बोबडे

३५) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३६) मा.पवळे सुमनताई मधुकर

३७) मा.चिखले सचिन तुकाराम

३८) मा.यादव मीनल विशाल

३९) मा.वैशाली जालिंदर काळभोर

४०) मा.बाबर शर्मिला राजू

४१) मा.अमित राजेंद्र गावडे

४२) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

४३) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

४४) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

४५) मा.ढाके नामदेव जनार्दन

४६) मा.करुणा शेखर चिंचवडे

४७) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

४८) मा.भोईर सुरेश शिवाजी

४९) मा.अपर्णा निलेश डोके

५०) मा.गावडे राजेंद्र तानाजी

५१) मा.सुलक्षणा राजू धर

५२) मा.शाम गणपतराव लांडे

५३) मा.सुजाता सुनिल पालांडे

५४) मा.योगेश मंगलसेन बहल

५५) मा.कदम निकीता अर्जुन

५६) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

५७) मा.पाडाळे निता विलास

५८) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

५९) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

६०) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

६१) मा.बारणे माया संतोष

६२) मा.निलेश हिरामण बारणे

६३) मा.दर्शले रेखा राजेश

६४) मा.कलाटे राहुल तानाजी

६५) मा.कलाटे मयूर पांडुरंग

६६) मा.कामठे तुषार गजानन

६७) मा.चोंधे आरती सुरेश

६८) मा.कस्पटे संदिप अरुण

६९) मा.सविता बाळकृष्ण खुळे

७०) मा.सुनिता हेमंत तापकीर

७१) मा.चंद्रकांत बारकु नखाते

७२) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

७३) मा.कुटे निर्मला संजय

७४) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

७५) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

७६) मा.आंगोळकर सागर सुनिल

७७) मा.मुंढे उषा अंकुश

७८) मा.लोखंडे चंदा राजू

७९) मा.आशा धायगुडे-शेंडगे

८०) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

८१) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

८२) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

८३) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

८४) मा.नवनाथ दत्तू जगताप

८५) मा.संतोष बबन कांबळे

८६) मा.सोनवणे शारदा हिरेन

८७) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

८८) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

८९) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

९०) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

९१) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर- आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर- मुख्यलेखापरिक्षक, मा.दुधेकर, मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.खोत, मा.बोदडे, मा.राऊत, मा.झगडे - सहा.आयुक्त, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके- मुख्य उदयान अधिक्षक, मा.निकम, मा. इंगळे, मा.तांबे, मा.लडकत, मा.ओंभासे, मा.गट्टूवार, मा.गायकवाड, मा.पवार - कार्यकारी अभियंता तसेच मा.पी. गाडेकर, मा.आर.गाडेकर-प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** ज्याला बोलायच त्यांनी जागेवर जावुन बसाव, मानदंडाला कोणीही हात लावू नये. विषयावर चर्चा करायची असेलतर चर्चा करावी. तुम्हांला विरोध नोंदवायचा असेलतर तुम्ही विरोध नोंदवा. चर्चा करुन तुमचा विरोध नोंदवा. तुम्हांला जर चर्चा करायची नसेलतर करु नका. ज्याला विरोध नोंदवायचा आहे त्यांनी विरोध नोंदवावा. जागेवर बसुन चर्चा होईल. मानदंडाला हात लावलातर निलंबन केल जाईल.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** कृपया सर्वांनी जागेवर बसून घ्यावे. मानदंडाला कोणीही हात लावू नये. ज्यांना विरोध करायचा त्यांनी उभे राहून विरोध नोंदवा.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** तुमचा विरोध नोंदवुन पाणीपुरवठयाचा विषय उपसूचनेसह मंजुर केलेला आहे. तुम्हांला चर्चा करायची असेलतर चर्चा करावी. तुमचा विरोध नोंदवुन विषय मंजुर झालेला आहे. याच्यावर चर्चा करायची असेलतर चर्चा करावी एवढच सांगतो. सगळयांनी जागेवर बसावे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** विषय मंजूर झालेला आहे, मानदंडाला कोणी हात लावू नये. चर्चा करायची असेलतर दुस-या विषया संदर्भात चर्चा करु शकता. पाणीपुरवठयाच्या संदर्भात नाही. सर्वांनी कृपया खाली बसावे सर्वाना बोलण्याची संधी दिली जाईल.

**मा.मंगलाताई कदम -** मतदान घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**मा.सिमाताई सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मानदंड उचलतात, विषय मंजुर झालेला आहे. ज्या ज्या कोणाला वर चढायच असेलतर त्यांच्यावरती निलंबनाची कारवाई केली पाहीजे. मा.महापौर साहेब, एकदा विषय मंजुर झालेला आहे. पुढचा विषय घ्यावा.

**मा.महापौर-** तुमचा विरोध नोंदवून विषय क्रमांक ४ मंजूर केलेला आहे. पुढील विषय क्रमांक ५ वाचण्यात यावा.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ५

दिनांक – २८/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ- १)** मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कर/मुख्य/५/कावि/१२/२०१८ दि.१७/०१/२०१८

**२)** मा.स्थायी समितीकडील ठराव क्रमांक २१३२ दि.०७/०२/२०१८

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 99 च्या तरतूदी अन्वये खालील नमूद केलेले दर महानगरपालिकेने कार्यक्षेत्रातील मिळकतींवर सन 2017-2018 करिता लागू केलेले आहेत. तसेच शासनाचे शिक्षणकर, रोजगार हमी कर व फ्लोअरेज कराची वसुली शासनाने ठरवून दिलेल्या दराने शासनाचे करिता केली जाते.

सन 2018-2019 या सरकारी वर्षाकरिता दिनांक 20 फेब्रुवारी 2018 पूर्वी करांचे दर ठरविणे आवश्यक आहे.

अमृत योजने अंतर्गत शहरामध्ये 24 X 7 पाणीपुरवठा योजना राबविण्यात येणार आहे. तसेच भामा आसखेड व आंद्रा धरणामधून 300 एमएलडी पाण्याचा उपसा करणेकामी सिंचन पुनर्स्थापना अंदाजे रक्कम रुपये 236 कोटी तसेच पुनर्वसन खर्च रक्कम रुपये 70 कोटी शासनाला जमा करणेचा आहे. सदर आंद्रा व भामा आसखेड धरणापासून पाईप लाईनने पाणी चिखली येथील जलशुध्दीकरण (प्रस्तावित) केंद्रापर्यंत आणणेचा प्रकल्पाचा खर्च सुमारे रुपये 500 कोटी येणार आहे. उपरोक्त प्रमाणे महानगरपालिकेवर भविष्यात रक्कम रुपये 806 कोटींचा बोजा पडणार आहे. महापालिकेवर पडणारा बोजा काही प्रमाणात भरुन येण्याच्या दृष्टीने पाणीपुरवठा लाभ करामध्ये दुपटीने वाढ प्रस्तावित करणेत आलेली आहे.

पाणीपट्टी: महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 129 (1) (अ) मध्ये शहराला पाणीपुरवठा करण्याची तरतूद करण्यासाठी महापालिकेस वाजवी वाटेल अशा त्यांच्या कर योग्य मूल्याच्या टक्केवारीने पाणीपट्टी आकारण्याची तरतूद आहे. शहरामध्ये मीटर पध्दतीने महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत प्रत्यक्ष पाण्याचे वापरानुसार पाणीपट्टी आकारुन वसूली करणेत येते. शहरा मध्ये काही मिळकती अशाही आहेत की त्यांना पाणी कनेक्शन नाही, परंतु त्यांना स्वतंत्र कनेक्शन घेण्याच्या दृष्टीने महानगरपालिके मार्फत पाणीपुरवठा लाईन टाकणेत आलेली असते. उपरोक्त तरतूदी नुसार त्याकरिता पाणी कनेक्शन नसणा-या मिळकतींना मिळकत करामध्ये पाणीपट्टी कर आकारणी करता येईल. त्या अनुषंगाने सन 2018-2019 पासून पाणी कनेक्शन नसणा-या मिळकतींना मिळकत कराचे बिलात त्यांचे कर योग्य मूल्याचे 5% दराने पाणीपट्टी कर लागू करणेबाबत प्रस्तावित केले आहे.

त्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 99 अन्वये सन 2018-2019 या वित्तिय वर्षासाठी खालील प्रमाणे करांचे आणि करेत्तर बाबींचे फी/शुल्काचे दर प्रस्तावित करण्यात येत आहे.

सन 2018- 2019 या सरकारी वर्षाकरिता कराचे व करेत्तर बाबींचे दर निश्चितीबाबत

| अ. क्र. | कराचे नाव | करआकारणी पध्दत कर योग्य मूल्यावर | सन 2017-2018चे प्रचलित दर (सध्याचे) | | सन 2018-2019करिता प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | निवासी | निवासेत्तर | निवासी | निवासेत्तर |
| 1 | सामान्य कर | रक्कम रुपये 1/- ते12000/- | **13%** | **14%** | **13%** | **14%** |
| | | रक्कम रुपये12001/- ते30000/- | **16%** | **17%** | **16%** | **17%** |
| | | रक्कम रुपये30001/- व त्यापुढील | **24%** | **24%** | **24%** | **24%** |
| 1ब | साफसफाई कर | कर योग्य मूल्यावर | **5%** | **6%** | **5%** | **6%** |
| | अग्निशामक कर | कर योग्य मूल्यावर | **2%** | **2%** | **2%** | **2%** |
| | मनपा शिक्षणकर | कर योग्य मूल्यावर | **4%** | **5%** | **4%** | **5%** |
| 2 | मलप्रवाह सुविधा लाभ कर | कर योग्य मूल्यावर | **5%** | **5%** | **5%** | **5%** |
| 3 | पाणीपुरवठा लाभ कर | कर योग्य मूल्यावर | **4%** | **5%** | **8%** | **10%** |
| 4 | रस्ता कर | कर योग्य मूल्यावर | **2%** | **3%** | **2%** | **3%** |
| 5 | विशेष साफसफाई कर (फक्त मॉल्स, लॉजिंग बोर्डिंग, मंगल कार्यालय, सभागृह, रुग्णालय, हॉटेल्स, कॅन्टीन्स,रेस्टॉरंट या स्वरुपाच्या मिळकतींस) | कर योग्य मूल्यावर | -- | **2%** | -- | **2%** |
| 6 | पाणीपट्टी(पाणीकनेक्शन नसणा-या मिळकतींना) | कर योग्य मूल्यावर | -- | -- | **5%** | **5%** |
| 7 | वृक्षकर | कर योग्य मूल्यावर | **1%** | **1%** | **1%** | **1%** |

| अ.क्र. | कराचे नाव | करआकारणी पध्दत | सन 2017-2018 चे प्रचलित दर (सध्याचे) | सन 2018-2019 करिता प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| 8 | नाटयगृहा वरील कर (करमणूक कर) | 1. सिनेमा | | |
| | | अ) 500 पर्यंत किंवा त्यापेक्षा जास्त बैठक व्यवस्था (सिट्स) असणा-या थिएटरला प्रती स्क्रीन | प्रती दिवस **रु.250/-** | प्रती दिवस **रु.250/-** |
| | | ब) मराठी सिनेमा | कर माफी | कर माफी |
| | | क) वातानुकुलित थिएटर प्रती स्क्रीन | प्रती दिवस **रु.350/-** | प्रती दिवस **रु.350/-** |
| | | 2. नाटक | प्रती प्रयोगास **रु.100/-** | प्रती प्रयोगास **रु.100/-** |
| | | 3.सर्कस (कॉन्व्हिल पेट्स) | प्रती प्रयोगास **रु.100/-** | प्रती प्रयोगास **रु.100/-** |
| | | 4. तमाशा | प्रती प्रयोगास **रु.100/-** | प्रती प्रयोगास **रु.100/-** |
| | | 5. संगीत जलसे/शास्त्रीय संगीत जलसे(थियटर मधील किंवा थियटर व्यतिरिक्त प्रत्येक प्रयोगास) | प्रती प्रयोगास **रु.100/-** | प्रती प्रयोगास **रु.100/-** |
| | | 6. कुस्त्या /मुष्टीयुध्द | प्रती प्रयोगास **रु.50/-** | प्रती प्रयोगास **रु.50/-** |
| | | 7. वरील खेरीज इतर प्रत्येक प्रयोगास(जर वेगवेगळे खेळ नसतील तर अशा प्रत्येक दिवसास) | प्रती दिवस **रु.100/-** | प्रती दिवस **रु.100/-** |

| **ब. सामान्यकरातील सवलत योजना : सामान्य कर (सामान्य करामध्ये सामान्य कर + साफसफाई कर + अग्निशामक + मनपा शिक्षण उपकर हे कर समाविष्ट आहेत)** | | | |
|---|---|---|---|
| | **योजना** | **सन 2017-2018चे प्रचलित दर (सध्याचे)** | **सन 2018-2019करिता प्रस्तावित दर** |
| 1 | माजी सैनिक व स्वातंत्र्य सैनिक किंवा त्यांचे पत्नी यांचे स्वत: रहात असलेल्या फक्त एका निवासी घरास सामान्य करात सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या **50% रक्कम सूट** | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या **50% रक्कम सूट** |
| 2 | फक्त | चालू सरकारी वर्षाचे चालू | चालू सरकारी वर्षाचे चालू |

| ब. सामान्यकरातील सवलत योजना : सामान्य कर (सामान्य करामध्ये सामान्य कर + साफसफाई कर + अग्निशामक + मनपा शिक्षण उपकर हे कर समाविष्ट आहेत) | | | |
|---|---|---|---|
| | **योजना** | **सन 2017-2018चे प्रचलित दर (सध्याचे)** | **सन 2018-2019करिता प्रस्तावित दर** |
| | महिलांचेनावेअसलेल्या, स्वत: रहात असलेल्या फक्त एका निवासी घराससामान्यकरातसुट | मागणीतील देय सामान्यकर रक्कमेच्या 50%<br><br>**रक्कम सूट** | मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50% **रक्कम सूट** |
| 3 | 40%किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असणा-या अंध, अपंग, मतिमंद, कर्णबधिर व मूकबधिर यांच्या नावावर असणा-या मिळकतीस | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमे च्या 50%<br><br>**रक्कम सूट** | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50% **रक्कम सूट** |
| 4 | संपूर्ण मिळकत कराची रक्कम आगाऊ भरणा-यां करीता सामान्य करात सुट देणे | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या<br><br>1. स्वतंत्र नोंद असलेल्या निवासी वापराच्या मिळकतीस -10% रक्कम सूट<br><br>2. बिगर निवासी /मिश्र / औद्योगिक/मोकळया जमिनी इ .मिळकतीस-5% रक्कम सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या<br><br>1. स्वतंत्र नोंद असलेल्या निवासी वापराच्या मिळकतीस -10% रक्कम सूट<br><br>2. बिगर निवासी /मिश्र / औद्योगिक/मोकळया जमिनी इ .मिळकतीस-5% रक्कम सूट |
| 5 | **ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिम मिळकती**<br><br>**ग्रीहा :**ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिममध्ये 2500 चौ.मी. पेक्षा जास्त भूखंडावरील प्रकल्पांना बांधकाम परवानगी विभागामार्फत अंतिम भोगवटापत्रक व अंतिम | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या<br><br>· 3Star Rating - 05% रक्कम सूट<br><br>· 4Star Rating - 08% रक्कम सूट<br><br>· 5Star Rating- 10% रक्कम सूट | चालूसरकारीवर्षाचेचालूमागणीतीलदेयसामान्यकररक्कमेच्या<br><br>· 3Star Rating - 05% रक्कम सूट<br><br>· 4Star Rating - 08% रक्कम सूट<br><br>· 5Star Rating- 10% रक्कम सूट |

| ब. सामान्यकरातील सवलत योजना : सामान्य कर (सामान्य करामध्ये सामान्य कर + साफसफाई कर + अग्निशामक + मनपा शिक्षण उपकर हे कर समाविष्ट आहेत) | | | |
|---|---|---|---|
| | **योजना** | **सन 2017-2018चे प्रचलित दर (सध्याचे)** | **सन 2018-2019करिता प्रस्तावित दर** |
| | ग्रीन बिल्डींगCertificate प्राप्त झालेल्या मिळकतींना सामान्य करात सूट | | |
| | **स्वग्रीहा :**ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिममध्ये 2500 चौ.मी. पेक्षा कमी भूखंडावरील प्रकल्पांना बांधकामपरवानगी विभागा मार्फत अंतिम भोगवटापत्रक व अंतिम ग्रीन बिल्डींग Certificate प्राप्त झालेल्या मिळकतींना सामान्य करात सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या<br>· 1Star Rating - 05% रक्कम सूट<br>· 2 Star Rating - 08% रक्कम सूट<br>· 3Star Rating- 10% रक्कम सूट<br>· 4Star Rating- 12% रक्कम सूट<br>· 5Star Rating- 15% रक्कम सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या<br>· 1Star Rating - 05% रक्कम सूट<br>· 2 Star Rating - 08% रक्कम सूट<br>· 3Star Rating- 10% रक्कम सूट<br>· 4Star Rating- 12% रक्कम सूट<br>· 5Star Rating- 15% रक्कम सूट |
| 6 | संरक्षण दलातील शौर्य पदक धारक आणि माजी सैनिकांच्या विधवा तसेच अविवाहीत शहीद सैनिकांचे नामनिर्देशितांचे मालमत्तांना करातून सूट(शासन निर्णयानुसार) | मालमत्ता करात(सामान्यकर, मलप्रवाह सुविधा लाभकर, पाणीपुरवठा लाभ कर, रस्ता कर) सूट | मालमत्ता करात(सामान्यकर, मलप्रवाह सुविधा लाभकर, पाणीपुरवठा लाभ कर, रस्ता कर) सूट |
| 7 | वरील योजनेपैकी कोणत्याही फक्त एका योजनेचा लाभ मिळकत धारकास घेता येईल तसेच वरील योजनेचा सामान्यकर सवलत योजनेचा लाभ | अ.क्र. 1 ते 5 मधील सवलत योजनांसाठी- दिनांक 30 जून अखेर<br>अ.क्र. 6 चे सवलत योजनेसाठी संपूर्ण वर्ष | अ.क्र. 1 ते 5 मधील सवलत योजनांसाठी- दिनांक 30 जून अखेर<br>अ.क्र. 6 चे सवलत योजनेसाठी संपूर्ण वर्ष |

| ब. सामान्यकरातील सवलत योजना : सामान्य कर (सामान्य करामध्ये सामान्य कर + साफसफाई कर + अग्निशामक + मनपा शिक्षण उपकर हे कर समाविष्ट आहेत) | | | |
|---|---|---|---|
| | **योजना** | **सन 2017-2018चे प्रचलित दर (सध्याचे)** | **सन 2018-2019करिता प्रस्तावित दर** |
| | घेणेकामी दोन्ही सहामाहीची थकबाकी सह संपूर्ण बिलाची रक्कम एक रक्कमी आगाऊ भरणेची मुदत (बिल मिळो अथवा न मिळो) | | |
| 8 | थकबाकीसह एक रक्कमी मिळकत कराचा भरणा ऑनलाईन पेमेंट गेट-वेद्वारे करणा-या मिळकत धारकास चालू आर्थिक वर्षाचे सामान्य करात सवलत | 1. दि.1/4/2017 ते 30/6/2017 अखेर सर्वसाधारण करात 5%<br>2. दि. 1/7/2017 ते 31/3/2018अखेर सर्वसाधारण करात 2% | 1.दि.1/4/2018 ते 30/6/2018 अखेर सर्वसाधारण करात 5%<br>2.दि. 1/7/2018 ते 31/3/2019 अखेर सर्वसाधारण करात 2% |

| **क.** | **करेत्तर बाबींचे फी / शुल्कांचे दर** | | |
|---|---|---|---|
| अ. क्र. | नाव | सन 2017-2018चे प्रचलित दर (सध्याचे) | सन 2018-2019करिता प्रस्तावित दर |
| 1 | मिळकत हस्तांतरण नोंद नोटीस फी | कर योग्य मूल्यावर 5% | कर योग्य मूल्यावर 5% |
| 2 | थकबाकी नसलेचा दाखला फी | प्रती दाखला 10/- रूपये | प्रती दाखला 10/- रूपये |
| 3 | मिळकत उतारा | प्रती उतारा 20/- रूपये | प्रती उतारा 20/- रूपये |
| 4 | प्रशासकीय सेवा शुल्क | प्रति बीलास10/- रूपये | प्रति बीलास10/- रूपये |

वरील प्रमाणे सन 2018-2019 करिता दर प्रस्तावित करण्यात येत आहेत.

शहरातील मराठी माध्यमांच्या शाळांचे संचालक खाजगी मराठी माध्यमांच्या शाळांना मिळकत करात सवलत मिळणेकामी महापालिकेकडे वारंवार पत्रव्यवहार करीत असतात. खाजगी मराठी माध्यामांच्या शाळा मराठी भाषेचा विकास, प्रचार व प्रसार करत असल्याने

त्यांना मालमत्ता कर हा बिगरनिवासी दराचे ऐवजी निवासी दराने दिनांक 01/04/2018 पासून आकारणी करणे योग्य होईल.

सन 2016-2017 या आर्थिक वर्षाचे कर व करेत्तर बाबींचे दर निश्चित करतेवेळी मा. महापालिका सभा ठराव क्रमांक 817, दिनांक 20/02/2016 अन्वये कर योग्यमूल्य निर्धारणासाठी जे अ, ब, क, ड असे विभाग करुन वेगवेगळे दर निश्चित करणेत आलेले आहेत त्याची पुर्नरचना करणेबाबतचा ठराव केलेला होता. त्यानुसार पुनर्रचना खालीलप्रमाणे

**सध्याचे कर योग्यमूल्य निश्चितीसाठीचे अ, ब, क, ड विभाग**

| अ विभाग | ब विभाग | क विभाग | डविभाग |
|---|---|---|---|
| 1.निगडी प्राधिकरण, आकुर्डी, चिंचवड, पिंपरी वाघेरे, पिंपरीनगर, मनपा भवन या विभागीय कार्यालयातील सर्व समाविष्ट गट<br><br>2.फुगेवाडी दापोडी व भोसरी या विभागीय कार्यालयातील सर्व गट (सन 1997 मध्ये नवीन समाविष्ट झालेला ग्रामीण भाग वगळून) | 1. सांगवी, थेरगाव या विभागीय कार्यालयातील सर्व गट (सन 1997 मध्ये नवीन समाविष्ट झालेला ग्रामीण भाग वगळून) | 1. च-होली, मोशी, चिखली, तळवडे, किवळे या विभागीय कार्यालयातील सर्व समाविष्ट गट<br><br>2. **सांगवी**- गट क्रमांक 9 रक्षक सोसायटी<br><br>3. **थेरगाव**- गट क्रमांक 7 भुजबळ वस्ती, गट क्रमांक 8 वाकडकर वस्ती, भूमकर वस्ती व गट क्रमांक 9 पुनावळे गावठाण<br><br>4. **फुगेवाडी दापोडी**- गट क्रमांक 7 बोपखेल<br><br>5. **भोसरी**- गट क्रमांक 15 साईपार्क आदर्शनगर, गट क्रमांक 16 दिघी गावठाण, गट क्रमांक 17 गजानन महाराज मंदिर<br><br>6. **झोपडपट्टया**: अ, ब व क विभागातील झोपडपट्टया (झोनिपुमार्फत सेवाआकार वसूली) | 1. **थेरगाव** विभागीय कार्यालयातील गट क्रमांक 10 जीवननगर, गट क्रमांक 11 निंबाळकर नगर व गट क्रमांक 12 ताथवडे गावठाण |

## पुनर्रचना करुन कर योग्यमूल्य निश्चितीसाठीचे अ,ब,क विभाग

| अ विभाग | ब विभाग | क विभाग |
|---|---|---|
| 1. निगडी प्राधिकरण, आकुर्डी, चिंचवड, सांगवी, पिंपरीवाघेरे, पिंपरीनगर, मनपाभवन, फुगेवाडी दापोडी,भोसरी या विभागीय कार्यालयातील सर्व समाविष्ट गट व थेरगाव या विभागीय कार्यालयातील सन 1997 मध्ये नवीन समाविष्ट झालेला ग्रामीण भाग वगळून उर्वरीत गट | 1. **थेरगाव**– <br><br> गट क्रमांक 7 भुजबळ वस्ती, गट क्रमांक 8 वाकडकर वस्ती, भूमकर वस्ती <br><br> 2. **दिघी बोपखेल(भोसरी)**– <br><br> गट क्रमांक 1 - (15) साईपार्क आदर्शनगर, गट क्रमांक 3 - (16) दिघी गावठाण, गट क्रमांक 2 - (17) गजानन महाराज मंदिर | 1. च-होली, मोशी, चिखली, तळवडे, किवळे या विभागीय कार्यालयातील सर्व समाविष्ट गट <br><br> 2. **थेरगाव** गट क्र. 9 पुनावळे गावठाण, गट क्र.10 जीवननगर,गट क्र. 11 निंबाळकर नगर,गट क्रमांक 12 ताथवडे गावठाण <br><br> 3. **दिघी बोपखेल (फुगेवाडी दापोडी)**- गट क्रमांक 4 (7) बोपखेल <br><br> 4. झोपडपट्टया : अ,ब व क विभागातील झोपडपट्टया (झोनिपु मार्फत सेवा आकार वसूली) |

सन 2018-2019 या वर्षाकरिता महानगरपालिका करांचे दर आणि करेत्तर बाबीची फी/ शुल्क निश्चित करण्याचा व खाजगी मराठी माध्यमांच्या शाळा इमारतींना मालमत्ता कर हा बिगरनिवासी दराचे ऐवजी निवासी दराने आकारणी करणेस तसेच करयोग्यमूल्य निश्चित करणेकामी जे अ, ब, क, ड विभाग करणेत आलेले आहेत त्याची पुनर्रचना करण्यास मान्यता देणेकामीची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी शहरातील खाजगी मराठी माध्यमांच्या शाळा व हिंदी, उर्दु माध्यमांच्या शाळांचे इमारतींना मालमत्ता कर हा बिगरनिवासी दराचे ऐवजी निवासी दराने दिनांक ०१/०४/२०१८ पासून आकारणी करणेस तसेच दिव्यांगांच्या शाळा आणि अनाथ आश्रम, वृद्धाश्रम यांच्या इमारतींना मालमत्ता कर बिगरनिवासी दराचे निम्म्या दराऐवजी कर आकारणी करताना मिळकतीचे बांधकाम स्वरुपानुसार आकारणीचे वेळी जे प्रचलित निवासी दर होते त्याचे २५% दराने दिनांक ०१/०४/२०१८ पासून वार्षिक करयोग्यमूल्य निश्चित करुन त्यावर निवासी दराने मिळकत कराची बिले देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.हर्षल ढोरे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.सिमाताई सावळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ दसरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** सर्वानी जागेवर बसून घ्यावे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – १४८ विषय क्रमांक – ५

दिनांक – २८/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ- १)** मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कर/मुख्य/५/कावि/१२/२०१८ दि.१७/०१/२०१८

**२)** मा.स्थायी समितीकडील ठराव क्रमांक २१३२ दि.०७/०२/२०१८

विषय क्रमांक ५ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ६

दिनांक – २८/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशासन/१/कावि/६१४/२०१७, दि.२३/०८/२०१७

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२४ दि. ८/०९/२०१७

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.७८ दि.१६/१०/२०१७

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.१०३ दि.२८/११/२०१७

५) मा.महापालिका सभा ठ.क्र.११९ दि.०५/०२/२०१८

आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर आदेश क्र.प्रशा/१/कावि/३७७/२०१५, दि.२८/०४/२०१५ अन्वये डॉ.के.अनिल रॉय यांची पदोन्नती समितीची मान्यता व मा.महापालिका सभा ठराव क्र.५०३, दि.०५/०७/२०१४ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार करण्यात आलेल्या नेमणुकीच्या अनुषंगाने शासन मान्यतेकामी सादर करण्यात आलेल्या क्र.प्रशा/१/कावि/४३२/१५, दि.१५/०५/२०१५ प्रमाणेच्या मूळ

प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.उपसचिव (नवि-२२) यांनी पत्र क्र.पीसीसी-३०१५/प्र.क्र.३५०/नवि-२२, दि.१४ मार्च २०१७ अन्वये महापालिकेस खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

**1)** आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पद उपलब्ध झाल्याच्या दिनांकास पदोन्नतीसाठी उपलब्ध अधिका-यांची अर्हता, सेवाज्येष्ठता या सर्व बाबींचा विचार करता, आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावरील पदोन्नतीबाबत महापालिकेच्या दि.१५/०५/२०१५ च्या प्रस्तावास मान्यता देणे योग्य ठरणार नाही.

**2)** प्रस्तुत प्रकरणी पद उपलब्ध झाल्याच्या दिनांकापासून डॉ.अनिल रॉय व डॉ.पवन साळवे यांची पात्रता व सेवाज्येष्ठता तपासण्यासाठी सदर प्रकरण पदोन्नती समितीसमोर पुन्हा ठेऊन त्यावर फेरनिर्णय घेण्यात यावा. तद्नंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५ (४) मधील तरतुदींनुसार शासन स्तरावर आवश्यक तो निर्णय घेण्यात येईल.

त्यानुसार उपरोक्त बाबींवर निर्णय घेण्याकामी दि.२८/०७/२०१७ रोजी समिती सभा आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या समितीने प्रशासन विभागाने सादर केलेला प्रस्ताव व शासनाचे निर्देश विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**1)** डॉ.नागकुमार कुणचगी, आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे दि.३०/०४/२०११ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेने महापालिका आस्थापनेवरील आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पद दि.०१/०५/२०११ पासून रिक्त झाले आहे.

**2)** महापालिका आस्थापनेवरील वैद्यकीय अधिका-यांमध्ये आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदोन्नतीकरीता आवश्यक असणारी अर्हता विचारात घेऊन डॉ.अय्यर राजशेखर, वैद्यकीय संचालक (शैक्षणिक अर्हता - एम.बी.बी.एस., डी.पी.एच.) यांच्याकडे दि.०१/०५/२०११ पासून अतिरिक्त पदभार सोपविण्यात आलेला आहे.

**3)** डॉ.अय्यर राजशेखर,वैद्यकीय संचालक हे दि.३१/०५/२०१२ रोजी नियत वयोमानानुसार महापालिका सेवेतून सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यामुळे दि.०१/०६/२०१२ रोजी वैद्यकीय संचालक या पदाबरोबर आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पद रिक्त झालेले आहे.

**4)** दि.०१/०६/२०१२ रोजी वैद्यकीय आस्थापनेवर आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदाकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता विचारात घेता, डॉ.पवन साळवे,वैद्यकीय अधिकारी हे एम.बी.बी.एस., एम.डी.पी.एस.एम. ही अर्हता धारक अधिकारी उपलब्ध होते.

**5)** दरम्यान रिक्त असलेले वैद्यकीय संचालक या अभिनामाचे पद पदोन्नतीने भरण्याबाबत दि.१६/०८/२०१२ रोजी आयोजित पदोन्नती समिती सभेने यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाकरीता वैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षक आणि वैद्यकीय उपअधिक्षक ही तीनही पदे एकाच वेतनश्रेणीत असल्याने वैद्यकीय संचालक हे पद पदोन्नतीने न भरण्याबाबत निर्णय घेतला.

तथापि वैद्यकीय विभागासाठी असलेली आरोग्य वैद्यकीय अधिकारी आणि अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी ही एकाच वेतनश्रेणीत, एकाच शैक्षणिक अर्हतेमध्ये आणि कर्तव्ये व जबाबदा-या समान असल्याने पदाकरीता आवश्यक असणारी एम.बी.बी.एस. आणि डी.पी.एच. ही शैक्षणिक अर्हता धारण करणारे एकमेव वैद्यकीय अधिकारी डॉ.पवन वसंत साळवे (एम.बी.बी.एस., एम.डी.पी.एस.एम.) यांना अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्याकामी दि.१६/०८/२०१२ च्या समितीने शिफारस केलेली होती. त्यानुसार आदेश क्र.प्रशा/१/कावि/९८८/१२, दि.१७/०९/२०१२ अन्वये डॉ.साळवे पवन यांना अति. आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे.

**6)** डॉ.के.अनिल रॉय यांनी डी.पी.एच. अर्हता दि.३०/०५/२०१३ रोजी धारण केलेली आहे. दि.३१/०५/२०१३ रोजी आयोजित पदोन्नती समितीने वैद्यकीय अधिका-यांची शैक्षणिक अर्हता व सेवाज्येष्ठता तपासून डॉ.के.अनिल रॉय (शैक्षणिक अर्हता - एम.बी.बी.एस.,डी.पी.एच) यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्याबाबत शिफारस केलेली आहे. त्यानुसार पदोन्नती समितीची शिफारस, मा.महापालिका सभेची मान्यता व शासन मार्गदर्शन यांनुसार दि.२८/०४/२०१५ च्या आदेशान्वये डॉ.के.अनिल रॉय यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे. शासन निर्देशानुसार आरोग्य वैद्यकीय अधिकारी पद उपलब्ध झाल्याच्या दिनांका रोजी (दि.०१/०५/२०११) डॉ. अय्यर राजशेखर (एम.बी.बी.एस., डी.पी.एच) व डॉ.साळवे पवन (एम.बी.बी.एस., एम.डी.पी.एस.एम.) हे आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदाकरीता पदोन्नतीकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करीत होते. तसेच डॉ.अय्यर सेवानिवृत्त झाल्यानंतर दि.०१/०६/२०१२ रोजी डॉ. साळवे हे पदोन्नतीकरीता आवश्यक अर्हता धारण केलेले एकमेव वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होते. सदर दिनांकास डॉ.के.अनिल रॉय हे डी.पी.एच ही शैक्षणिक अर्हता धारण करीत नव्हते. त्यामुळे डॉ.साळवे यांचा आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नतीकरीता विचार करणे आवश्यक होते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (१) नुसार मा.महापालिका सभा ही नियुक्ती प्राधिकारी असल्याने सदरची बाब निर्णयाकामी/मान्यतेकामी मा.विधी समितीमार्फत मा.महापालिका सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यास प्रस्तुतची समिती सर्वानुमते शिफारस करीत आहे. सबब, मा.उपसचिव (नवि-२२) यांनी पत्र क्र. पीसीसी-३०१५/प्र.क्र.३५०/नवि-२२, दि.१४ मार्च २०१७ अन्वये महापालिकेस प्राप्त निर्देश, दि.२८/०७/२०१७ च्या समितीची शिफारस या बाबी विचारात घेऊन महापालिका आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नतीबाबत निर्णय घेण्याकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करण्याबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव असलातरी महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग (नवि-२२) यांचेकडील पत्र क्र.पीसीसी-३०१५/प्रक्र३५०/नवि-२२, दि.१४ मार्च २०१७ अन्वये महापालिकेस प्राप्त निर्देश आणि दिनांक २८/७/२०१७ रोजीच्या पदोन्नती समितीचा निर्णय व शिफारस विचारात घेऊन आरोग्य वैद्यकीय अधिकारी पद पदोन्नतीसाठी उपलब्ध झालेचे दिनांक रोजी (दि.१/५/२०११) डॉ.अय्यर राजशेखर (एम.बी.बी.एस., डी.पी.एच.) व डॉ.पवन साळवे (एम.बी.बी.एस., एम.डी.पी.एस.एम.) हे आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदाकरीता पदोन्नतीकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करीत होते. तसेच डॉ.अय्यर सेवानिवृत्त झाल्यानंतर दि.१/६/२०१२ रोजी डॉ.पवन वसंत साळवे हे पदोन्नतीकरीता आवश्यक अर्हता धारण केलेले एकमेव

वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होते. सदर दिनांकास डॉ.के.अनिल रॉय हे डी.पी.एच. ही शैक्षणिक अर्हता धारण करीत नव्हते. त्यामुळे डॉ.पवन वसंत साळवे यांचा आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नती करीता विचार करणे आवश्यक होते. ही वस्तुस्थिती विचारात घेता नियुक्ती प्राधिकारी म्हणून पुर्वीचे या पदासंबंधीचे सर्व निर्णय अधिक्रमित करुन आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर डॉ.पवन वसंत साळवे (एम.बी.बी.एस., एम.डी.पी.एस.एम.) यांची पदोन्नतीने नेमणूक मान्यता देणेत येत आहे.

**मा.आरती चौंधे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नामदेव ढाके –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.उषा मुंढे -** मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देते.

यानंतर सुचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – १४९ विषय क्रमांक – ६

दिनांक – २८/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.प्रशासन/१/कावि/६१४/२०१७, दि.२३/०८/२०१७
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२४ दि. ८/०९/२०१७
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.७८ दि.१६/१०/२०१७
४) मा.महापालिका सभा ठ.क्र.१०३ दि.२८/११/२०१७
५) मा.महापालिका सभा ठ.क्र.११९ दि.०५/०२/२०१८

विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ७

दिनांक – २८/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.प्रशा/१/कावि/७४८/२०१७, दि.२९/०९/२०१७
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.५६ दि.२/१२/२०१७
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.१२२ दि.०५/०२/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर वैद्यकीय उपअधिक्षक अभिनामाचे एकमेव पद पे बॅन्ड र.रु. १५६००-३९१०० ग्रेड पे र.रु. ७६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहे. शासन पत्र क्र.पीएमसी-३०९७/१५६९/प्र.क्र.२५९/९८/नवि-२२, दि.२९ जून २००१ नुसार वैद्यकीय उपअधिक्षक पदावरील पदोन्नतीकरीता खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता निश्चित करण्यात आलेली आहे. "महापालिका सेवेतील वैद्यकीय शाखेकडील वर्ग २ मधील ज्येष्ठ अधिका-यांमधून की, त्यांनी सांविधिक विद्यापीठाची वैद्यकीय शाखेची पदव्युत्तर पदवी अथवा मेडीकल कौन्सिल ऑफ इंडिया यांनी मान्यता दिलेली तत्सम अर्हता धारण केलेली आहे व मोठ्या रुग्णालयामधील कामकाजाचा ५ वर्षापेक्षा जास्त अनुभव आहे." प्रस्तुतचे पद पदोन्नतीने भरण्याकरीता दि.२८/०७/२०१७ रोजी पदोन्नती समिती आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने डॉ.शंकर बळवंत जाधव, फिजिशियन यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल या बाबींची पडताळणी करुन त्यांना पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ७६०० या वेतनश्रेणीमध्ये वैद्यकीय उपअधिक्षक या पदावर मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत प्रस्तुतच्या समितीने शिफारस केलेली आहे. सबब, डॉ. जाधव शंकर बळवंत, फिजिशियन यांना खुला (अनु.जाती) प्रवर्गामधून पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ७६०० या वेतनश्रेणीमध्ये वैद्यकीय उपअधिक्षक या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.शारदा सोनवणे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- स्थापत्य विभागाकडील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या मंजुर रिक्त असणा-या पदावर श्री. रविंद्र सदाशिव पवार, उपअभियंता (स्थापत्य) हे कार्यकारी अभियंता (स्थापत्य) साठी सेवाजेष्ठता व शैक्षणिक अर्हता पुर्ण करीत असल्याने त्यांना खुला प्रवर्गातुन पदोन्नती देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.झामाबाई बारणे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक – १५०                                                        विषय क्रमांक - ७

दिनांक – २८/२/२०१८                                                        विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.प्रशा/१/कावि/७४८/२०१७, दि.२९/०९/२०१७
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.५६ दि.२/१२/२०१७
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.१२२ दि.०५/०२/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर वैद्यकीय उपअधिक्षक अभिनामाचे एकमेव पद पे बॅन्ड र.रु. १५६००-३९१०० ग्रेड पे र.रु. ७६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहे. शासन पत्र क्र.पीएमसी-३०९७/१५६९/प्र.क्र.२५९/९८/नवि-२२, दि.२९ जून २००१ नुसार वैद्यकीय उपअधिक्षक पदावरील पदोन्नतीकरीता खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता निश्चित करण्यात आलेली आहे. "महापालिका सेवेतील वैद्यकीय शाखेकडील वर्ग २ मधील ज्येष्ठ अधिका-यांमधून की, त्यांनी सांविधिक विद्यापीठाची वैद्यकीय शाखेची पदव्युत्तर पदवी अथवा मेडीकल कौन्सिल ऑफ इंडिया यांनी मान्यता दिलेली तत्सम अर्हता धारण केलेली आहे व मोठ्या रुग्णालयामधील कामकाजाचा ५ वर्षापेक्षा जास्त अनुभव आहे." प्रस्तुतचे पद पदोन्नतीने भरण्याकरीता दि.२८/०७/२०१७ रोजी पदोन्नती समिती आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने डॉ.शंकर बळवंत जाधव, फिजिशियन यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल या बाबींची पडताळणी करुन त्यांना पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ७६०० या वेतनश्रेणीमध्ये वैद्यकीय उपअधिक्षक या पदावर मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत प्रस्तुतच्या समितीने शिफारस केलेली आहे. सबब, डॉ. जाधव शंकर बळवंत, फिजिशियन यांना खुला (अनु.जाती) प्रवर्गामधून पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ७६०० या वेतनश्रेणीमध्ये वैद्यकीय उपअधिक्षक या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच स्थापत्य विभागाकडील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या मंजुर रिक्त असणा-या पदावर श्री. रविंद्र सदाशिव पवार, उपअभियंता (स्थापत्य) हे कार्यकारी अभियंता (स्थापत्य) साठी सेवाजेष्ठता व शैक्षणिक अर्हता पुर्ण करीत असल्याने त्यांना खुला प्रवर्गातुन पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१                                                        प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.आरती चोंधे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ८

दिनांक – २८/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आप/४/कावि/९१२/२०१७ दि.८/१२/२०१७

२) मा.महापालिका सभा ठराव क्र.१२६ दि.०५/०२/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील विद्यमान सन्मा.पदाधिकारी/सदस्य आणि माजी पदाधिकारी / सदस्य यांचे नावाचे फलक त्यांचे निवासस्थानाजवळ लावणेकामी धोरण ठरविणेस मा.स्थायी समिती मध्ये सुचना देणेत आलेल्या आहेत.

सध्या अशाप्रकारचे विद्यमान सन्मा.पदाधिकारी/सदस्य आणि माजी पदाधिकारी / सदस्य यांचे नावाचे फलक त्याचे निवासस्थानाजवळ लावणेबाबतचे निश्चित धोरण नाही.

पुणे महानगरपालिकेमध्ये याबाबत फोनवर चौकशी केली असता तेथेही धोरण ठरविलेले नाही. मात्र नगरसचिव कार्यालयामार्फत संबंधित क्षेत्रिय कार्यालयास सन्मा.सदस्य / पदाधिकारी यांचे नाव व पत्ता यांचे पत्र पाठवुन नावाचा फलक लावणेस सांगितले जाते.

सध्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये अशा प्रकारचे फलक स्थापत्य विभाग क्षेत्रिय कार्यालयामार्फत लावले जातात. मा.स्थायी समिती सभेमध्ये दिलेल्या सुचनांप्रमाणे महानगरपालिकेतील विद्यमान सन्मा.पदाधिकारी/सदस्य आणि माजी पदाधिकारी / सदस्य यांचे नावाचे फलक त्यांचे निवासस्थानाजवळ लावणेकामी धोरण ठरविणेस खालील प्रपत्र अ प्रमाणे असावे

**प्रपत्र अ**

| **अ.क्र** | **धोरण** |
|---|---|
| १ | विद्यामान व माजी सन्मा.पदाधिकारी/सदस्य यांचे नावाचा, त्यांचे निवासस्थानाकडे जाणा-या मुख्य रस्त्याच्या कडेला एक फलक लावणेत यावा. |
| २ | फलक ३ फुट X २ फुट आकाराचा असावा त्याची जमीनीपासुन उंची ७ फुट असावी. |
| **३** | फलक हिरव्या फ्लोरोसंट रंगामध्ये (बॅकग्राऊंड) व त्यावरील मजकुर पांढ-या अक्षरांत असावा. तसेच तो देवनागरी (मराठी) मध्ये असावा. पदाधिकारी/सदस्य यांच्या नावांच्या अक्षरांची उंची १० सेमी व इतर मजकुरांच्या अक्षरांची उंची ७ सेमी इतकी |

| | |
|---|---|
| | असावी. |
| ४ | विद्यमान व माजी सन्मा.पदाधिकारी / सदस्य यांची नावे व निवासस्थानाचे पत्ते नगरसचिव कार्यालयाने स्थापत्य मुख्य कार्यालयास त्यांचे सदस्य कालावधीसह कळविणेत यावेत. |
| ५ | नावाचे फलक हे विद्यमान व लगतच्या मागील निवडणुकीतील माजी सदस्य यांचे बाबतीत असतील. |
| ६ | माजी सन्मा.पदाधिकारी/सदस्य यांचे बाबतीत फलक लावताना स्पष्ट उल्लेख करणेत यावा. (उदा  माजी नगरसेवक / नगरसदस्य / महापौर / तसेच स्विकृत असलेस स्विकृत नगरसेवक ) असा स्पष्ट उल्लेख असावा.नावापुढे मा,स्वि.अशा प्रकारचा उल्लेख नसावा. |
| ७ | फलक ऑक्रिलीक शिटवर, लोखंडी स्ट्रक्चर मध्ये रस्त्याच्या दर्शनी भागावर लावणेत यावेत. फलक लावताना वाहतुकीस अडथळा होणार नाही पादचा-यांची चालताना गैरसोय होणार नाही.फलकामुळे दृष्यता बाधीत होणार नाही या बाबींची दक्षता घेण्यात यावी.तसेच प्रचलीत कायदा व नियम यांचे पुर्ण पालन करावे. |
| ८ | अशाप्रकारचे फलक लावणेचे कामकाज स्थापत्य मुख्य कार्यालयामार्फत सर्व प्रचलीत नियमांचे पालन करून करणेत यावे. |
| ९ | निवडणुक आचारसंहिता कालावधीमध्ये सदर फलकावरील नाव झाकुन घेणेची कार्यवाही (आचारसंहितेच्या नियमाप्रमाणे ) स्थापत्य विभागाने करावी. |
| १० | फलक  लावणेकामी आवश्यक असणारी अंदाजपत्रकीय तरतुद स्थापत्य विभागाकडे असावी. |
| ११ | निवडून आलेल्या नवनिर्वाचीत सदस्यांची नावे राजपत्रामध्ये प्रसिध्द झालेवर त्यांची नावे व पत्ते नगरसचिव विभागाने स्थापत्य विभागाला त्वरीत कळविणेत यावीत व फलक लावणेची कार्यवाही स्थापत्य मुख्य कार्यालयाने पुर्ण करावी. |
| १२ | याव्यतिरिक्त लावण्यात आलेले फलक हे बेकायदेशिर समजून ते काढून टाकण्यात यावेत. |

सबब वरीलप्रमाणे सन्मा. पदाधिकारी/सदस्य आणि माजी पदाधिकारी / सदस्य यांचे नावाचे फलक त्यांचे निवासस्थानाचे मुख्य रस्त्यावर लावणे बाबतचे धोरण ठरविणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नामदेव ढाके-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ दसरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.हर्षल ढोरे -** मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सुचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – १५१ विषय क्रमांक - ८

दिनांक – २८/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आप/४/कावि/९१२/२०१७ दि.८/१२/२०१७

२) मा.महापालिका सभा ठराव क्र.१२६ दि.०५/०२/२०१८

विषय क्रमांक ८ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.आरती चोंधे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ९

दिनांक – २८/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र भुजि/०५/कावि/०५ /२०१८ दि. ९ /०१/२०१८

२) मा.महापालिका सभा ठराव क्र.१३९ दि.०५/०२/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र.१/१३३, यामध्ये शाळेचे आरक्षण एकुण क्षेत्र १८००० चौ.मी. आहे. या क्षेत्रातील एकुण ४७५४ चौ.मी. क्षेत्र हे महानगरपालिकेने एफ.एस.आय./टि.डी.आर.चे बदल्यात ताब्यात घेतले आहे. उर्वरित क्षेत्राचा ताबा सुभद्राज् एज्युकेशनल सोसायटी पुणे यांचेकडे आहे आरक्षणाचे संपुर्ण क्षेत्र माध्यमिक शाळा तरतुदीन्वये विकसित करणेसाठी महानगरपालिकेच्या ताब्यातील ४७५४ चौ.मी. जागेसाठी नगररचना विभागाने ठरविलेल्या दरानुसार ३० वर्षे कालावधीसाठी ई-निविदा नोटीस क्र. १/२०१६-१७ अन्वये दर मागविणेत आले होते. (निविदा रक्कम रुपये २,५१,४८,६६०/-) सदर कामी एकुण ३ निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी सुभद्राज एज्युकेशनल सोसायटी पुणे यांची एकमेव निविदा पात्र ठरली असून त्यांनी सदरकामी निविदा दरापेक्षा ०.५०% जास्त असा दर सादर केला आहे. सुभद्राज एज्युकेशनल सोसायटी पुणे या निविदाधारकाची निविदा, निविदा दरापेक्षा ०.५०% जास्त (रक्कम रुपये २,५२,७४,४०३/- अक्षरी रक्कम रुपये दोन कोटी बावन्न लाख चौ-याहत्तर हजार चारशे तीन फक्त) दराची व अटी व

शर्तीची पुर्तता करीत असलेने ३० वर्षे कालावधीसाठी लीजदराने देणेबाबतचा विषय यापुर्वी मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभेपुढे मांडणेत आलेला होता तथापी मा.महापालिका सभेने दप्तरी दाखल केलेला होता. सदर विषय यापुर्वी मा.स्थायी समितीमध्ये सर्वानुमते मान्य झाल्यानेमहाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ क अन्वये सदर विषय मा.महापालिका सभेपुढे मान्यतेकामी शिफारस आहे.

१.कामाचे नाव : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. १/१३३ एकूण क्षेत्र १८००० चौ.मी. पैकी मनपाच्या मालकीचे क्षेत्र ४७५४ चौ.मी. या जागेवर माध्यमिक शाळा आरक्षण तरतुदीन्वये विकसीत करणेबाबत.

२. निवीदा रक्कम रुपये: २,५१,४८,६६०/-

३. लिज कालावधी : ३० वर्षे

४. निवीदा प्रसिध्द दैनिकाचे नावे : दै.पुण्यनगरी, दै.हिंन्दुस्तान टाईम्स, दै.बिझनेस स्टॅण्र्ड

५. निवीदा स्विकृती दिनांक : ६/४/२०१६ ते २६/४/२०१६ मुदतवाढ २०/६/२०१६ पर्यंत

६. निवीदा उघडल्याचा दिनांक : २२/७/२०१६

सदर कामी खालीलप्रमाणे एकूण तीन निवीदाधारकांकडून निवीदा प्राप्त झाल्या.

| अ.क्र. | निवीदाधारकांचे नाव | प्राप्त दर |
|---|---|---|
| १. | सुभद्राज् एज्यूकेशनल सोसायटी | ०.५०% जास्त |
| २. | नुतन शिक्षण संस्था | अपात्र (निवीदा उघडणेत आली नाही) |
| ३. | एस.एस.पी. शिक्षण संस्था | अपात्र (निवीदा उघडणेत आली नाही) |

वरीलप्रमाणे विषयांकीत कामासाठी प्राप्त एकुण तीन निवीदांपैकी नुतन शिक्षण संस्था व एस.एस.पी. शिक्षण संस्था या दोन्ही संस्था अटी, शर्तींची पुर्तता करत नसल्याने अपात्र ठरलेने उर्वरीत पात्र एकमेव संस्था सुभद्राज् एज्यूकेशनल सोसायटी यांची निवीदा निवीदा रक्कमेपेक्षा ०.५०% जास्त (शुन्य पुर्णांक पन्नास टक्केनी जास्त) दराची व निवीदा अटी शर्तींची पुर्तता करीत असलेने स्विकृत करणेस व मनपाच्या ताब्यातील ४७५४ चौ.मी. क्षेत्र आरक्षण तरतूदीन्वये विकसीत करणेसाठी ३० वर्षे कालावधीसाठी निवीदा अटी, शर्तीनुसार देणेस सदरचा विषय यापुर्वी मा.स्थायी समितीमध्ये सर्वानुमते मान्य झाल्यानंतर मा.महापालिका सभेने दप्तरी दाखल केलेला होता. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ क अन्वये सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

**मा.राहूल जाधव -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.सुवर्णा बुर्डे-** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजना (वाढीव हद्द) यातील मौजे डूडूळगांव मधील गट नं. १०६ ते गट नं. १२३ मधील १८.०० मी. रुंद रस्त्याचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम-२०१३ (नवीन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.उषा मुंढे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मे इस्कॉन फुड रिलिफ फौंडेशन ही संस्था सदयस्थितीत मनपा शाळांना पोषन आहार पुरवित आहे. सदर संस्था ना नफा ना तोटा या सेवाभावी तत्वावर गेली १२ वर्षे मनपाच्या शाळांना पोषन आहार पुरवित आहे. सदर संस्थेकडे आहार शिजविणेसाठी जागतीक दर्जाची उपकरणे उपलब्ध आहेत. पालिकेकडून नागरिकांसाठी व्यायाम शाळा, सांस्कृतीक केंद्र, विरंगुळा केंद्र, मतिमंद मुलांसाठी शाळा, वाचनालय इत्यादी प्रकल्पासाठी जागा देण्यात येतात. त्याप्रमाणे मे. इस्कॉन फुड फौंडेशन या संस्थेने मासुळकर कॉलनी मधील मनपा तांत्रीक शाळेमधील पुर्वेकडील दोन बंदीस्त शेडची मागणी शालेय पोषन आहार बनविणेकामी स्वयपाक घराचे वापरासाठी केलेली आहे. सदरची जागा मे इस्कॉन फुड रिलिफ फौंडेशन या संस्थेस पोषन आहाराचे स्वयंपाक घरासाठी मोफत देण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.बाबू उर्फ प्रेमकुमार नायर-** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.आरती चोंधे-** मा.महापौर साहेब, उपसूचनां स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – १५२ विषय क्रमांक - ९

दिनांक – २८/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
क्र भुजि/०५/कावि/०५ /२०१८ दि. ९ /०१/२०१८
२) मा.महापालिका सभा ठराव क्र.१३९ दि.०५ / ०२ / २०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र.१/१३३, यामध्ये शाळेचे आरक्षण एकुण क्षेत्र १८००० चौ.मी. आहे. या क्षेत्रातील एकुण ४७५४ चौ.मी. क्षेत्र हे महानगरपालिकेने एफ.एस.आय./टि.डी.आर.चे बदल्यात ताब्यात घेतले आहे. उर्वरित क्षेत्राचा ताबा सुभद्राज् एज्युकेशनल सोसायटी पुणे यांच्केडे आहे. आरक्षणाचे संपुर्ण क्षेत्र माध्यमिक शाळा तरतुदीन्वये विकसित करणेसाठी महानगरपालिकेच्या ताब्यातील ४७५४

चौ.मी. जागेसाठी नगररचना विभागाने ठरविलेल्या दरानुसार ३० वर्षे कालावधीसाठी ई-निविदा नोटीस क्र. १/२०१६-१७ अन्वये दर मागविणेत आले होते. (निविदा रक्कम रुपये २,५१,४८,६६०/-) सदर कामी एकुण ३ निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी सुभद्राज एज्युकेशनल सोसायटी पुणे यांची एकमेव निविदा पात्र ठरली असून त्यांनी सदरकामी निविदा दरापेक्षा ०.५०% जास्त असा दर सादर केला आहे. सुभद्राज एज्युकेशनल सोसायटी पुणे या निविदाधारकाची निविदा, निविदा दरापेक्षा ०.५०% जास्त (रक्कम रुपये २,५२,७४,४०३/- अक्षरी रक्कम रुपये दोन कोटी बावन्न लाख चौ-याहत्तर हजार चारशे तीन फक्त) दराची व अटी व शर्तीची पुर्तता करीत असलेने ३० वर्षे कालावधीसाठी लीजदराने देणेबाबतचा विषय यापुर्वी मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभेपुढे मांडणेत आलेला होता तथापी मा.महापालिका सभेने दप्तरी दाखल केलेला होता. सदर विषय यापुर्वी मा.स्थायी समितीमध्ये सर्वानुमते मान्य झाल्यानेमहाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ क अन्वये सदर विषय मा.महापालिका सभेपुढे मान्यतेकामी शिफारस आहे.

१. कामाचे नाव : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. १/१३३ एकूण क्षेत्र १८००० चौ.मी. पैकी मनपाच्या मालकीचे क्षेत्र ४७५४ चौ.मी. या जागेवर माध्यमिक शाळा आरक्षण तरतुदीन्वये विकसीत करणेबाबत.

२. निवीदा रक्कम रुपये: २,५१,४८,६६०/-

३. लिज कालावधी : ३० वर्षे

४. निवीदा प्रसिध्द दैनिकाचे नावे : दै.पुण्यनगरी, दै.हिंन्दुस्तान टाईम्स, दै.बिझनेस स्टॅण्डर्ड

५. निवीदा स्विकृती दिनांक : ६/४/२०१६ ते २६/४/२०१६ मुदतवाढ २०/६/२०१६ पर्यंत

६. निवीदा उघडल्याचा दिनांक : २२/७/२०१६

सदर कामी खालीलप्रमाणे एकूण तीन निवीदाधारकांकडून निवीदा प्राप्त झाल्या.

| अ.क्र. | निवीदाधारकांचे नाव | प्राप्त दर |
|---|---|---|
| १. | सुभद्राज् एज्यूकेशनल सोसायटी | ०.५०% जास्त |
| २. | नुतन शिक्षण संस्था | अपात्र (निवीदा उघडणेत आली नाही) |
| ३. | एस.एस.पी. शिक्षण संस्था | अपात्र (निवीदा उघडणेत आली नाही) |

वरीलप्रमाणे विषयांकीत कामासाठी प्राप्त एकुण तीन निवीदांपैकी नुतन शिक्षण संस्था व एस.एस.पी. शिक्षण संस्था या दोन्ही संस्था अटी, शर्तीची पुर्तता करत नसल्याने अपात्र ठरलेने उर्वरीत पात्र एकमेव संस्था सुभद्राज् एज्यूकेशनल सोसायटी यांची निवीदा निवीदा रक्कमेपेक्षा ०.५०% जास्त (शुन्य पुर्णांक पन्नास टक्केनी जास्त) दराची व निवीदा अटी शर्तीची पुर्तता

करीत असलेने स्विकृत करणेस व मनपाच्या ताब्यातील ४७५४ चौ.मी. क्षेत्र आरक्षण तरतूदीन्वये विकसीत करणेसाठी ३० वर्षे कालावधीसाठी निवीदा अटी, शर्तीनुसार देणेस सदरचा विषय यापुर्वी मा.स्थायी समितीमध्ये सर्वानुमते मान्य झाल्यानंतर मा.महापालिका सभेने दप्तरी दाखल केलेला होता. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ क अन्वये सदर विषयास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजना (वाढीव हद्द) यातील मौजे डूडूळगांव मधील गट नं. १०६ ते गट नं. १२३ मधील १८.०० मी. रुंद रस्त्याचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम-२०१३ (नवीन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मे इस्कॉन फुड रिलिफ फौंडेशन ही संस्था सदयस्थितीत मनपा शाळांना पोषन आहार पुरवित आहे. सदर संस्था ना नफा ना तोटा या सेवाभावी तत्वावर गेली १२ वर्षे मनपाच्या शाळांना पोषन आहार पुरवित आहे. सदर संस्थेकडे आहार शिजविणेसाठी जागतीक दर्जाची उपकरणे उपलब्ध आहेत. पालिकेकडून नागरिकांसाठी व्यायाम शाळा, सांस्कृतीक कैंद्र, विरंगुळा कैंद्र, मतिमंद मुलांसाठी शाळा, वाचनालय इत्यादी प्रकल्पासाठी जागा देण्यात येतात. त्याप्रमाणे मे. इस्कॉन फुड फौंडेशन या संस्थेने मासुळकर कॉलनी मधील मनपा तांत्रीक शाळेमधील पुर्वेकडील दोन बंदीस्त शेडची मागणी शालेय पोषन आहार बनविणेकामी स्वयपाक घराचे वापरासाठी केलेली आहे. सदरची जागा मे इस्कॉन फुड रिलिफ फौंडेशन या संस्थेस पोषन आहाराचे स्वयंपाक घरासाठी मोफत देण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रामाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक -१०

दिनांक – २८/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ –** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. नरवि/ कावि/३६/३९९ / २०१७ दि. १६ /११/२०१७.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनिमय, १९६६ मंजूर विकास नियंत्रण नियमावली पिंपरी चिंचवड नियम क्र. एन – २.२.३ मध्ये महानगरपालिकेच्या हॉस्पिटल वापराकरीता प्रिमियम न आकारता वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणेबाबत कलम

३७(१) व १५४ अन्वये निदेश., निर्णय क्र. टिपीएस-१८१७/१४२०/प्र.क्र.१३३/१७/नवि-१३, दिः- १८/१०/२०१७ या शासन निर्णयान्वये शासनाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस खालीलप्रमाणे निदेश दिले आहेत.

"पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुद क्र. एन २.२.३ नुसार अनुज्ञेय होणारा ०.५० वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक महानगरपालिकेच्या हॉस्पिटल वापराकरीता कोणताही प्रिमियम आकारणी न करता अनुज्ञेय राहील.

तरी उपरोक्त तरतूद महानगरपालिकेने मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये अंतर्भूत करण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमाचे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही पूर्ण करुन प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी सादर करावा. तसेच सदर तरतूद निदेशाच्या दिनांकापासून अंमलात येईल."

उपरोक्त संदर्भिय शासन निदेशानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१) अन्वये फेरबदलाची विहित कार्यवाही करण्यास मा. महापालिका सभेची मान्यता आवश्यक आहे.

सबब संदर्भिय शासन निदेशानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. एन २.२.३ मध्ये उक्त अधिनियमाचे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास, फेरबदलाची सूचना प्रसिध्द झाल्यानंतर महानगरपालिकेस प्राप्त होणा-या हरकत / सूचना अर्जांबाबत संबंधितांना सुनावणी देणे, तदअनुषंगिक फेरबदलाची सर्व वैधानिक प्रक्रिया पुर्ण करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासन मंजुरीस्तव सादर करणे यासंबंधीची कार्यवाही करण्यास आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.शारदा सोनवणे-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मौजे च-होली येथील स.नं. १७३ व १८२ पै या मिळकतीमधून पुर्व पश्चिम १८ मी. रस्ता विकास योजनेत आहे. सदरचा रस्ता दर्शवितांना अस्तित्वात असलेल्या रस्त्यास रुंदीकरण प्रस्तावित केलेले आहे. तथापि प्रत्यक्षात जागेवर अस्तित्वात असलेला रस्ता व विकास योजनेत असलेला रस्ता यामध्ये तफावत असल्याने अस्तित्वात असलेल्या रस्त्यासच स.नं. १७३ व स.नं.१८२ तसेच १८४ पै या मिळकतीमधून रस्ता रुंदीकरण करावे लागणार आहे व त्यासाठी आवश्यक महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ ची कार्यवाही करणे व त्याकामी मा.आयुक्तसो यांना सर्व अधिकार प्रदान करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.बाबु उर्फ प्रेमकुमार नायर-** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- १५३ विषय क्रमांक -१०

दिनांक – २८/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ –** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. नरवि/ कावि/३६/३९९ / २०१७ दि. १६ /११/२०१७.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनिमय, १९६६ मंजूर विकास नियंत्रण नियमावली पिंपरी चिंचवड नियम क्र. एन – २.२.३ मध्ये महानगरपालिकेच्या हॉस्पिटल वापराकरीता प्रिमियम न आकारता वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणेबाबत कलम ३७(१) व १५४ अन्वये निदेश.,निर्णय क्र. टिपीएस-१८१७/१४२०/प्र.क्र.१३३/१७/नवि-१३, दिः- १८/१०/२०१७ या शासन निर्णयान्वये शासनाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस खालीलप्रमाणे निदेश दिले आहेत.

“पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुद क्र.एन २.२.३ नुसार अनुज्ञेय होणारा ०.५० वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक महानगरपालिकेच्या हॉस्पिटल वापराकरीता कोणताही प्रिमियम आकारणी न करता अनुज्ञेय राहील.

तरी उपरोक्त तरतूद महानगरपालिकेने मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये अंतर्भूत करण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमाचे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही पूर्ण करुन प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी सादर करावा. तसेच सदर तरतूद निदेशाच्या दिनांकापासून अंमलात येईल.”

उपरोक्त संदर्भिय शासन निदेशानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१) अन्वये फेरबदलाची विहित कार्यवाही करण्यास मा. महापालिका सभेची मान्यता आवश्यक आहे.

सबब संदर्भिय शासन निदेशानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. एन २.२.३ मध्ये उक्त अधिनियमाचे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास, फेरबदलाची सूचना प्रसिध्द झाल्यानंतर महानगरपालिकेस प्राप्त होणा-या हरकत / सूचना अर्जांबाबत संबंधितांना सुनावणी देणे, तदअनुषंगिक फेरबदलाची सर्व वैधानिक प्रक्रिया पुर्ण करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासन मंजुरीस्तव सादर करणे यासंबंधीची कार्यवाही करण्यास आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे च-होली येथील स.नं. १७३ व १८२ पै या मिळकतीमधून पुर्व पश्चिम १८ मी. रस्ता विकास योजनेत आहे. सदरचा रस्ता दर्शवितांना अस्तित्वात असलेल्या रस्त्यास रुंदीकरण प्रस्तावित केलेले आहे. तथापि प्रत्यक्षात जागेवर अस्तित्वात असलेला रस्ता व विकास योजनेत असलेला रस्ता यामध्ये तफावत

असल्याने अस्तित्वात असलेल्या रस्त्यासच स.नं. १७३ व स.नं.१८२ तसेच १८४ पै या मिळकतीमधून रस्ता रुंदीकरण करावे लागणार आहे व त्यासाठी आवश्यक महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ ची कार्यवाही करणे व त्याकामी मा.आयुक्तसो यांना सर्व अधिकार प्रदान करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक -११

दिनांक – २८/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.स्वभाअक/३/कावि/४०/२०१८ दि.८/२/२०१८

केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान"च्या धर्तीवर राज्यामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,८८,९५,०००/- व ९,०७,७५,०००/- असे एकुण र. रु १३,९६,७०,०००/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/- , राज्य शासनाचे र.रु. ८००० /- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/०१/२०१८ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

प्रपत्र अ

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | १२५९५ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेतस्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | ११९३९ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | ९४६३ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | मनपा बांधकाम- ५८४७ | एकुण बांधकाम पुर्ण-८८१६<br><br>सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - २९६९ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ४६५ सीटस | महिला–२०३ सिटस कामकाज पूर्ण<br><br>पुरुष–२६२ सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ६५५६ लाभार्थी | GOI+GOM=३९३.३६ लाख | GOI = २०००/-व<br><br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB = १३१.१२ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **५२४.४८ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ५५६१ लाभार्थी | GOI+GOM=३३३.६६ लाख | GOI = २०००/-व<br><br>GOM=४०००/- हिस्सा |
| | | ULB =१११.२२ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **४४४.८८ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.विलास मडिगेरी-** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसुचना मांडतो- पिंपरी चिंचवड शहरामध्ये कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी पोलिस दल कार्यरत आहे. पोलिस दलामध्ये महिलांचा समावेश लक्षणीय आहे. परंतु या महिला पोलिसांना पोलिस स्टेशन व चौक्यांमध्ये सार्वजनिक शौचालयाची सोय नाही. सण सोहळे, जयंत्या इत्यादी सार्वजनिक कार्यक्रम जेव्हा असतात तेव्हा त्यांना २४-२४ तास कामावर थांबावे लागते त्यामुळे सार्वजनिक शौचालये नसल्यामुळे विनवणी करुन खाजगी शौचालयाचा वापर करावा लागतो. काही ठिकाणी तीही सोय नसल्यामुळे या महीलांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे प्रत्येक पोलीस स्टेशन व चौकीमध्ये महिलांसाठी शौचालय बांधण्याची गरज आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत शहरातील महाविदयालय, शाळांमध्ये मुलींसाठी सॅनेटरी नॅपकीनचे व्हेडींग मशिन्स व डिस्पोजल मशिन्स बसविण्याची कार्यवाही चालू आहे. ही अतिशय चांगली गोष्ट आहे. परंतु त्याच बरोबर शहरातील सर्व पोलीस स्टेशन्स व पोलीस चौक्यांमध्येही महिला पोलीसांसाठी सॅनेटरी नॅपकीनचे व्हेडींग मशिन्स व डिस्पोजल मशिन्स बसविण्याची अतिशय आवश्यकता आहे. कारण या महिला पोलिसाचे कामाचे तास निश्चित नसतात त्यामुळे वरील दोन्ही सुविधा नसल्यामुळे या महिला पोलिसाच्या आरोग्यावर गंभीर परीणाम होत आहे.

एक सामाजिक जबाबदारी म्हणून पिंपरी चिंचवड मनपा मार्फत शहरातील सर्व पोलिस स्टेशन व चौक्यांमध्ये महिला शौचालय व सॅनेटरी नॅपकीनचे व्हेडींग मशिन्स् व डिस्पोजल मशिन्स् बसविण्यास मान्यतादेणेत येत आहे.

**मा.बाबु उर्फ प्रेमकुमार नायर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- १५४ विषय क्रमांक -११

दिनांक – २८/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.स्वभाअक/३/कावि/४०/२०१८ दि.८/२/२०१८

केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान”च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,८८,९५,०००/- व ९,०७,७५,०००/- असे एकुण र. रु १३,९६,७०,०००/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/- , राज्य शासनाचे र.रु. ८००० /- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/०१/२०१८ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

प्रपत्र अ

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | १२५९५ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेतस्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | ११९३९ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | ९४६३ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या | वैयक्तिक घरगुती | मनपा बांधकाम- ५८४७ | एकुण बांधकाम पुर्ण- |

| | | | |
|---|---|---|---|
| शौचालयांची संख्या | शौचालय | | ८८१६<br><br>सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - २९६९ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ४६५ सीटस | महिला–२०३ सिटस कामकाज पूर्ण<br><br>पुरुष–२६२ सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ६५५६ लाभार्थी | GOI+GOM=३९३.३६ लाख | GOI = २०००/-व GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB = १३१.१२ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **५२४.४८ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ५५६१ लाभार्थी | GOI+GOM=३३३.६६ लाख | GOI = २०००/-व GOM=४०००/- हिस्सा |
| | | ULB =१११.२२ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **४४४.८८ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला. तसेच पिंपरी चिंचवड शहरामध्ये कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी पोलिस दल कार्यरत आहे. पोलिस दलामध्ये महिलांचा समावेश लक्षणीय आहे. परंतु या महिला पोलिसांना पोलिस स्टेशन व चौक्यांमध्ये सार्वजनिक शौचालयाची सोय नाही. सण सोहळे, जयंत्या इत्यादी सार्वजनिक कार्यक्रम जेव्हा असतात तेव्हा त्यांना २४-२४ तास कामावर थांबावे लागते त्यामुळे सार्वजनिक शौचालये नसल्यामुळे विनवणी करुन खाजगी शौचालयाचा वापर करावा लागतो. काही ठिकाणी तीही सोय नसल्यामुळे या महीलांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे प्रत्येक पोलीस स्टेशन व चौकीमध्ये महिलांसाठी शौचालय बांधण्याची गरज आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत शहरातील महाविदयालय, शाळांमध्ये मुलींसाठी सॅनेटरी नॅपकीनचे व्हेडींग मशिन्स व डिस्पोजल मशिन्स बसविण्याची कार्यवाही चालू आहे. ही

अतिशय चांगली गोष्ट आहे. परंतु त्याच बरोबर शहरातील सर्व पोलीस स्टेशन्स व पोलीस चौक्यांमध्येही महिला पोलीसांसाठी सॅनेटरी नॅपकीनचे व्हेडींग मशिन्स व डिस्पोजल मशिन्स बसविण्याची अतिशय आवश्यकता आहे. कारण या महिला पोलिसाचे कामाचे तास निश्चित नसतात त्यामुळे वरील दोन्ही सुविधा नसल्यामुळे या महिला पोलिसाच्या आरोग्यावर गंभीर परीणाम होत आहे.

एक सामाजिक जबाबदारी म्हणून पिंपरी चिंचवड मनपा मार्फत शहरातील सर्व पोलिस स्टेशन व चौक्यांमध्ये महिला शौचालय व सॅनेटरी नॅपकीनचे व्हेडींग मशिन्स् व डिस्पोजल मशिन्स् बसविण्यास मान्यता देणेत येत आहे

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.योगीता नागरगोजे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- १५५ विषय क्रमांक -१२

दिनांक – २८/२/२०१८ विभाग- मा.नगरसचिव

**<u>विधी समिती</u>**

अ) दि. ०५/०१/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि. १९/०१/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.झामाबाई बारणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.योगीता नागरगोजे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- १५६ विषय क्रमांक -१३

दिनांक – २८/२/२०१८ विभाग- मा.नगरसचिव

**मा.महिला व बालकल्याण समिती**

दि.१९/१२/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.झामाबाई बारणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.योगीता नागरगोजे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- १५७ विषय क्रमांक -१४

दिनांक – २८/२/२०१८ विभाग- मा.नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

अ) दि.२८/११/२०१७, दि.३०/११/२०१७, १२/१२/२०१७ व २६/१२/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.१२/१२/२०१७ व २६/१२/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.झामाबाई बारणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.योगीता नागरगोजे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- १५८ विषय क्रमांक -१५

दिनांक – २८/२/२०१८ विभाग- मा.नगरसचिव

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

अ) दि.२२/१२/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.१२/०१/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.झामाबाई बारणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक -१६

दिनांक – २८/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ –** १) मा.क्षेत्रीय अधिकारी ह क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील जा.क्र.हक्षे/१०/कावि/११/२०१८ दि.२/२/२०१८
२) मा.ह प्रभाग समिती सभा ठराव क्रमांक ३६ दि.१/२/२०१८

प्रभाग क्रमांक २० संत तुकाराम नगर, येथील एच.ए.कंपनीतील कामगारांची वसाहत आहे. सद्यस्थितीत एच.ए.कंपनीची आर्थिक परिस्थिती खराब असल्याकारणाने एच.ए.कॉलनी परिसरात रस्ते, पावसाळी गटर, ड्रेनेज लाईन दुरुस्त करणे शक्य होत नाही. त्यामुळे एच.ए.कॉलनी परिसरात

नागरिकांची मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे. तरी लवकरात लवकर एच.ए.कॉलनी परिसरात रस्ते सुधारणे, गटर दुरुस्ती, ड्रेनेज लाईन दुरुस्तकरुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मा. महापालिका सभा ठराव क्र. ९ दि. २०/०४/२०१७ आणि मा. महापालिका ठराव क्र. ३८ दि. २०/०६/२०१७ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अनुक्रमे अ, ब, क, ड, इ, फ, ग व ह या प्रभाग समित्या व क्षेत्रिय कार्यालयांची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामधील इतर सर्व बाबी कायम ठेवुन सदर प्रभाग समित्यांच्या व क्षेत्रिय कार्यालयांच्या उपरोक्त अ, ब, क, ड, इ, फ, ग व ह या नावा ऐवजी खालील नावामध्ये बदल करण्यास मान्यता देण्यात यावी व यापुढील नवीन नावांचा कार्यालयीन कामकाजामध्ये वापर होणेकामी मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | प्रभाग समितीचे नाव | प्रभाग समितीचे प्रस्तावित नवीन नाव | क्षेत्रिय कार्यालयाचे प्रस्तावित नवीन नाव |
|---|---|---|---|
| १ | अ प्रभाग समिती | पन्हाळगड प्रभाग समिती | पन्हाळगड क्षेत्रिय कार्यालय |
| २ | ब प्रभाग समिती | पुरंदर प्रभाग समिती | पुरंदर क्षेत्रिय कार्यालय |
| ३ | क प्रभाग समिती | सिंहगड प्रभाग समिती | सिंहगड क्षेत्रिय कार्यालय |
| ४ | ड प्रभाग समिती | रायगड प्रभाग समिती | रायगड क्षेत्रिय कार्यालय |
| ५ | इ प्रभाग समिती | शिवनेरी प्रभाग समिती | शिवनेरी क्षेत्रिय कार्यालय |
| ६ | फ प्रभाग समिती | देवगिरी प्रभाग समिती | देवगिरी क्षेत्रिय कार्यालय |
| ७ | ग प्रभाग समिती | सिंधुदुर्ग प्रभाग समिती | सिंधुदुर्ग क्षेत्रिय कार्यालय |
| ८ | ह प्रभाग समिती | प्रतापगड प्रभाग समिती | प्रतापगड क्षेत्रिय कार्यालय |

तसेच मा.महापालिका ठराव क्र. ९४ दि.१६/१०/२०१७ अन्वये मंजुरी दिली आहे. तरी सदर ठरावामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|

| | |
|---|---|
| १ | प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव रस्त्याच्या कडेने पेव्हिंग ब्लॉक बसविणे व रस्ता अदयावत पध्दतीने विकसित करणे. |
| २ | प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव येथील विनायक नगर, कवडे नगर व इतर भागात पेव्हिंग ब्लॉक बसविणे व रस्ता अदयावत पध्दतीने विकसीत करणे. |

**मा.बाबू उर्फ प्रेमकुमार नायर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, उपसुचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक – १५९ विषय क्रमांक -१६

दिनांक – २८/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ –** १) मा.क्षेत्रीय अधिकारी ह क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील
जा.क्र.हक्षे/१०/कावि/११/२०१८ दि.२/२/२०१८
२) मा.ह प्रभाग समिती सभा ठराव क्रमांक ३६
दि.१/२/२०१८

प्रभाग क्रमांक २० संत तुकाराम नगर, येथील एच.ए.कंपनीतील कामगारांची वसाहत आहे. सद्यस्थितीत एच.ए.कंपनीची आर्थिक परिस्थिती खराब असल्याकारणाने एच.ए.कॉलनी परिसरात रस्ते, पावसाळी गटर, ड्रेनेज लाईन दुरुस्त करणे शक्य होत नाही. त्यामुळे एच.ए.कॉलनी परिसरात नागरिकांची मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे. तरी लवकरात लवकर एच.ए.कॉलनी परिसरात रस्ते सुधारणे, गटर दुरुस्ती, ड्रेनेज लाईन दुरुस्त करुन देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मा. महापालिका सभा ठराव क्र. ९ दि. २०/०४/२०१७ आणि मा. महापालिका ठराव क्र. ३८ दि. २०/०६/२०१७ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अनुक्रमे अ, ब, क, ड, इ, फ, ग व ह या प्रभाग समित्या व क्षेत्रिय कार्यालयांची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामधील इतर सर्व बाबी कायम ठेवुन सदर प्रभाग समित्यांच्या व क्षेत्रिय कार्यालयांच्या उपरोक्त अ, ब, क, ड, इ, फ, ग व ह या नावा ऐवजी खालील नावामध्ये बदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे व यापुढील नवीन नावांचा कार्यालयीन कामकाजामध्ये वापर होणेकामी मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | प्रभाग समितीचे नाव | प्रभाग समितीचे प्रस्तावित नवीन नाव | क्षेत्रिय कार्यालयाचे प्रस्तावित नवीन नाव |
|---|---|---|---|
| १ | अ प्रभाग समिती | पन्हाळगड प्रभाग समिती | पन्हाळगड क्षेत्रिय कार्यालय |
| २ | ब प्रभाग समिती | पुरंदर प्रभाग समिती | पुरंदर क्षेत्रिय कार्यालय |
| ३ | क प्रभाग समिती | सिंहगड प्रभाग समिती | सिंहगड क्षेत्रिय कार्यालय |
| ४ | ड प्रभाग समिती | रायगड प्रभाग समिती | रायगड क्षेत्रिय कार्यालय |
| ५ | इ प्रभाग समिती | शिवनेरी प्रभाग समिती | शिवनेरी क्षेत्रिय कार्यालय |
| ६ | फ प्रभाग समिती | देवगिरी प्रभाग समिती | देवगिरी क्षेत्रिय कार्यालय |
| ७ | ग प्रभाग समिती | सिंधुदुर्ग प्रभाग समिती | सिंधुदुर्ग क्षेत्रिय कार्यालय |
| ८ | ह प्रभाग समिती | प्रतापगड प्रभाग समिती | प्रतापगड क्षेत्रिय कार्यालय |

तसेच मा.महापालिका ठराव क्र. ९४ दि.१६/१०/२०१७ अन्वये मंजुरी दिली आहे. तरी सदर ठरावामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १ | प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव रस्त्याच्या कडेने पेव्हिंग ब्लॉक बसविणे व रस्ता अदयावत पध्दतीने विकसित करणे. |
| २ | प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव येथील विनायक नगर, कवडे नगर व इतर भागात पेव्हिंग ब्लॉक बसविणे व रस्ता अदयावत पध्दतीने विकसीत करणे. |

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – १६० विषय क्रमांक -१७

दिनांक – २८/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. भूजि/६/कावि/२९/१८
दि.१२/२/१८

थेरगांव स.नं. ९ येथे म.न.पा. व दिलीप वेंगसरकर फौंडेशन यांच्या वतीने संयुक्त क्रिकेट अकादमी प्रकल्प सन २००७ पासून कार्यान्वित आहे. सदर संयुक्त क्रिकेट अकादमी विकासाचे अधिकार दिलीप वेंगसरकर फौंडेशन यांना ३० वर्षे कालावधीसाठी देण्यात आले आहेत. शहरातील क्रिकेटपटूना आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण मिळावे या दृष्टीने महापालिका व दिलीप वेंगसरकर फौंडेशन यांचे संयुक्त विद्यमाने क्रिकेट अकादमी स्थापन करुन मैदान विकसित करुन क्रिकेटपटूंना क्रिकेट प्रशिक्षण देण्याचे दृष्टीने सदरचा प्रकल्प कार्यान्वित आहे.

थेरगाव येथील सदर अकॅडेमीमधील पॅव्हेलियनच्या तळमजल्याचे पूर्णपणे कामकाज व कंम्पाउंड वॉलची उंची वाढविण्याचे तसेच पॅव्हेलियनच्या पहिल्या व दुस-या मजल्याचे रुम व ओपन टेरेस अद्यावत सुखसोयीनी करणेबाबत सदर क्रिकेट अकादमीच्या संचालकानी मागणी केली आहे. त्याअनुषंगाने स्थापत्य, विद्युत व अंतर्गत सजावटीची व त्या अनुषंगिक इतर कामे करणे आवश्यक आहे. सदर संयुक्त प्रकल्पाचा हेतू व प्रस्तावित कामाची आवश्यकता लक्षात घेता सदर कामे करण्याचे ठरले आहे.

सबब सदर स.नं.९ मधील म.न.पा. व दिलीप वेंगसरकर फौंडेशन या कार्यरत संयुक्त क्रिकेट प्रकल्पांतर्गत स्थापत्य, विद्युत, अंतर्गत सजावट व त्याअनुषंगिक इतर वाढीव कामे करणेस व त्यासाठी येणा-या खर्चास व त्यानुसार सोबत जोडलेल्या प्रपत्रा मधील अटी व शर्तीनुसार पुरवणी करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.महापौर -** सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपली असे जाहीर करतो.

**(नितीन (आप्पा) प्रताप काळजे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/६/कावि/१५९/२०१८
दिनांक - २/५/२०१८



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जशुके/पापु/२६/२०१८ दि.२०/०१/२०१८ वि.क्र.४ ठराव क्रमांक १४७ चे लगत)



(मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जशुके/पापु/२६/२०१८ दि.२०/०१/२०१८ वि.क्र.४ चे लगत)

①

# परीशिष्ठ अ

विषय – पाणीपुरवठा धोरण व पाणीपट्टी दरबदलाबाबत.

## पाणीपट्टी प्रस्तावित दर

**१) निवासी वापरासाठी प्रति कुटुंब / सदनिका प्रति महिना**

| अ.क्र. | LPCD | प्रति माह पाण्याचा वापर ( लिटर्स मध्ये) | पाणीदर ( प्रति १००० लिटर्स साठी ) सन २०१८-१९ |
|---|---|---|---|
| १ | ४० | १ ते ६००० | र.रु.४.०० |
| २ | ४१-१०० | ६००१ ते १५००० | र.रु. ८.०० |
| ३ | १०१-१५० | १५००१ ते २२५०० | र.रु.१५.०० |
| ४ | १५१-२०० | २२५०१ ते ३०००० | र.रु. २५.०० |
| ५ | २०० च्या पुढे | ३०००१ व त्यापुढे | र.रु.३५.०० |

तसेच मीटर रिडींगप्रमाणे आकारणी करताना प्रत्येक ग्राहकाचे देयक प्रति सदनिका / कुटुंब कमीत कमी र.रु.२०० प्रति महिना म्हणजेच वार्षिक र.रु.२४००/- अशी आकारणी करण्यात यावी.

100/- करण्यात यावी 1200/- यावी

**२) वाणिज्य वापरासाठी प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट – हॉटेल्स, रेस्टारंट्स, दुकाने, इ.**

| आर्थिक वर्ष | दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट |
|---|---|
| सन २०१८-१९ | र.रु.५०/- |

**३) खाजगी शैक्षणिक संस्था, वसतिगृहे, शासकीय-निमशासकीय कार्यालये, रेल्वे स्टेशन्स, ईएसआय हॉस्पील, औंध ऊरो रुग्णालय,**

| आर्थिक वर्ष | दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट |
|---|---|
| सन २०१८-१९ | र.रु. १५/- |

②

४) धार्मिक स्थळे, अनाथाश्रम, वृध्दाश्रम, धर्मादाय आयुक्त यांची मान्यता असलेली ना नफा ना तोटा या तत्वावर चालविण्यात येणारी मंडळे.

| आर्थिक वर्ष | दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट |
|---|---|
| सन २०१८-१९ | र.रु. १०/- |

५) **स्टेडीयम.**

| आर्थिक वर्ष | दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट |
|---|---|
| सन २०१८-१९ | र.रु. २०/- |

**६) मनपा इमारती / मिळकतीं – Book Adjustment करिता**

| आर्थिक वर्ष | दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट |
|---|---|
| सन २०१८-१९ | र.रु.१०/- |

**७) झोपडपट्टीसाठी धोरण –** झोपडपट्टीसाठी धोरण प्रस्तावित करताना सदर ग्राहकांसाठी Cross-subsidised पध्दतीने दर प्रस्तावित करणे योग्य वाटते.

अ) प्रस्तावित दर ( मीटर बसविलेल्या झोपडपट्टी / झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील नळजोड ग्राहकांसाठी निवासी वापरासाठी प्रति कुटुंब । सदनिका प्रति महिना)

| अ.क्र. | LPCD | प्रति माह पाण्याचा वापर ( लिटर्स मध्ये) | पाणीदर ( प्रति १००० लिटर्स साठी ) सन २०१८-१९ |
|---|---|---|---|
| १ | ४० | १ ते ६००० | र.रु. ३.०० |
| २ | ४१-१०० | ६००१ ते १५००० | र.रु. ४.०० |
| ३ | १०१-१५० | १५००१ ते २२५०० | र.रु. ६.०० |
| ४ | १५१-२०० | २२५०१ ते ३०००० | र.रु. १०.०० |
| ५ | २०० च्या पुढे | ३०००१ व त्यापुढे | र.रु. २०.०० |

तसेच मीटर रिडींगप्रमाणे आकारणी करताना प्रत्येक ग्राहकाचे देयक प्रति सदनिका / कुटुंब कमीत कमी र.रु. १०० प्रति महिना म्हणजेच वार्षिक र.रु. १२००/- अशी आकारणी करण्यात यावी.

③

ब) मीटर न बसविलेल्या झोपडपट्टीतील / झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील ग्राहक

| आर्थिक वर्ष | दर प्रति सदनिका |
|---|---|
| सन २०१८-१९ | र.रु.१५००/- |

क) तसेच ज्या ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात आलेली आहे, त्या ठिकाणी पाणी बिलाची वैयक्तिक आकारणी न करता सदर इमारतीत स्थापन झालेल्या सोसायटीनिहाय मीटर रिडींगनुसार किंवा उपरोक्त दरानुसार सदनिकांच्या संख्येच्या प्रमाणात एकत्रित वार्षिक पध्दतीने बिलाची आकारणी करण्यात यावी.

ड) घोषित । अघोषित झोपडपट्टीतील नवीन नळ कनेक्शनसाठी ( १५ मिमी व्यासासाठी) मीटर किमतीशिवाय र.रु. १५००/- एवढे शुल्क अनामत रक्कम म्हणून आकारण्यात यावे.

**८) रिकनेक्शनबाबत धोरण** - पाणीपट्टी न भरल्याने, पाणी गळतीमुळे अथवा अन्य कारणास्तव नळ कनेक्शन तात्पुरते बंद करण्यात आलेले असल्यास, ज्या कारणासाठी कनेक्शन बंद करण्यात आलेले आहे, त्याची पूर्तता / निवारण झाल्यानंतर रिकनेक्शन करण्याचे अधिकार पाण्याचे नवीन नळकनेक्शन मंजूर करण्याच्या अधिकाराच्या पध्दतीप्रमाणेच संबंधित उपअभियंता / कार्यकारी अभियंता यांना राहतील. संबंधित ग्राहकाने रिकनेक्शनसाठीची आवश्यक ती पूर्तता केल्यानंतर दोन दिवसाचे आत पाणीपुरवठा विभागाने रिकनेक्शनची कार्यवाही पूर्ण करावी. तसेच जर महापालिकेने पाईप लाईन बदलल्याने रिकनेक्शन करावयाचे झाल्यास त्यासाठी ग्राहकांकडून शुल्काची आकारणी करु नये. तथापि रिकनेक्शनसाठी लागणारे साहित्य ग्राहकाने आणून देणे गरजेचे आहे.

**९) अनामत रक्कम**

नवीन नळ कनेक्शनसाठी झोपडपट्टीतील ग्राहक वगळता इतर सर्व ग्राहकांसाठी खालीलप्रमाणे अनामत रकमेची आकारणी करावी.

| अ.क्र. | नळजोड व्यास | मीटर किमतीशिवाय घ्यावयाची अनामत रक्कम | |
|---|---|---|---|
| | | निवासी पाणीवापर | बिगरनिवासी पाणीवापर |
| १ | १५ मिमी | २००० | ८००० |
| २ | २० मिमी | ३५०० | १५००० |
| ३ | २५ मिमी | १०००० | २०००० |
| ४ | ४० मिमी | २०००० | २५००० |
| ५ | ५० मिमी | २५००० | ३०००० |
| ६ | ८० मिमी | ८८००० | ११४००० |
| ७ | १०० मिमी | १८७००० | २४५००० |
| ८ | १५० मिमी | ५७४००० | ७७४००० |

(4)

## १०) अनधिकृत नळ कनेक्शनबाबत धोरण

पिंपरी चिंचवड शहराच्या खालील अनधिकृत नळजोडधारक असल्याचे निदर्शनास आले आहे.

१) काही ग्राहकांकडे पाणीमीटर आहेत, पण ग्राहक क्रमांक नाहीत.

२) काही ग्राहकांकडे पाणीमीटरही नाही, व ग्राहक क्रमांकही नाही.

तत्कालिन मा. आयुक्त यांच्या सूचनेनुसार तयार करण्यात आलेल्या दिनांक - ३१ मार्च २०१२ पूर्वीच्या अनधिकृत बांधकामांना असलेले अनधिकृत नळजोड व्यासनिहाय दंडात्मक रक्कम आकारुन नियमित करण्याबाबतचे धोरण निश्चित करण्यात आले होते. त्यानुषंगाने इकडील दिनांक - ०६/०३/२०१३ तसेच दिनांक २८/०८/२०१३ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर अनधिकृत नळजोड नियमित करण्यास मा. स्थायी समितीने ठराव क्रमांक - ३८२९, दिनांक ०६/०८/२०१३ अन्वये यापूर्वी मान्यता दिलेली आहे. सदर आदेशाच्या अनुषंगाने आतापर्यंत ४००० अनधिकृत नळजोड नियमित करण्यात आलेले आहेत. सदर ग्राहकाचे अनधिकृत बांधकाम दिनांक - ३१ मार्च २०१२ पूर्वीचे आहे किंवा कसे हे ठरविण्यासाठी मिळकतकर उतारा व मिळकत उतारा नसल्यास ग्राहकाच्या रहिवासाचा पत्ता दर्शविणारे कागदपत्र ( उदा.वीज बील / टेलिफोन बिल / ड्रायव्हिंग लायसन्स / पासपोर्ट / आधार कार्ड ) यापैकी कोणतेही एक कागदपत्र घेण्याबाबत धोरण आहे. त्यानुषंगाने दिनांक ३१ मार्च २०१२ पूर्वीचे बांधकाम असलेल्या व तसा पुरावा असलेल्या ग्राहकांचे नळजोड सध्याच्या धोरणानुसार अधिकृत करण्यात येत आहेत. तथापि ज्या ग्राहकांचे अनधिकृत बांधकाम दिनांक ३१ मार्च २०१२ नंतरचे आहे, किंवा ते आधीचे असले तरी ते आधीचे आहे असे दर्शविणारा काहीही पुरावा नाही, अशा ग्राहकांच्या अनधिकृत नळजोडांबाबत किंवा अशा ग्राहकांना जर रीतसर अधिकृत नळजोड घ्यावयाचा असल्यास त्यासाठी धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेत अनधिकृत नळजोड नियमित करण्याचे यापूर्वीचे धोरण आहे. फक्त सदर धोरणाच्या अनुषंगाने दिनांक ३१ मार्च २०१२ नंतरच्या अनधिकृत बांधकामाच्या अनधिकृत नळजोडांबाबत निर्णय होणे गरजेचे आहे. कारण ते ग्राहक पाणी तर वापरत आहेत, व त्याचे कुठेही मोजमाप नाही, व बिलही नाही.

दिनांक ३१ डिसेंबर २०१५ पूर्वीची अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ अन्वये फेरबदल करुन नियमावली तयार करण्यात आली असून त्यानुषंगाने दिनांक ३१ डिसेंबर २०१५ पूर्वीच्या व त्यानंतर झालेल्या अनधिकृत बांधकामांना असलेले अनधिकृत नळजोड नियमित करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे..

अशा अनधिकृत नळजोडांना खालीलप्रमाणे आकारणी करण्यात यावी.

अ) **अधिकृत बांधकामांना असलेले अनधिकृत नळजोड -** अनधिकृत नळ कनेक्शनबाबत धोरण तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे अनामत, दंड व पाणीपट्टीची आकारणी करुन नळजोड नियमित करण्यात यावा, व त्यापुढे नियमित पाणी दराने आकारणी करावी.

आ) **अनधिकृत बांधकामांना असलेले अनधिकृत नळजोड -** अनधिकृत नळ कनेक्शनबाबत धोरण तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे अनामत, दंड व पाणीपट्टीची आकारणी करुन नळजोड नियमित करण्यात यावा, व त्यापुढे नियमित पाणी दराच्या दीडपट दराने पाणीपट्टीची आकारणी करावी. असे बांधकाम नियमित झाल्यास, व तसे ग्राहकाने विनंती अर्ज केल्यास अशा बांधकामाच्या नळजोडास सदरचे बांधकाम नियमित झाल्याच्या तारखेपासून किंवा त्यानंतरच्या बिलींग सायकलपासून नियमित दराने पाणीपट्टीची आकारणी करावी.

इ)**अनधिकृत बांधकामांना नवीन नळजोड –** नियमित नळजोडणीनुसार अनामत रकमेची आकारणी करुन त्यापुढे नियमित पाणी दराच्या दीडपट दराने पाणीपट्टीची आकारणी करावी. असे बांधकाम नियमित झाल्यास, व तसे ग्राहकाने विनंती अर्ज केल्यास अशा बांधकामाच्या नळजोडास सदरचे बांधकाम नियमित झाल्याच्या तारखेपासून किंवा त्यानंतरच्या बिलींग सायकलपासून नियमित दराने पाणीपट्टीची आकारणी करावी,

शासनाच्या नियमावलीअंतर्गत सदर अनधिकृत बांधकाम जर नियमित नाही झाले व ते पाडण्याची कारवाई करण्यात आली तर त्या बांधकामासोबत सदर नळजोडही आपोआपच तोडला जाईल. सदरची रक्कम ही ३० जून २०१८ पर्यंत नळजोड नियमित करुन घेण्यासाठी अर्ज करणा-या ग्राहकांसाठी लागू राहील. सदर तारखेनंतर नळजोड नियमित करण्यासाठी अर्ज दाखल केल्यास झाल्यास सदरच्या तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे प्रति महिना अतिरिक्त वाढीव पाणीपट्टीची आकारणी करण्यात यावी. त्यानंतर अशा ग्राहकांना मीटर रिडींगप्रमाणे बिलाची आकारणी करण्यात येईल.

## अनधिकृत नळ कनेक्शनबाबत धोरण तक्ता

| अ.क्र. | नळजोडा चा व्यास | अनामत, दंडासह थकित पाणीपट्टीची रक्कम | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | निवासी | | | | | वाणिज्य | | | |
| | | अनामत | दंड | पाणीपट्टी | एकूण | दि.३० जून २०१८ नंतर नळजोड नियमित करण्यासाठी अर्ज सादर केल्यास प्रति महिना अतिरिक्त शुल्क | अनामत | दंडासह पाणीपट्टी | एकूण | दि.३० जून २०१८ नंतर नळजोड नियमित करण्यासाठी अर्ज सादर केल्यास प्रति महिना अतिरिक्त शुल्क |
| 1 | 15 मिमी | 2000 | 3000 | 4300 | 9300 | 200 | 8000 | 19800 | 27800 | 1500 |
| 2 | 20 मिमी | 3500 | 4000 | 7650 | 15150 | 350 | 15000 | 33000 | 48000 | 2655 |
| 3 | 25 मिमी | 10000 | 6600 | 11950 | 28550 | 550 | 20000 | 49500 | 69500 | 4155 |
| 4 | 40 मिमी | 20000 | 16600 | 30600 | 67200 | 1420 | 25000 | 110000 | 135000 | 10665 |
| 5 | 50 मिमी | 25000 | 26600 | 47800 | 99100 | 2220 | 30000 | 198000 | 228000 | 16665 |

(6)

एखाद्या ग्राहकाने पाणीपट्टी देयक न भरल्यास पूर्वीप्रमाणेच वार्षिक १० टक्के दंडाची आकारणी यापुढेही चालू राहील. तसेच एखाद्या ग्राहकाचा मीटर नादुरुस्त झाल्यामुळे किंवा अन्य कारणामुळे बदलला तर, अशा ग्राहकांना पुढील मीटर रिडींगनुसार थकित कालावधीचे सरासरी बिल देण्याचे धोरण यापुढेही चालू राहील.

पाण्याचे वाढीव दर प्रस्तावित करण्याबरोबरच पाणीपट्टीचे दर टप्प्या-टप्प्याने दर वर्षी वाढविणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने दरवर्षी प्रस्तूत आदेशातील सर्व प्रकारच्या दरांमध्ये वार्षिक १० टक्के वाढ प्रस्तावित करण्यात येत आहेत.

सदर धोरणाच्या अर्थनिष्पत्तीबाबत (Interpretation) अथवा अन्य कोणताही प्रासंगिक वाद उद्भवल्यास त्यासंबंधी निर्णय घेण्याचा अधिकार आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना राहील.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे – १८

**(मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र. भूजि/६/कावि/२९/१८ दि.१२/२/१८ विषय क्रमांक १७ ठराव क्रमांक १६० चे लगत)**

निविदा अटी व शर्ती

१) मनपा तर्फे थेरगाव सर्व्हे नं.९ येथील क्रिकेट अकादमीच्या विकासकामाकरीता पुढील प्रमाणे मूलभूत सुविधा पुरविण्यात येतील ज्यामध्ये स्थापत्य विषयक कामे / फर्निशर / अंतर्गत कामे जसे स्वाग़त कक्ष, ड्रेसिंग रुम, प्रेक्षागृह गॅलरी, स्टोअर रुमसह किचन, बाथरूम, टॉयलेट, पाहुण्यांसाठी असणारे विश्रांतीगृह, संचालकांचे कार्यालय तसेच विश्रांतीगृह, प्रशिक्षकांची रूम, खेळाडूंसाठी असणारीप्रेक्षागृह गॅलरी, पाहुण्यांसाठी त्याचप्रमाणे अतीमहत्वाच्या व्यक्तींसाठी असणारी रुम, सामन्याच्या काळामध्ये खेळाडूंना रहाण्याकरीता असणारी रुम, परीसर, कॅन्टीन सुविधा, लिफ्ट सुविधा इ., ३००० मीटर (कमाल मर्यादा) पर्यंतची सीमा भिंत, प्रवेशद्वार, भूमिगत पाण्याची टाकी इ. बाबींचा समावेश आहे.

२) क्रिकेट अकादमीचा तळमजला, पहिला मजला, दुसरा मजला व टेरेस या करीता मैदानाचे स्पेशीफिकेशनचे अनुषंगाने मनपातर्फे स्थापत्य विषयक तसेच अंतर्गत कामे पूर्ण करण्यात येतील. कामे पूर्ण झाल्यानंतर इमारत मनपा तर्फे क्रिकेट अकादमीकडे हस्तांतरीत करण्यात येईल.

३) पिंपरी चिंचवड व लगतच्या जिल्ह्यांमधील तरुण खेळाडूंना आंतरराष्ट्रिय दर्जाचे प्रशिक्षण देणे ही संयुक्त करारनाम्यामधील मुल्भूत अट असणार आहे.

४) प्रतिष्ठान तर्फे निवडक खेळाडूंना स.७ ते स.९ तसेच संध्या.४ ते संध्या.६ या वेळेमध्ये विनामूल्य प्रशिक्षण देण्यात येईल. प्रतिष्ठान तर्फे निवड झालेल्या निवडक खेळाडूंना अकादमीच्या आवारामध्ये काही दुखापत झाल्यास त्यांनाप्रतिष्ठान तर्फे सर्व प्रकारच्या वैद्यकिय सुविधा पुरविण्यात येतील. खेळाडूंची निवड करण्याची संपूर्ण जबाबदारी व अधिकार अकादमीची असेल.

५) करारनाम्यामधील उल्लेख केलेल्या कालावधी मध्ये क्रिकेटचे मैदान, संपूर्ण प्रेक्षागृह (पॅव्हिलियन) इमारत, हिरवळ, स्वच्छतागृहे, स्थापत्य विषयक सर्वसाधारण कामे, अंतर्गत व्यवस्था, मैदान,कॅन्टीन,पाहुण्यांसाठी तसेच अतिमहत्वाच्या व्यक्तिंसाठी असणा-या रूम, हाऊस किपिंग, सुरक्षा व्यवस्था यांची देखभाल व दुरुस्ती यांची संपूर्ण जबाबदारी ही प्रतिष्ठानची असेल.

६) थेरगांव स.नं. ९ (काही भाग) येथील २.५६ हेक्टर म्हणजेच २५६०० स्क्वे.मीटर म्हणजेच २७५००० स्क्वेअर चौ.फुट आणि अंतर्गत हॉल हा पहिल्या पार्टीने ३० वर्षाकरीता देखभाल व दुरुस्तीकरीता ताब्यात दिलेला आहे. सदरची बाब ही सब रजिस्ट्रार हवेली , सब डिविजन तालुका हवेली जिल्हा पुणे व पिं.चिं.म.न.पा.ची स्थानिक मर्यादा यांच्या न्यायकक्षेत असेल यांचे विस्तृत विवेचन परिशिष्ट अ मध्ये वर्णन केलेले आहे.

७) इमारतीच्या उभारणीकरीता मिळकतीच्या उभारणीकरीता खर्च होणारी विज बिल व वापरणेत येणारे पाणीपट्टी यांचे दायित्व लिहून घेणार यांचे असेल. याकरीता, लिहून घेणार

यांचेतर्फे कोणत्याही प्रकारची मागणी लिहून देणार यांचेकडे करता येणार नाही. तसेच, यानंतर येणारे मासिक बील, पाणीपट्टी बील व तत्सम शासकीय कर यांचा भरणा करणेचे दायित्व लिहून घेणार यांचे असेल.

८) सदर ठिकाणी बांधण्यात येणारी प्रेक्षागृह इमारत, ड्रेसिंग रुम, खेळाडूंच्या खोल्या, स्वागत कक्ष परिसर, कॅन्टीन यांच्या विकास आकाराबाबत लिहून घेणार हे कोणत्याही प्रकारची मागणी करणार नसल्याचे लिहून देणार व घेणार यांचेमध्ये झालेल्या करारानुसार स्पष्ट करण्यात आलेले आहे.

९) लिहून देणार व लिहून घेणार यांचेमध्ये झालेल्या करारानुसार, लिहून देणार यांचेकडे कॅन्टीन भाडेतत्वावर देण्याचे व खाजगी सभासदांना घेण्याचे अधिकार हे संपुर्णपणे लिहून देणा-याकडे असणार आहे. व त्यासाठी असणारी आवश्यक परवानगी लिहून घेणार यांचे तर्फे देण्यात येईल.

१०) लिहून देणार आणि लिहून घेणार यांचेमध्ये झालेल्या करारानुसार, तिसरा मजला हा खाजगी सभासद / क्लब यांना भाडेतत्वावर देता येणार नाही. यामध्ये असे मान्य करणेत आले की, तिसरा मजला हा विशेषतखेळाडू, पंच, तसेच निवड समिती सदस्य यांचेकरीता राखीव असेल.

११) लिहून देणार यांचेकडून खाजगी सभासद, क्लब, जिमखाना यांना सभासदस्यत्व देता येणार नाही.

१२) फौंडेशनतर्फे (अकादमी) दर वर्षी तरुण व गुणवान खेळाडूंची निवड प्रक्रिया राबविणेत येईल. यामध्ये जास्तीत जास्त ५० खेळाडू असतील व त्यापैकी २५ खेळाडू हे मनपा हद्दीतील असतील. या करीता, आवश्यक ती निवड प्रक्रिया दरवर्षी एप्रिल महिन्यात राबविणेत येईल.

१३) लिहून देणार (अकादमी) यांना सदरची मिळकत कोणत्याही स्वरुपात कोणत्याही स्वरुपाच्या कर्जाकरीता गहाण ठेवता येणार नाही.

१४) मिळकतीपासून होणा-या नफ्याचा विनियोग हा मिळकतीच्या उन्नतीकरीता व मिळकत सुस्थितीत राखण्याकरीता तसेच तेथे घेण्यात येणा-या क्रीडा विषयक सुविधा बाबींसाठी करणेत यावा.

१५) प्रत्येक आर्थिक वर्षात लिहून देणार (क्रिकेट फौंडेशन) यांनी चार्टर्ड अकौंटंट कडून लेखा परिक्षण करुन घेणे आवश्यक असून त्याबाबतचा पूर्तता अहवाल सहा महिन्याच्या कालावधीत म.न.पा.स सादर करणे बंधनकारक राहील.